IRBK-0100138

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १३८

IRBK-0100138

IRBK-0100138

भारत-गौरव-ग्रंथमाला—पुष्प दुसरें.

# समाजकंटक अथवा वेणु.

## (द्वितीय खंड.)



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान श्रीकृष्ण.

IRBK-0100138

लेखकः

प्रभाकर.

१९१९

किंमत बारा आणे.

PUBLISHER :

**P. S. BHASE,**

MANAGER,

**Bharat Gourav Granth Mala.**

*Girgaon, Bombay.*

PRINTED BY

BHIVAJI HARI SHINDE,

AT THE TATVA-VIVECHAKA PRESS,

KHETWADI NO. 1, 2 & 3,

BOMBAY.

# समाजकंटक अथवा वेणु.

## (द्वितीय खंड.)

महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न असून आज चार वर्षांत ग्रंथमालेचीं अवघीं तेरा पुस्तकें बाहेर पडलीं आहेत. या अडचणींतून ग्रंथमालेस पार पाडणें सर्वस्वी महाराष्ट्र रसिकांच्या हातीं आहे. ग्रंथमालेनें आजवर प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा ते जर निःपक्षपात बुद्धीनें विचार करतील, तर या ग्रंथमालेला आश्रय देणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयांचें कर्तव्य आहे, असें त्यांना कळून आल्यावांचून राहणार नाहीं. ग्रंथमालेनें आजवर आश्रयदात्यांचा संतोष कायम राखला आहे व तिनें त्यांना त्यांच्या पैशाचा पूर्ण मोबदला दिला आहे. आमचे जुने आश्रयदाते जर थोडीफार खटपट करून एक दोन नवीन आश्रयदाते या ग्रंथमालेला मिळवून देतील, तर त्यांत ग्रंथमालेचा जितका फायदा आहे, तितकाच आश्रयदात्यांचा आहे, हें त्यांना आम्ही स्पष्टपणें कळवून ठेवीत आहों, ग्रंथमालेनें—

## आजवर प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें—

१ **समाजकंटक** प्रथम खंड. २ **समाजकंटक** द्वितीय खंड. ३ **दैवलीला.** ४ **सावित्री सत्यवान.** ५ **प्रवासिनी.** ६ **महात्मापरिचय.** ७ **महात्मागौतम.** ८ **जाईचा मंडप** प्रथम खंड. ९ **जहांगीर.** १० **जाईचा मंडप** द्वितीय खंड. ११ **समाजरहस्य.** १२ **जन्मभूमि** प्रथम खंड. व १३ **जन्मभूमि** द्वितीय खंड. हीं तेरा होत. यापैकीं चार नंबरचें सावित्री सत्यवान हें पुस्तक शिल्लक नाहीं. समाजकंटकाचे दोन्ही खंड व दैवलीला हीं पुस्तकें संपल्यामुळें पुनर्मुद्रित केलीं आहेत आणि बाकीचीं पुस्तकेंहि थोडींच शिल्लक आहेत. यापैकीं प्रथम **प्रवासिनी** या पुस्तकाचें हिंदींत बाबू प्यारेलाल गुप्त यांनीं व बंगालींत हरिदास आणि मंडळी ( कलकत्ता ) यांनीं भाषांतर केलें. अहमदाबादच्या सस्तु साहित्यवर्धक कार्यालयानें तर आमच्या सर्वच पुस्तकांचीं गुजरातींत भाषांतरें करण्याची परवानगी घेऊन ठेवली आहे. कानडी भाषेंत समाजकंटकाचें भाषांतर झालें आहे. हिंदींतल्या एका चांगल्या लेखकानें जन्मभूमि व जाईचा मंडप हीं हिंदींत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आणखीहि पुष्कळ विद्वानांनीं या पुस्तकांची प्रशंसा करून भाषांतराबद्दल विचारलें आहे. यावरून या ग्रंथमालेचीं पुस्तकें किती उत्कृष्ट असतात, याची कल्पना कोणासहि करितां येईल. अशा ग्रंथमालेस नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचें काम मोठेसें कठिण आहे, असें नाहीं. ज्या रसिकांना महाराष्ट्र वाङ्मयाची आस्था व कळकळ आहे

महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न असून आज चार वर्षांत ग्रंथमालेचीं अवघीं तेरा पुस्तकें बाहेर पडलीं आहेत. या अडचणींतून ग्रंथमालेस पार पाडणें सर्वस्वी महाराष्ट्र रसिकांच्या हातीं आहे. ग्रंथमालेनें आजवर प्रसिद्ध केलेल्या साहित्याचा ते जर निःपक्षपात बुद्धीनें विचार करतील, तर या ग्रंथमालेला आश्रय देणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयांचें कर्तव्य आहे, असें त्यांना कळून आल्यावांचून राहणार नाहीं. ग्रंथमालेनें आजवर आश्रयदात्यांचा संतोष कायम राखला आहे व तिनें त्यांना त्यांच्या पैशाचा पूर्ण मोबदला दिला आहे. आमचे जुने आश्रयदाते जर थोडीफार खटपट करून एक दोन नवीन आश्रयदाते या ग्रंथमालेला मिळवून देतील, तर त्यांत ग्रंथमालेचा जितका फायदा आहे, तितकाच आश्रयदात्यांचा आहे, हें त्यांना आम्ही स्पष्टपणें कळवून ठेवीत आहों, ग्रंथमालेनें—

## आजवर प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें—

१ **समाजकंटक** प्रथम खंड. २ **समाजकंटक** द्वितीय खंड. ३ **दैवलीला.** ४ **सावित्री सत्यवान.** ५ **प्रवासिनी.** ६ **महात्मापरिचय.** ७ **महात्मागौतम.** ८ **जाईचा मंडप** प्रथम खंड. ९ **जहांगीर.** १० **जाईचा मंडप** द्वितीय खंड. ११ **समाजरहस्य.** १२ **जन्मभूमि** प्रथम खंड. व १३ **जन्मभूमि** द्वितीय खंड. हीं तेरा होत. यापैकीं चार नंबरचें सावित्री सत्यवान हें पुस्तक शिल्लक नाहीं. समाजकंटकाचे दोन्ही खंड व दैवलीला हीं पुस्तकें संपल्यामुळें पुनर्मुद्रित केलीं आहेत आणि बाकीचीं पुस्तकेंहि थोडींच शिल्लक आहेत. यापैकीं प्रथम **प्रवासिनी** या पुस्तकाचें हिंदींत बाबू प्यारेलाल गुप्त यांनीं व बंगालींत हरिदास आणि मंडळी ( कलकत्ता ) यांनीं भाषांतर केलें. अहमदाबादच्या सस्तु साहित्यवर्धक कार्यालयानें तर आमच्या सर्वच पुस्तकांचीं गुजरातींत भाषांतरें करण्याची परवानगी घेऊन ठेवली आहे. कानडी भाषेंत समाजकंटकाचें भाषांतर झालें आहे. हिंदींतल्या एका चांगल्या लेखकानें जन्मभूमि व जाईचा मंडप हीं हिंदींत प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आणखीहि पुष्कळ विद्वानांनीं या पुस्तकांची प्रशंसा करून भाषांतराबद्दल विचारलें आहे. यावरून या ग्रंथमालेचीं पुस्तकें किती उत्कृष्ट असतात, याची कल्पना कोणासहि करितां येईल. अशा ग्रंथमालेस नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचें काम मोठेसें कठिण आहे, असें नाहीं. ज्या रसिकांना महाराष्ट्र वाङ्मयाची आस्था व कळकळ आहे

त्यांना थोडी विनंति केल्यास अशा सद्गृहस्थांकडून ग्रंथमालेस सहज आश्रय मिळेल, असा आम्हास विश्वास आहे. हल्लीं ग्रंथमालेजवळ समाजकंटकाचे दोन्ही खंड, जन्मभूमीचे दोन्ही खंड, देवलीला व समाजरहस्य, हीं सहा पुस्तकें पुष्कळ शिल्लक असल्यामुळें निदान हीं पुस्तकें घेऊन आश्रय देणारे आश्रयदाते ग्रंथमालेला पाहिजे आहेत. आमचे जुने आश्रयदाते ग्रंथमालेची ही गरज पूर्ण करून तिची उन्नति घडवून आणतील असा आम्हास बळकट विश्वास आहे. यावेळीं नवीन आश्रयदात्यांची मदत झाल्यास ग्रंथमालेचीं १ **प्रेममंदिर** २ **मातृमूर्ति** व ३ **स्वप्नमय-आयुष्य**; हीं जीं अत्यंत उत्कृष्ट तीन पुस्तकें आस्ते आस्ते छापत आहेत, तीं बरींच लवकर प्रसिद्ध होतील व या तीन पुस्तकांचें अंतरंग पाहून आमच्या प्रत्येक आश्रयदात्यास आपल्या पैशाचें व आमच्या श्रमाचें चीज झालें असें वाटेल, अशी आम्हास पूर्ण खात्री आहे.

गिरगांव–मुंबई.
ता. १५ जानेवारी १९१५

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**

# प्रकाशकाचे दोन शब्द.

समाजकंटकाचा हा द्वितीय खंड प्रसिद्ध होण्यास बराच कालावधी लागला, यासंबंधानें आमचे आश्रयदाते आम्हास क्षमा करतील असा भरंवसा आहे. या पुस्तकाची द्वितीयावृत्ति काढण्याचा सुयोग आल्याबद्दल, आम्हास जें काय कळवावयाचें होतें, तें आम्ही प्रथमखंडाच्या प्रास्ताविक लेखांत कळविल्यामुळें त्याची पुनरुक्ति, येथें करण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. या पुस्तकांत प्रथमखंडांत चार व या खंडांत चार अशीं चित्रें देण्याचें आम्ही अभिवचन दिलें होतें व त्याप्रमाणें प्रथमखंडांत चित्रें दिलींहि आहेत; परंतु मागें दिलेल्या चित्रांबद्दल पुष्कळ आश्रयदात्यांनीं नापसंति दर्शविल्यामुळें या खंडांत चित्रें देण्याचें टाळलें आहे. सर्वांगसुंदर या दृष्टीनें पुस्तकांत ही एक उणीव आहे, व ती दूर करण्यासाठीं आम्ही एक योजनाहि तयार केली आहे. प्रत्येक पुस्तकांत एक सुटें सुंदर चित्र द्यावयाचें, असा आमचा मनोदय आहे; परंतु युरोपच्या महायुद्धामुळें आम्ही मागविलेलीं आर्टपेपरचीं जाड कार्डें अद्याप आमच्या हातांत पडलीं नाहींत व तीं हातीं पडण्यास आणखी किती दिवस लागतील हेंहि निश्चयानें सांगतां येत नाहीं.

भारत-गौरव-ग्रंथमाला ही महाराष्ट्रांतली अगदीं पहिली ग्रंथमाला आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ही ग्रंथमाला निघण्याच्यापूर्वी महाराष्ट्रांत कांहीं ग्रंथमाला नव्हत्या, असें कांहीं आम्ही म्हणत नाहीं; पण त्यापूर्वीच्या ग्रंथमालांत व भारत-गौरव-ग्रंथमालेंत कांहीं कांहीं बाबतींत पुष्कळ तफावत असल्यामुळें हीच ग्रंथमाला पहिली होय असें कोणाहि विचारी मनुष्यास म्हणावें लागेल. इंग्लंड वगैरे सुसंस्कृत देशांत अशा प्रकारच्या ग्रंथमाला पुष्कळ आहेत व त्या ग्रंथमालांवरूनच ही ग्रंथमाला मराठींत चालू करण्याची आम्हास इच्छा झाली. पुस्तकांचें विषयधोरण, त्यांची छपाई, त्यांची बांधणी, त्यांची पृष्ठसंख्या व त्यांची किंमत या सर्व बाबतींत सारखेपणा ठेवावयाचा, हा या मालांतील विशेष होय. तिकडे अशा ग्रंथमाला पुष्कळ आहेत, व त्यामुळें तिकडच्या साधारण स्थितींतील गृहस्थांनाहि चांगल्या पुस्तकांचा संग्रह सहज करितां येतो. एखादें पुस्तक खरोखर फार माठ असतें व त्याची किंमतहि फार जबर असते. अर्थात अशा पुस्तकांचा संग्रह

साधारण स्थितींतल्या गृहस्थास करतां येत नाहीं; परंतु तेंच पुस्तक अशा एखाद्या ग्रंथमालेनें भागशः थोड्या थोड्या मुदतीनें प्रसिद्ध केल्यास गरीबांस देखील दोन दोन महिन्यांनीं सहा किंवा बारा आणे देऊन त्या पुस्तकाचा संग्रह करतां येतो. हेंच धोरण भारत-गौरव-ग्रंथमालेनें स्वीकारून शक्य तितक्या स्वल्प किमतींत उत्कृष्ट पुस्तकें थोड्या थोड्या मुदतीनें प्रसिद्ध करण्यास ग्रंथमालेनें आरंभ केला आहे. सहा आणे ही किंमत कांहीं फार नाहीं व ही किंमत दोन महिन्याच्या मुदतीनें सहज कोणासहि देतां येईल, असा विचार करून आम्ही या ग्रंथमालेचें पहिलें पुस्तक इ. स. १९११ च्या जानेवारींत प्रसिद्ध केलें. हा आमचा प्रयत्न महाराष्ट्रीयांना कितपत आवडेल, याची प्रथम आम्हांस कल्पना नव्हती; परंतु लवकरच आमच्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, लोकांना आमचा हा प्रयत्न आवडला असून व्यवसायाच्या दृष्टीनें आम्हास लोकाश्रयहि बराच मिळाला. पहिल्या पुस्तकांच्या प्रती आम्ही भीत भीत दोन हजार छापल्या होत्या; पण ती संख्या हळूहळू वाढवीत आज ग्रंथमालेला आपल्या प्रत्येक पुस्तकाच्या पांच हजार प्रति छापवाव्या लागत आहेत. हा आमचा प्रयत्न महाराष्ट्रीयानांच आवडला असें नाहीं, तर कांहीं पर भाषेंतील विद्वानांनाहि आवडला व त्यांनीं या ग्रंथमालेच्या कांहीं पुस्तकांचीं हिंदींत व गुजराथींत भाषांतरेंहि केलीं आहेत. या दृष्टीनें पाहिलें असतां ग्रंथमालेची एकसारखी उन्नतीच होत आहे, असें म्हणणें भाग पडतें; पण व्यवसायाच्या दृष्टीनें ग्रंथमाला आपला व्यवहार अद्याप थोडेसें नुकसान सोसूनच चालवीत आहे, हें कळविण्यास आम्हास दिलगिरी वाटते. सहा आणे किमतीस दोनशें पृष्ठांचें व उत्कृष्ट मजकुराचें पुस्तक द्यावयाचें हा जो आम्ही इंग्रजी ग्रंथमालांप्रमाणें निश्चय केला व त्याप्रमाणें आजवर वागलों, त्यांतच ग्रंथमालेनें बरेंच नुकसान सोसलें आहे. इंग्रजी ग्रंथमालांची आवृत्ति लक्षावधी प्रतींची असते व त्यांचा खपहि दांडगा असल्यामुळें त्यांना थोड्या किमतींत भरपूर मजकूराचीं पुस्तकें सहज प्रसिद्ध करितां येतात. एखाद्या चांगल्या ग्रंथमालेला अवश्य आश्रय द्यावयाचा व तो आश्रय होतां होईतों तोडावयाचा नाहीं, हें जें पाश्चात्य लोकांत बाळकडू आहे, त्याचा एक शतांशहि जर महाराष्ट्रीत समाजांत असता, तर इतके दिवसांत महाराष्ट्रांत पुष्कळ चांगलें वाङ्मय निर्माण झालें असतें. इकडे अगोदर आश्रय देण्याची इच्छा कमी आणि दिल्यावर मध्येंच केव्हां तरी व्ही. पी. परत करून ग्रंथमालेस चिमटा घेण्याची संवयहि दांडगी! अशा दुहेरी अडचणीमुळें प्रत्येक दोन

# समाजकंटक अथवा वेणु.

## द्वितीयखंड.

### प्रकरण पहिलें.

### आग.

ज्या दिवशीं कृष्णराव मुंबईस निघून गेला, त्याच दिवसाची गोष्ट. सायंकाळच्या वेळेस विश्वनाथराव जहागिरदार आपल्या ओसरीवर स्वस्थपणें बसून पानतंबाखू खात होते. त्यांनीं आपलें स्थूल शरीर एका प्रशस्थ लोडावर स्थिर करून आपल्या समोर पानतंबाखूच्या साहित्याचें तबक ठेविलें होतें. त्यांचें सगळें लक्ष कृष्णरावाला समुद्रांत ढकलून देण्याच्या विषयाकडे लागलें होतें. आपण योजलेली राक्षसी युक्ति तडीस जाते किंवा नाहीं, याविषयीं त्यांना मोठी हुरहुर लागली होती. विश्वनाथराव याप्रमाणें विचार करीत बसले असतां त्यांना गोविंदराव भेटावयास आल्याची वर्दी मिळाली. गोविंदराव आपणाकडे आल्याचें ऐकून विश्वनाथरावाचे हृदयांत साहजिकच धडकी भरली; तथापि त्यांनीं तीं भीतीचीं चिन्हें बाहेर न दाखवितां, गोविंदरावांस आदरानें पाचारण केलें. गोविंदराव आंत आल्याबरोबर मोठा आनंद दर्शवून, त्यांना अगदीं जवळ असलेल्या गादीवर बसवून घेतलें. जहागिरदार साहेबांच्या इतकें जवळ

बासावयास मिळालें म्हणजे आपणांस मोठा मान मिळाला, असें अवंतीपुरांतले लोक समजत असत; परंतु त्या जागेवर गोविंदरावांस बसावयाचा मान मिळाला, तेवढ्यावरून जहागिरदार साहेबांच्या समतेची कोणी तारीफ करूं नये. कारण ती समता दांभिकपणाची होती, खरी नव्हती. अशा दांभिक समतेस व खोट्या मानांस कित्येक अज्ञान लोक स्वर्गसुखापेक्षां अधिक मानतात; पण तशी फसगत गोविंदरावांची झाली नाहीं. विश्वनाथरावांसारख्या सत्ताधाऱ्यांचे नाना रंग त्यांना पुरे माहीत होते.

प्रास्ताविक शिष्टाचार पुरा झाल्यावर विश्वनाथराव म्हणाले,

“ आज पुष्कळ दिवसांनीं शुभागमन झालें. आपले पाय लागल्यामुळें आमचें घर पुनीत झालें. हा मोठाच लाभ झाला म्हणावयाचा.”

गोविंदरावांना स्तुतीचा फारच कंटाळा होता; त्यांतून आपल्या पायांनीं लोकांचीं घरें पुनीत होतात, हें ऐकून तर त्यांना विशेष वाईट वाटलें. भोळ्या लोकांना असेंच हरभऱ्याच्या झाडावर चढवून धूर्त फसवितात, अशी त्यांनीं आपल्या मनाची समजूत करून घेऊन ते म्हणाले,

“ आमच्या पायांस भलतीच योग्यता देऊन, आपण साधुसंतांची किंमत कमी करीत आहां. अहो, तेवढी कोठें आमची योग्यता आहे? पुष्कळ दिवसांत भेट झाली नाहीं, दर्शनाचा लाभ झाल्यास बघावें, म्हणून आलों. धोंडीराज वगैरे सर्व मंडळी कुशल आहेत ना?”

विश्वनाथराव म्हणाले,

“ हो-हो-हो; प्रभूच्या दयेनें सर्व कुशल आहेत.”

गोविंदराव म्हणाले,

“मला वाटतें, तुमच्या एकंदर कुटुंबांत धोंडीराज फारच अशक्त दिसतो.”

" तो लहानपणापासूनच अशक्त आहे. त्यांतून त्यास इंग्रजी शिक्षण दिल्यामुळें तर तो अधिकच अशक्त झाला आहे. अझूनहि त्याचे लेखनवाचन वगैरे व्यवसाय सुरूच आहेत."

" शिक्षण इंग्रजी असो, अथवा कोणतेंहि असो; पण शिक्षणामुळें अशक्तता येते हें कसें काय?"

" जेथें इंग्रजी शिक्षणाचे पाय शिरले, तेथें रोगाचें बिऱ्हाड ठेवलेलेंच. अभ्यासाच्या श्रमानें मस्तक दुखूं लागतें, तें दुखूं लागलें म्हणजे डोक्यावर केंस ठेवण्याची परवानगी द्यावी लागते. बारिक अक्षरांचीं पुस्तकें वाचून वाचून दृष्टि खराब झाली, म्हणजे चष्मा लागतो. लहानसहान दुखणीं नेहमीं चालू असावयाचींच. पास होण्याच्या महत्वाकांक्षेनें तरुणपणींच शरीराची अगदीं माती होऊन जाते. या शिक्षणाच्या हव्यासामुळें पुढें काय काय अनर्थ होतील ते त्या देवाला माहीत!"

" धोंडीराजासहि मस्तकाची व डोळ्यांची पीडा आहे असें दिसतें."

" तें काय सांगावें! त्याचें डोकें नेहमीं दुखत असतें आणि चष्मा घातल्यावांचून तर त्यास मुळींच दिसत नाहीं. शिवाय बारिकसारिक दुखणीं नेहमीं चालूच असतात!"

विश्वनाथरावांचें तें मिथ्या व विलक्षण समजुतीचें बोलणें ऐकून, गोविंदरावांस फार आश्चर्य वाटलें; परंतु आपणांस याविरुद्ध बोलून काय करावयाचें आहे? असा विचार करून, ते विश्वनाथरावाच्या बोलण्यास मान डोलवित होते. धोंडीराजाचे खरे आजार व त्यांचीं वास्तविक कारणें हीं त्यांना चांगलीं माहीत होतीं; तथापि विश्वनाथरावाच्या बोलण्याचा झोंक पाहून ते म्हणाले,

“ अल्पवयांतच जर या तरुणांची ही स्थिति, तर ही तरुण मंडळी म्हातारपणचे दिवस कसे कंठतील कोण जाणें? तुम्हांला ही गोष्ट जरा कष्टप्रद आहे. एकुलता एक पुत्र आणि तो असा अशक्त व रोगी असणें हें बरेंच काळजी करण्यासारखें आहे. ईश्वराची इच्छा दुसरें काय?”

“ भगवान् त्याच्या हातानें शेवट करो ह्मणजे झालें.”

“ पण आपण जर कांहीं प्रयत्न कराल, तर प्रकृति सुधारल्यावांचून राहणार नाहीं. योग्य मार्गानें मात्र प्रयत्न केला पाहिजे.”

“ पण प्रयत्न करण्यांत आम्हीं कांहीं आळस करीत नाहीं. देवानें आम्हांला कांहीं कमी केलें आहे, असें थोडेंच आहे.”

“ तें बरोबरच आहे. आपली कुबेरासारखी संपत्ति आणि मुलगा एवढा एकच. तेव्हां त्याच्या प्रकृतीविषयीं तुमच्याकडून आळस होणार नाहीं; तथापि त्याच्या वर्तनाकडे तुमचें असावें असें लक्ष नाहीं, असें मला वाटतें. आपण कांहीं गोष्टींची खबरदारी ठेवली, तर अशक्तता लवकरच दूर होईल.”

“ आणखी कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी ठेवली पाहिजे?”

“ कदाचित् तारुण्यांतील अनाचारांमुळें त्याची प्रकृति अशी क्षीण झाली असावी, असें मला वाटतें. अज्ञानपणामुळें तारुण्यांत कांहीं रोग उत्पन्न होतात. ते रोग फार भयंकर असतात, असें वैद्यांचें म्हणणें आहे.”

“ छे छे, तसें मला तर मुळींच कांहीं दिसत नाहीं. तो जरा अल्लड स्वभावाचा आहे, एवढेंच. तारुण्य आहे, तोंपर्यंत असें असणारच; परंतु तशा प्रकारच्या रोगाची त्यास बाधा आहे, असें मुळींच नाहीं.”

धोंडीराजाचें वर्तन इतकें घाणेरडें झालें होतें, तरी त्याबद्दल फिकीर न करितां उलट विश्वनाथराव उडवाउडवी करीत आहे, याबद्दल गोविंदरावांस फार आश्चर्य वाटलें. पुष्कळ बापांचे विचार आपल्या स्वतःच्या मुलांविषयीं अशाच प्रकारचे अज्ञानमूलक व घातूक असतात. गोविंदराव म्हणाले,

"तुह्मांस याबद्दल कांहीं माहितीच कळली नसावी, असें मला वाटतें. गांवांत असा फार बोभाटा आहे कीं, धोंडीराज फार दुर्वर्तनी आहे. तो स्वैरवर्तनानें गांवांत वागतो. यामुळें कित्येक रोगांनीं धोंडीराजाच्या शरीरांत कायमचें बिऱ्हाड ठेविलें आहे. यासंबंधानें आपण विशेष काळजी घेतली पाहिजे. पण आपणहि अगदीं बेफिकीर दिसत आहां."

धोंडीराज स्वैरपणानें वागून लोकांना त्रास देत आहे, यांत तो कांहीं चुकत आहे, असें विश्वनाथरावांना वाटत नव्हतें. उलट श्रीमंताच्या, त्यांतून अधिकाऱ्यांच्या मुलांनीं स्वैरपणानें वागणें हें त्यांना भूषणास्पद वाटत होतें. गोविंदरावांनीं केलेला उपदेश त्यांस त्यांच्या उद्दाम स्वभावामुळें रुचला नाहीं. ते किंचित् रागाचीं चिन्हें व्यक्त करून म्हणाले,

"गोविंदराव, आपण हें कांहीं तरी म्हणतां झालें. धोंडीराजाची वर्तणुक चांगली आहे, अशी माझी खात्री आहे. तरुणपणांत घडणाऱ्या कांहीं गोष्टींचा एवढा बाऊ करण्याचें कांहीं कारण नाहीं. तरुणपणीं सर्वच याप्रमाणें चुकतात. या चुक्यांना एकदम दुर्वर्तन म्हणणें हें तुम्हांस तरी निदान शोभत नाहीं!"

गोविंदरावांस विश्वनाथरावाच्या या भाषणानें राग न वाटतां विषाद मात्र वाटला. स्वतःच्या मुलाच्या दुर्गुणाबद्दल खेद न दर्शवितां, उलट त्याबद्दल अभिमान दर्शविणाऱ्या बापाला पाहून कोणासहि विषाद वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

गोविंदराव विषादयुक्त स्वरानें म्हणाले,

"धोंडीराजाची मजल लोकांच्या मुली पळविण्यापर्यंत आली, तरी आपण त्याची तरफदारीच करीत आहां याबद्दल आश्चर्य वाटतें. वेणूस कोणी व कसें नाहींसें केलें, याबद्दल आपणांला कदाचित् माहिती नसेल; परंतु मी त्यासंबंधाची सगळी माहिती मिळविली आहे. या धोंडीराजाच्या बर्तनास जर आपण सुवर्तन म्हणत असाल, तर नाइलाज आहे."

वेणूचें नांव ऐकतांच विश्वनाथरावांचे मनास जरा चरका बसला; तथापि भीतीचें लक्षण कांहीं एक न दाखवितां ते उसनें अवसान आणून म्हणाले,

"गोविंदराव, लोक कांहीं तरी म्हणतात, तेवढ्यावरून तुह्मीहि कांहीं तरी ह्मणतां झालें; परंतु पक्की माहिती मिळविल्यावांचून असें भलतेंच बोलणें चांगलें नाहीं."

गोविंदराव म्हणाले,

"पण लोक म्हणतात तेवढ्यवरून मी हें म्हणत नाहीं. माझी जेव्हां त्यासंबंधानें खात्री झाली, तेव्हांच मी आपणाकडे आलों. मी कांहीं आपणांकडे भांडण्यासाठीं किंवा आपलें उणें दाखविण्यासाठीं आलों नाहीं; आपणांस बऱ्याची गोष्ट सांगावी, आपलें घराणें मोठें आहे, अशा

मोठ्या घराण्यांत अशा निंद्य गोष्टीं होऊं नयेत, एवढ्यासाठीं मी आपणांकडे आलों आहे. सांगितलेल्या गोष्टींकडे लक्ष देण्याची आपली इच्छा नसल्यास माझें कांहीं त्यांत नुकसान नाहीं."

विश्वनाथरावांच्या अंगावर बाजू आली ही गोष्ट खरी; तथापि त्यांचा नेहमींचा स्वभावच असा होता कीं, त्यांस कोणी उणें बोललेलें सहन होत नसे. गोविंदरावांचें खरें बोलणें ऐकून ते ओशाळून न जातां, उलट थोडेसे गरम होऊन म्हणाले,

"गोविंदराव, आपल्यासारख्या सभ्य माणसांनीं आमच्याविषयीं भलत्या सलत्या कंड्या गांवांत पिकवाव्यात हें कांहीं चांगलें नाहीं. पराचा कावळा होत असतो, त्याप्रमाणें असतें थोडें आणि पिकतें फार; याकडे लक्ष न देतां जनवार्तेवर विश्वास ठेवणें, तुम्हांसारख्यांस मुळींच शोभत नाहीं."

वरील दोन विसंगत प्रमयें आपल्या गरल मुखानें ओकून, विश्वनाथरावांची स्वारी सर्पाप्रमाणें फूत्कार सोडूं लागली. त्यांच्या रागास मुळींच भीक न घालतां गोविंदराव म्हणाले,

"विश्वनाथराव, आपण मला कितीहि हिडिसपणें बोलून, भीति दाखविण्याचा प्रयत्न केलात, तरी जी गोष्ट खरी आहे, त्यासंबंधानें बोलण्यास मी मुळींच भिणार नाहीं. वास्तविक काय स्थिति आहे, याचा तपास केल्यावांचून, तुम्ही तरी इतक्या आग्रहानें मी म्हणतों हें खोटें आहे, असें कां म्हणावें? मला यासंबंधानें सर्व माहिती मिळाली आहे. आपल्या सल्ल्यानें माधवराव व धोंडीराज यांनीं वेणूला फसवून आपल्या घरीं आणून ठेवलें आहे, याबद्दल माझी अगदीं खात्री होऊन चुकली आहे."

गोविंदरावांचें हें बोलणें ऐकून विश्वनाथरावांची छाती अगदीं दडपून गेली. यावेळीं बाजू कशी सांवरून धरावी, याचें त्यांना मोठें कोडें पडलें. कोडें उकलण्यास फार वेळ सवड द्यावी, तर फजिती झाल्यासारखी दिसणार! शेवटीं ते अगदीं त्रस्त होऊन म्हणाले,

"गोविंदराव, आपण हें मिथ्या भाषण करतां. आपण म्हणतां ही गोष्ट अगदीं खोटी आहे आणि आपणांस जर ती खरी वाटत असेल, तर तुम्हांस जो काय प्रयत्न करावयाचा असेल, तो खुशाल करा."

गोविंदराव धिमेपणानें म्हणाले.

"अगोदर आपल्या कानावर घातलें आहे. आपण जर याचा बंदोबस्त केला नाहीं, तर मग आम्हांस काय करावयाचें तें करूं! पण एवढ्यावरून इतकी गोष्ट मात्र खास कीं, हें भयंकर कृत्य आपल्याच अनुमतीनें आपल्या चिरंजीवांनीं केलें आहे."

विश्वनाथरावांची स्थिति मोठी चमत्कारीक झाली, ते कांहीं खेदानें व कांहीं भीतीनें म्हणाले,

"मी आपली अनुमति अशा गोष्टीस कधींहि देणार नाहीं. तुम्हांस तसें वाटत असल्यास, ती तुमची मोठी चूक होय. या बाबतींत माझें अंग आहे, असें तुम्हांस सिद्ध करून देतां येईल काय?"

गोविंदराव जरा ठांसून म्हणाले,

"यांत सिद्ध तें काय करावयाचें आहे? आपलेच चिरंजीव व आपलेच शालक यांनीं ही भयंकर गोष्ट आपला पाठींबा असल्यावांचून केली नाहीं. लोक म्हणतात, 'ही गोष्ट धोंडीराजानें केली नाहीं, तर

विश्वनाथरावांचे मुलानें केली.' हें जें तुमचें नांव बाहेर पडतें, याबद्दल तुम्हांस कांहींच वाटत नाहीं, याचें मला आश्चर्य वाटतें. तुमच्या धोंडी-राजानें यापेक्षांहि भयंकर उत्पात केल्याबद्दल लोक माहिती सांगत आहेत."

विश्वनाथराव जरा नरम होऊन म्हणाले,

"पोरस्वभावामुळें कांहीं गोष्टी चुकून झाल्या असतील आणि तशा सगळ्यांकडूनच होतात. मुलांनीं एखादा अपराध केला, तर, त्याचा दोष बापाकडे कसा येतो, हें मला समजत नाहीं."

गोविंदराव म्हणाले,

"मुलगा कितीहि मोठा झाला, तरी तो आपल्या आईबापांना लहानच आहे. लहान मुलांनीं कांहीं अपराध केला, तर त्यावेळीं जसें त्यांच्याकडे त्यांच्या आईबापांना लक्ष पुरवावें लागतें, त्याप्रमाणेंच मोठेपणीं देखील मुलाकडे लक्ष ठेविलें पाहिजे. हें आपण आपलें कर्तव्य अगदींच विसरून गेलां आहां असें दिसतें. धोंडीराजावर आपला मुळींच दाब नाहीं, ही गोष्ट परिणामीं फार घातुक होईल. आपणांस स्नेहबद्धतेमुळें कदाचित् त्याचे अपराध क्षम्य वाटत असतील; परंतु आम्हांला ते सहन करणें कठिण झालें आहे. आपण जर तिकडे दुर्लक्ष करूं लागलां, तर आम्हांस त्याची तजवीज करणें भाग पडेल. आपणांस वाटत असेल, कीं पोर खेळत आहे; परंतु मुलाच्या खेळण्यामुळें लोकांचे प्राण कंठीं आले आहेत. आपण या अनाचाराची तजवीज न केल्यास आम्हांस बंदोबस्त करणें भागच आहे. सरकारी दरबारांत हें प्रकरण जाऊं नये अशी आमची इच्छा आहे."

विश्वनाथरावांस गोविंदरावांचे वरील उद्गार सहन झाले नाहींत. अधिकारमदानें धुंद झाल्यामुळें, त्यांस सरकारी दरबाराची धमकी हास्यास्पद व अपमानकारक वाटली. खिजविलेल्या वाघाप्रमाणें संतापून जाऊन ते हिडीसपिडीस स्वरानें बोलूं लागले,

" गोविंदराव, या धमकीच्या गोष्टी तुम्हीं कोणाला सांगत आहां, हें तुमच्या लक्षांत आहे काय? मी कांहीं बोळ्यानें दूध पीत नाहीं, समजलांत. कोणाजवळ काय गोष्ट बोलावी याचा तुम्हांला विचार नाहीं. अहो, जो कोणी माझ्याशीं वांकडा होईल, त्याची खोड मोडायला मला किती उशीर लागणार आहे? माझ्याविरूद्ध जाणारांना म्हणावें, जपून राहा. हा विश्वनाथराव आतां तुमचीं पाळेंमुळें खणून काढून टाकून, तुम्हांला पार नेस्त नाबुत करील."

विश्वनाथरावांच्या या डरकावणीस भिऊन न जातां गोविंदराव शांतपणें म्हणाले,

" तुमच्या अंगीं इतका अधमपणा आहे, हें मी जाणून आहें. पण वाईट कृत्यें करून, त्याबद्दल पुरुषार्थ गाण्यांत कांहीं मोठेपणा आहे, असें मला वाटत नाहीं. या अवन्तीपुरांत जरी तुमची थोडी फार सत्ता असली तरी तिचा उपयोग सर्वत्र होणार नाहीं, हे लक्षांत ठेवा. निदान ईश्वराचें घरीं तरी आपणास आपल्या अघोर कृत्यांचें प्रायश्चित्त मिळाल्यावांचून राहणार नाहीं, असा माझा भरंवसा आहे. आणि जर परमेश्वर माझ्या प्रयत्नास यश देईल, तर वाईट कृत्यांचा परिणाम वाईट होतो, हें तुम्हांला लवकरच दिसून येईल. मी आपणांस पुन्हा विनंति करतों कीं, आपण आतांच्या आतां वेणूला मुक्त करावें; नाहीं तर पुढें आम्हांस योग्य मार्ग आहेच."

गोविंदरावांच्या वरील भाषणानें, विश्वनाथरावांचा संताप प्रत्येक क्षणीं, प्रतिशब्दानें वाढत चालला होता. ते आपले डोळे विस्तवाप्रमाणें लाल करून व स्वराची तार जरा वाढवून म्हणाले,

"मुक्त करित नाहीं जा. काय आमचे केळी नारळीचे बाग कापाल, तें पाहून घेऊं! अशा गल्लीगल्लीनें ओरडत फिरणाऱ्या कुत्र्यांना मी भीक घालीत नसतों!! समजलांत?"

गोविंदराव न रागवतां शांतपणें म्हणाले,

"मला आपण कुत्रें म्हणा, अथवा वाटेल तें म्हणा. आपलें घराणें मोठें आहे, त्याचा आहे तेवढा तरी लौकिक कायम रहावा, एवढ्यासाठीं आपणाकडे आलों. आपणाला भीति दाखवावी, किंवा आपणाशीं भांडणतंटा करावा, म्हणून कांहीं आपणाकडे आलों नाहीं. तसें करून मला काय करावयाचें आहे? धोंडीराजाच्या अपराधाकडे लक्ष देण्याचें कारण वेणूमुळें उपस्थित झालें आहे. तेव्हां वेणूस सोडून दिल्यास, भांडणाचें मूळच नाहींसें झाल्यासारखें होईल. आणि आपणांस जर तसें करावयाचें नसेल, तर आम्हांस धोंडीराजास न्यायाचे दरबारांत ओढावें लागेल हें आपणास स्पष्ट कळवून ठेवतों."

विश्वनाथराव संतापाच्या भरांत आपली छाती ठोकीत म्हणाले,

"ठीक आहे, ठीक आहे. आपण त्याला न्यायाच्या कचेरींत ओढतां कीं, मी आपली सत्ता तुमच्यावर गाजवितों, तें पाहूं आतां! तोंडानें बोलायला कांहीं आयास पडत नाहींत. पण हातांनीं करायला फार जड जातें. पाहूं आतां कोण काय करतो तें!! तुमच्या या दांडगेपणाची चांगलीच आठवण ठेवीन तरच हा विश्वनाथराव. माझी

सत्ता किती, माझा अधिकार केवढा, मी कोण याचा कांहीं एक विचार न करतां मजपुढें येऊन वाटेल तें बोललां, याबद्दल तुम्हांस चांगलेंच प्रायश्चित देईन. माझ्या समक्ष माझा अपमान आं !"

'धोंडीराजास न्यायाच्या कचेरींत ओढीन' हे गोविंदरावांचे शब्द विश्वनाथरावाच्या हृदयास भाल्याप्रमाणें त्रास देत होते आणि त्यामुळें त्यांच्या रागास सीमा राहिली नव्हती. त्यांच्या समजुतीप्रमाणें गोविंदराव म्हणजे एक भिकारी मनुष्य. त्यांनीं वाटेल तसें बोलावें हें त्यांना मुळींच सहन झालें नाहीं. बहुतेक जुलमी सत्ताधाऱ्यांचा हा असा स्वभावच असतो. लोकांवर वाटेल तसा वरवंटा फिरवून, फिरून लोकांनीं आपले गोडवे गावे, असें जसें कांहीं खल प्रकृति शिष्टांनो वाटत असतें, त्याप्रमाणेंच विश्वनाथरावांनाहि वाटत होतें. लोकांनीं आपणांवर होत असलेल्या जुलुमासंबंधानें कुरकुर केल्यास किंवा त्यांचे दोष त्यांना दाखविल्यास सत्ताधारी जशी पिशाच्चवृत्ति स्वीकारतात, त्याप्रमाणें, त्यावेळीं विश्वनाथरावांनीं पिशाच्चाचा अवतार धारण केला होता. त्यांचे डोळे लाल झाले होते, ओठ थरथर कांपत होते, ते दांत करकरा चावीत होते आणि शिव्यांची तर एकसारखी गोविंदरावांवर लाखोली चालविली होती. गोविंदरावांवर हात टाकण्यासाठीं मधून मधून ते आपल्या हातांच्या मुठी देखील वळीत होते; पण गोविंदराव चांगलेच शक्तिसंपन्न असल्यामुळें तसें करण्याचें विश्वनाथरावांस धैर्य झालें नाहीं. गोविंदरावांच्या मनावर या रागावण्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. ते पूर्ववत् शांतपणें बसले होते. उलट त्यांना विश्वनाथरावांच्या कित्येक चमत्कारिक ग्राम्य शिव्या ऐकून, हंसूं मात्र येई. इकडे गोविंदरावांस हंसूं आलें, म्हणजे तिकडे विश्वनाथरावांचा संताप दुणावत असे. विश्वनाथरावांचा संताप

वराच वाढला असून, त्यांनीं आतां पिशाच्चवृत्ति स्वीकारली आहे, तेव्हां आपण त्यांचा निरोप घेऊन जावें हें बरें, असा विचार करून गोविंदराव त्यांना 'जातों' म्हणून विचारून, आपल्या मार्गास लागले. विश्वनाथरावांनीं गोविंदरावाकडे नुस्तें पाहिलें देखील नाहीं. गोविंदराव घरांतून बाहेर पडल्यावर विश्वनाथरावांनीं सगळें घर गर्जून सोडलें. ही गर्जना गोविंदरावांचा नाश कोणत्या साधनांनीं करावयाचा यासंबंधानें होती, हें आमच्या वाचकांना निराळें सांगण्याची जरूर आहे, असें वाटत नाहीं.

गोविंदराव विश्वनाथरावांकडून निघून, नीट आपल्या घरीं आले. या वेळीं रात्र बरीच झाली होती. घरीं आल्याबरोबर गोविंदरावांनीं जेवणवगैरे आटोपून, ते आपल्या अंथरुणावर विश्रांति घेण्यासाठीं पडले. त्यांच्या मनाची स्थिति घडलेल्या एकंदर प्रकारामुळें मोठी चमत्कारिक झाली होती. झोंप यावी म्हणून ते मन स्वस्थ करण्याचा प्रयत्न करीत होते; परंतु तो त्यांना साधेना. विश्वनाथरावांनीं अद्वातद्वा भाषण करून, जे विचार प्रकट केले होते, ते गोविंदरावांच्या मनांत एकसारखे घोळत होते. त्या दुष्टाकडे जाऊन, आपण विनाकारण वाद केला, असें त्यांना वाटूं लागलें. कारण, दुष्ट लोक काय करतील आणि काय नाहीं याचा कांहीं नियम नाहीं, हें त्यांना माहीत होतें. शिवाय विश्वनाथरावांचें आजपर्यंतचें वर्तन त्यांच्या डोळ्यांपुढें असल्यामुळें त्यांना विश्वनाथरावांची थोडी भीतीहि वाटूं लागली. दुष्ट लोक परिणामाकडे दृष्टि न देतां, कांहीं भयंकर कृत्यें खुशाल करतात आणि त्याप्रमाणें विश्वनाथराव करावयास चुकावयाचा नाहीं, हें ते पूर्णपणें जाणून होते; तथापि कर्तव्य या दृष्टीनें पाहूं गेलें असतां त्यांचा उद्योग योग्य असाच

होता. आपण एका साध्वीसाठीं प्रयत्न करीत आहों, आणि त्याला ईश्वर यश देणारच देणार, अशी त्यांना खात्री होती. आपणांस थोडा फार त्रास पडेल ही गोष्ट खरी; परंतु त्यामुळें दुष्टांस शासन होऊन पुष्कळ लोकांना सुख मिळेल, अशी त्यांना आशा होती. कृष्णरावाचा तर त्यांना मोठा भरंवसा होता. कृष्णराव उद्यांच पोलिस वगैरे घेऊन येऊन, विश्वनाथरावांची कृष्णकारस्थानें बाहेर पडण्यांस आरंभ होईल, अशी त्यांना खात्री होती. या बाबतींत कितीहि त्रास पडला तरी हरकत नाहीं, परंतु विश्वनाथरावांस चांगलाच हात दाखविला पाहिजे, अशी त्यांनीं आपल्या मनाशीं गांठ बांधून ठेविली होती. याप्रमाणें गोविंदरावांचे अनेक विचार चालले असतां ते निद्रादेवीस वश होऊन स्वस्थ घोरूं लागले.

* * * *

नुकतेच रात्रीचे बारा वाजून गेले होते. जिकडे तिकडे शांततेचें साम्राज्य पसरलें होतें. रजनिनाथानें आकाशाच्या मध्यभागीं येऊन आपल्या कोमल किरणांनीं शीतल, परंतु पिठासारखा स्वच्छ प्रकाश पाडला होता. पृथ्वीवरील एकंदर निःस्तब्धता पाहून ती जणूं काय निद्रितावस्थेंतच आहे, असें वाटत होतें. या शांत वेळीं वाऱ्याची एकादी मंद झुळुक सुटली, तर झाडांचीं पानें वाजत व रात नांवाचे किडे मधुन मधुन किर्रे किर्रे असा नाद करीत; एवढीच काय ती गडबड होत होती. तारे लुकलुक चमकत होते. त्यावेळीं चंद्र, तारे आणि आकाश हीं सारीं पृथ्वीकडे पाहून हंसत आहेत असें वाटत होतें. मोठें आश्चर्य म्हणावयाचें! या पृथ्वीकडे पाहून त्यांना हंसण्याचें काय कारण बरें? तेजोमय तारका या वेळीं, विलक्षण दृष्टीनें पृथ्वीकडे

पाहात होत्या असें वाटे. पृथ्वीवर आपल्या कोमल किरणांनीं आल्हाद-कारक श्वेत प्रकाश पसरविणारा चंद्र, आपले तीक्ष्ण नेत्र विस्तृत करून कांहीं निराळ्याच जिज्ञासेनें आमच्या क्षुद्र पृथ्वीकडे पाहात होता. आकाशमंडळांतील या चमत्कारिक प्रकाराचें कारण फार निराळें होतें. या वेळीं पृथ्वीवरून अग्नीच्या प्रचंड ज्वाळा आकाशमंडळावर आदळून तारका व चंद्र यांना तेजोहीन करण्याचा प्रयत्न करीत होत्या. हा पोरकट व असाध्य प्रयत्न पाहून, सारें आकाशमंडळ गदगद हंसत होतें. आकाशमंडळाचें तें विकट हास्य—ह्या ज्वाला अंत्यत क्षुद्र आहेत असें सुचवित होतें; परंतु आम्हां क्षुद्र मानवांच्या दृष्टीनें त्या ज्वाळा अत्यंत प्रचंड होत्या. पृथ्वीवरील अत्यंत हानीकारक प्रकारच्या निदर्शक अशा त्या ज्वाळा होत्या. अवंतीपुरांतील एक मोठें घर अग्नीच्या तडाक्यांत पूर्णपणें सांपडून सर्वत्र हाहा:कार उडाला होता. एक मोठें घर सर्व बाजूंनीं पेटून त्याच्या ज्वाळा आकाशाशीं स्पर्धा करीत होत्या. धूमके-तूच्या लांब पुच्छाप्रमाणें ठिणग्यांचे झोतच्या झोत हवेवर उडून जात होते. आमच्या वाचकांनीं हें घर कोणाचें याची कल्पना केलीच असेल. अग्नीच्या भक्षस्थानीं पडलेलें हें भव्य व सुंदर घर गोविंदरा-वांचें होय. ऐन मध्यरात्रीं घरास एकदम आग लागली होती. घराच्या सर्व बाजू पेटल्या होत्या. गुरांचा गोठा, स्वयंपाकघर, मध्य-घर, ओसरी, माडी, दिवाणखाना वगैरे सर्व ठिकाणें अग्नीनें आपल्या कक्षेंत घेतलीं होतीं. अरेरे! बिचाऱ्या गोविंदरावांवर केवढा हा भयंकर प्रसंग!! गोविंदराव व त्यांची पत्नी आगीची कल्पना नसल्यामुळें झोंपेंत गुंग होतीं. गुरांच्या हंबरड्यांनीं दोघें जागीं होऊन त्या आगीच्या डोंबां-तून मोठ्या कष्टानें बाहेर पडलीं. गोविंदराव 'धांवा—धांवा—पाणी—पाणी'

म्हणून एकसारखा मोठ्यानें टाहो फोडीत होते. शेजारीपाजारी इकडचे तिकडचे लोक तो आगीचा डोंब पाहून भराभरा गोळा झाले; पण त्यांचा काय उपयोग? कारण, त्यांत गोविंदरावांच्या कळवळ्याचे अवघे पांच पंचवीस लोक होते. तेवढे बिचारे त्या प्रचंड आगीस शांत करण्यास अगदींच असमर्थ होते. बाकी सगळे तमासगीर! तो भयंकर हृदय-द्रावक प्रसंग मौजेच्या दृष्टीनें आनंदानें पहात होते. या तमासगिरांत धोंडीराज व माधवराव यांच्या स्वाऱ्या होत्या, हें निराळें सांगावयाला नकोच. घराच्या भोंवतालीं असलेल्या झाडांवरील पक्षांनीं आगीच्या आचीमुळें कोलाहल माजविला. ज्यांना उडतां आलें ते भराभर उडून गेले आणि ज्यांना उडतां आलें नाहीं, ते त्या प्रचंड अग्नींत पडून पटापट मेले. झाडांच्या शाखा त्या विलक्षण उष्णतेनें करपून जाऊन त्याहि पेटल्या. गोठ्यांत असलेलीं जनावरें आपणांस कोणी सोडवावें म्हणून दीन स्वरानें मोठमोठ्यानें हंबरडा फोडीत, परंतु त्या प्रचंड अग्नीच्या लोळांत जाऊन तीं जनावरें वांचविण्यास कोणीच समर्थ नव्हतें! बिचारीं सगळीं जनावरें आगीच्या तडाख्यांत सांपडून जळून खाक झालीं. त्या जनावरांचा हंबरडा ऐकून गोविंदरावांस त्यावेळीं काय वाटलें असेल याची कल्पनाच केली पाहिजे. पाहतां पाहतां सगळ्या घराची राख होऊन गेली. जेथें भव्य व सुंदर इमारत होती, तेथें धूळ उडूं लागली. जेथें रमणीय बाग होती, तेथें वणवा लागलेल्या अरण्याप्रमाणें भयाण दिसूं लागलें. या भयंकर प्रसंगीं समाधानास इतकीच जागा होती, कीं, परमेश्वरकृपेनें गोविंदराव व त्यांची पत्नी दोघें सुरक्षितपणें बाहेर पडलीं होतीं. वेणूची आई इंदिरा तें भयंकर वृत्त समजतांच तेवढ्या रात्रीं गोविंदरावांकडे येऊन त्यांना व त्यांचे पत्नीस आपल्या घरीं घेऊन आली.

गोविंदरावांचें यावेळीं किती नुकसान झालें असेल व त्यासंबंधानें त्यांना काय वाटलें असेल, याची वाचकांना कल्पना करण्यास सांगण्यावांचून कांहीं इलाज नाहीं. त्या भयंकर प्रसंगाचें वर्णन गोविंदरावावांचून इतरांस क्वचितच करितां येईल. घर पुन्हां बांधतां येईल, पैसा पुन्हां मिळवितां येईल; पण पुन्हां प्राप्त होणार नाहींत अशा कित्येक वस्तूंची गोविंदरावांस आठवण झाली, म्हणजे त्यांची छाती विदीर्ण होऊन जाई, डोळे पाण्यानें भरून येत आणि क्षणोक्षणीं उचंबळणारा रडण्याचा वेग थांबविण्यास ते असमर्थ होऊन जात. कांहीं आवडत्या जनावरांचें विस्मरण होतें न होतें, तोंच त्यांना जीवाहूनहि अत्यंत प्रिय अशा ग्रंथांची आठवण होई. त्या आठवणीनें त्यांची स्थिति तर अगदीं वेड्यासारखी होई. कसें तरी धैर्य धरून अम्मळ वर बघण्याचा प्रयत्न करीत, तोंच प्रशांत पुष्प वाटिकेंतील फुलझाडें त्यांच्या पुढें उभीं रहात. कृष्णरावाच्या कित्येक वस्तूंच्या आठवणीनें तर त्यांना पुरें पुरें भंडावून सोडलें होतें. गोविंदरावांची ती हृदयद्रावक स्थिति रेखाटण्यास आमची लेखणी अगदींच असमर्थ आहे.

बिच्याऱ्या गोविंदरावांवर ही आग कोणी पाखडली असावी, याचें अनुमान सहज होण्यासारखें आहे. विश्वनाथरावांनीं एवढें वैर साधून काय जोडलें असेल, तें त्यांचें त्यांनाच माहीत! विश्वनाथरावांच्या या अविचारी भयंकर कृत्याबद्दल कित्येकांना मनस्वी संताप वाटे; पण त्या दुष्टास त्याबद्दल जाब विचारण्याचें कोणास धैर्य होतें? किंवा या भयंकर अपराधाबद्दल त्यांस योग्य असें प्रतिफल देण्यास तरी कोण समर्थ होता? अनापराधी, कोणाचें मन ज्यानें कधीं एका शब्दानें देखील दुखविलें नव्हतें, ईश्वरभजनांत जो सदैव लीन असे, परोपकार हेंच जो आपलें

कर्तव्य समजत असे, दीन, दुःखी, अनाथ, पंगु, यांच्यासाठीं जो तन-मनधनानें वारंवार झीज सोशी, त्या महाभागाचें घर जेव्हां पेटलें, तेव्हां दयामय ईश्वरानें वरून पाऊस पाडून तें विझवायास पाहिजे होतें; परंतु उन्मत विश्वनाथरावांच्या भीतीमुळें ईश्वरानें तसे केलें नाहीं कीं काय कोण जाणे! कसेंहि असो. दुरात्म्यास त्यांच्या नीच कृतीचें प्रतिफल केव्हां ना केव्हां तरी मिळतें, या वचनावर विश्वास ठेवून तूर्त आपण पुढें वळूं.

## प्रकरण दुसरें.

# हिमू.

मुंबईस चौपाटीच्या बाजूला एक लहानसा पण सुंदर बाग असून, त्या बागेस विशेष शोभा येईल असा एक रमणीय बंगला बागेच्या मध्यवर्ती आहे. सायंकाळच्या मनोरम वेळीं, या बंगल्याच्या पुढील बाजूला असलेल्या सज्जांत आराम खुर्चीवर बसून एक चोवीस पंचवीस वर्षांची तरुण स्त्री "रमणीबोध" या नांवाचें काव्य वाचीत बसली होती. या स्त्रीच्याजवळच एक तीन चार वर्षांची मुलगी कांहीं खेळ खेळत होती. या तरुण स्त्रीचें नांव रमाबाई असें असून, तिच्याजवळ खेळत असलेल्या मुलीचें नांव हिमू असें होतें. रमाबाईचा वर्ण गौर होता; तथापि तो पूर्ण उज्वल नसून कांहींसा तांबूस असा होता. ती शरीरानें मध्यम बांध्याची असून गोंडस होती. तिचे डोळे सतेज व सुबक होते. तिचें नाक उंच असून तरतरीत होतें. एकंदरींत तिचे सर्व अवयव जसे पाहिजे तसे असल्यामुळें ती मोठी रमणीय दिसत असे. यावेळीं तिनें महेश्वरी कृष्णवर्णाची सर्वोत्कृष्ट चंद्रकळा परिधान केली असून, अंगावर थोडेच पण चांगले ठसठशित दागिने घातले होते. ती जें पुस्तक वाचीत होती, त्याकडे तिचें सर्व लक्ष लागलें होतें; तथापि मधुन मधुन ती आपल्या सुकुमार मुलीकडे पहात असे.

या मनोहर मुलीचें नांव रमाबाईनीं, मुलगी हिंवाळ्यांत झाली म्हणून हिमालया असें ठेविलें होतें; तथापि त्या तिला हिमू या लाडक्या नांवा-

नेंच नेहमीं हांका मारीत असत. हिमू शरीरानें सुदृढ असून सुंदर व चलाख होती. तिचा स्वभाव गोड असून तिचें बोलणें फार मधुर होतें. तिच्या चेहऱ्यांत विलक्षण चित्ताकर्षकपणा भरलेला होता. ज्याच्या ज्याच्या म्हणून ती पोर दृष्टीस पडे, त्यास तिला उचलून घेऊन तिच्याजवळ भिक्षावृत्तीनें निदान एक तरी पापा मागावा असें वाटे. तिला कोणीं कांहींहि विचारा, त्याचें उत्तर ती चटकन व मौजेचें देई. घरांत कोणीहि येवो, त्यांस हिमूजवळ दोन शब्द बोलण्याची इच्छा व्हावयाचीच. हिमू या वेळीं एक लहानशी लांकडाची पेटी घेऊन खेळत बसली होती. या पेटींत लहान लहान सात आठ प्रकारच्या सुंदर सुंदर बाहुल्या होत्या. या बाहुल्यांबरोबर तिचें खेळणें चाललें होतें. कोणा बाहुलीस ती मुलगा, कोणा बाहुलीस ती मुलगी, कोणास सून, तर कोणास जांवई, कोणास गडी, मोलकरीण, अमुक तमुक अशीं निरनिराळीं नांवें देऊन, त्या बाहुल्यांकडून ती एक संसार हांकीत होती. तिच्या मनांत एका बाहुलीस मुलगा कल्पून त्याचें लग्न करण्याचें आलें. ही कल्पना तिचे डोक्यांत येतांच तिनें त्याप्रमाणें कार्यास आरंभ करून ती स्वतःशीं स्पष्टपणें ही मुलगी, हा सासरा, ही सून, हा जांवई वगैरे बडबड करूं लागली. त्या बाहुल्यांना ती लांकडाची पेटी एवढेंच काय तें जग. त्या पेटींत त्या बाहुल्या अहोरात्र निद्रिस्थ असावयाच्या. तास दोन तास हिमू त्यांना खेळवीत असे, तेवढीच कायती त्यांची जागृति. कित्येक वेळां तर बिचाऱ्या आठ आठ दहा दहा दिवस त्या पेटींत तशाच अंधारांत पडून रहात असत. हिमूनें मेहेरनजर करून आज सर्वांना मोकळ्या हवेचा व उजेडाचा लाभ दिला होता. सर्व बाहुल्यांना झाडून पुसून स्वच्छ करून चांगल्या प्रकारचे कपडे घातले

होते व त्यांना दागदागिने घालून खूप थाटविलें होतें. कारण आज लग्न होतें, तेव्हां लग्नाचे वेळीं थाटमाट हा पाहिजेच. हिमूनें त्या लग्नाची बरीच गडबड चालविली होती. रमाबाई वाचनांत अगदीं गढून गेल्या होत्या, परंतु हिमूच्या या गडबडीमुळें त्यांनीं हातांतलें पुस्तक खालीं ठेविलें आणि त्या हिमूच्या चिमुकल्या संसाराकडे सकौतुक पाहूं लागल्या. तिचा एकंदर खेळ अवलोकन केल्यावर त्या म्हणाल्या,

" हिमू, आज तर काय मोठा थाट केला आहेस !"

हिमू आपल्या खेळांत अगदीं दंग झाली असल्यामुळें रमाबाईचे शब्द तिच्या कानावर मुळींच गेले नाहींत. हिमूकडून कांहींच उत्तर येत नाहीं, असें पाहून, रमाबाई पुन्हां म्हणाल्या,

" कां हिमू, आज आमच्याशीं बोलायाचें नाहीं वाटतें? आपल्या बाहुल्यांशींच खेळण्यांत अगदीं चूर झाली आहेस तो?"

हिमू लग्नाच्या मोठ्या गडबडींत होती. त्यामुळें रमाबाई काय म्हणतात त्याकडे तिचें मुळींच लक्ष गेलें नाहीं. रमाबाई जर हिमवर जोरानें कर्कशपणें ओरडल्या असत्या, तर ती पोर तेव्हांच आपल्या लग्नमंडपां-तून बाहेर आली असती; परंतु रमाबाईनीं तसें न करितां हळूच हिमूला कळूं न देतां तिची एक बाहुली लपवून ठेविली व त्या पुन्हां आपलें पुस्तक वाचूं लागल्या. पुढें हिमूला जेव्हां त्या बाहुलीची जरूर लागली, तेव्हां ती तिला तेथें कोठेंच दिसेना. झालें, त्याबरोबर हिमूचा मोठा घोंटाळा उडाला. जी बाहुली हरवली होती, ती साधारण अशी तशी नसून, मुख्य नवऱ्या मुलाचीच होती. मुख्य नवऱ्या मुलानेंच जेव्हां लग्नमंडपांतून पलायन केलें, तेव्हां हिमूला तर काय करावें आणि काय नाहीं तें मुळींच सुचेना. ती त्या बाहुलीस शोधशोधून दमली; पण तिला

तिचा मुळींच शोध लागला नाहीं. शेवटीं कंटाळून ती आपल्या आईस हिरमुसल्या चेहऱ्यानें व रडव्या स्वरानें म्हणाली,

"आई, माझी बाहुली काय झाली?"

रमाबाई किंचित् हंसल्या व म्हणाल्या,

"हिमू, तुझें काय हरवलें?"

हिमूला आपल्या आईच्या हंसण्याचें कारण उमगलें नाहीं. तिला आपली बाहुली कशी हरवली, ती कशी सांपडेल, ती कोठें असेल, अशी मोठी काळजी लागली होती; यामुळें रमाबाईंच्या हंसण्याकडे तिचें लक्षच गेलें नाहीं. ती पुन्हां म्हणाली,

"आई, माझी बाहुली कोठें आहे?"

रमाबाई हंसत हंसत म्हणाल्या,

"तुझी बाहुली कोठें आहे तें मला काय माहीत?"

रमाबाईस कोणती बाहुली हरवली तें हिमूकडून समजाऊन घ्यावयाचें होतें. कारण त्या तिच्या शब्दांत मोठी मौज असली पाहिजे अशी त्यांची अटकळ होती. हिमू अज्ञान पोर. तिला रमाबाईंचा जरी हेतु कळला नाहीं, तरी ती सहज लीलेनें कसरत करणाऱ्या मुलांप्रमाणें खुर्चीवर चढून आईच्या मांडीवर बसली व म्हणाली,

"आई, माझी बाहुली हरवली आहे, ती पाहून देतेस का?"

रमाबाई हिमूला कुरवाळून म्हणाल्या,

"हिमू, तुझी कोणती बाहुली हरवली?"

हिमू आपल्या चिमुकल्या हातानें गमतीचे हातवारे करीत म्हणाली,

"अग, ती-दादांनीं नव्हती का परवां बाजारांतून आणली ती, ती तांबडी होती आणि तिचें पोट दाबलें म्हणजे टाळ्या वाजवी—ती बरें."

एवढ्यानें रमाबाईंचें समाधान झालें नाहीं. त्या म्हणाल्या,

"ती का? केव्हांशीं गे हरवली हिमू ती बाहुली? तूं पेटी इकडे आणलीस तेव्हां होती का?"

चोरीस गेलेल्या वस्तूचा मालक पोलीसला जशी कळकळीनें माहिती देत असतो, त्याप्रमाणें अनन्यभावानें हिमू आपल्या आईला म्हणाली,

"हो, पेटी आणली तेव्हां त्यांत होती—आतां इतक्यांत होती—मी कीं नाहीं, या येथें ती बाहुली उभी करून ठेविली होती."

पाहिजे होतें तें उत्तर न मिळाल्यामुळें रमाबाई तिला पुनः म्हणाल्या,

"हिमू, तेथें ग कशाला तूं ती बाहुली ठेविली होतीस?"

हिमू बाहुली सांपडावी म्हणून रमाबाईंना जास्त माहिती देऊं लागली. ती म्हणाली,

"आज किं नाहीं आई, बाहुलाबाहुलीचें लग्न लावावयाचें होतें ही पहा ही नवरीमुलगी, हा सासरा, ही सासू, ह्या करवल्या आणि येथें तो नवरा मुलगा उभा करून ठेविला होता; पण इतक्यांत तो कसा नाहींसा झाला कोण जाणें!"

बाहुलीसाठीं हिमूची झालेली केविलवाणी स्थिति पाहून रमाबाईंस हंसूं आवरेनासें झालें; तथापि तसेंच हंसूं आवरून त्या म्हणाल्या,

"बरें बेटा, जाऊंदे हो ती बाहुली. मी तुला दुसरी आणून देईन बरें."

हिमू हें ऐकून फारच खिन्न झाली. ती म्हणाली,

"आई, मला दुसरी नको गडे. तीच देईनास पाहून."

हिमूच्या खिन्नतेची रमाबाईंस मोठी मौज वाटली. त्या तिच्या सुकुमार गालांचें चुंबन घेऊन म्हणाल्या,

"बाळ हिमू, हरवलेली बाहुली मी कोठून देऊं बरें? तुला मी पाहिजे असेल तर दुसरी आणून देतें, मग तर झालें कीं नाहीं?"

त्या निष्कपट अर्भकास हरवलेल्या बाहुलीवरचें प्रेम तटकन् तोडून टाकतां येईना. ती रमाबाईचें आर्जव करीत म्हणाली.

"जा गडे आई! मला दुसरी नको. मला तीच पाहिचे."

रमाबाई किंचित स्मित करून म्हणाल्या,

"बरें हिमू, मी जर तुला बाहुली दिली, तर मला लग्नाच्या वेळीं जेवावयाला बोलावशील का?"

हिमूस रमाबाईच्या या बोलण्यावरून बाहुली सांपडणार अशी आशा उत्पन्न झाली. ती आपल्या आईला लडिवाळपणानें म्हणाली,

"हो हो, तूं जर मला भातुकली देशील, तर बोलावीन. पण आई माझी बाहुली कोठें आहे?"

रमाबाईनीं पाहिलें आतां फार ताणण्यांत अर्थ नाहीं. नाहींतर हिमू अधिक खिन्न व्हायची आणि लग्नाचे वेळीं वाजंत्री नाहींत ते सुरू व्हायचे. तेव्हां झाली इतकी मौज पुरे, असें वाटून त्यांनीं आपल्या पदराखालीं लपवून ठेवलेली बाहुली हिमूस देऊन टाकली. बाहुली हातांत पडल्याबरोबर हिमूला मोठा आनंद झाला; पण त्याबरोबरच तिला आपल्या आईचा थोडासा राग आला. ती म्हणाली,

"मी आतां आपला खेळ दूर मांडतें. म्हणजे तूं माझ्या बाहुल्या चोरावयाची नाहींस."

असें म्हणून हिमूनें आपल्या बाहुल्या भराभर पेटींत दडपल्या आणि ती जरा दूर जाऊन खेळत बसली. रमाबाईहि पुन्हां आपलें पुस्तक हातांत घेऊन वाचूं लागल्या.

जग हें ईश्वरानें मोठें थोरकें चमत्कृतीचें भांडारच निर्माण केलें आहे असें वाटतें. सुख दुःख, हर्ष शोक, स्वास्थ्य अस्वास्थ्य, वगैरे व्युत्क्रम मनोविकार आम्ही प्रतिक्षणीं पाहतों. या चमत्कृतीच्या दर्शनानें आम्हीं थिजून जातों, आणि विचारानें कुंठित होतों. जगांत अनेक प्रकारचे परस्परविरोधी प्रकार अक्षय चाललेले असतात. कोणी खेळतो तर कोणी पडतो, कोणी हंसतो तर कोणी रडतो, कोणाची उन्नति तर कोणाची अवनति, कोणास व्यापारांत फायदा होतो तर कोणाचें त्याच धंद्यांत दिवाळें निघतें, एकीकडे अबादानी तर दुसरीकडे कराल दुष्काळ, एकीकडे स्वातंत्र्य तर दुसरीकडे पशुतुल्य गुलामगिरी, अशा प्रकारचे प्रकार जगांत चालू आहेत आणि ते चालू राहणारच. हे प्रकार एकाच वेळीं, एकाच ठिकाणीं देखील दृष्टीस पडतात. तिकडे रमाबाईच्या माहेरीं या वेळीं मोठा आकांत उडाला होता; पण इकडे स्वतःच्या घरीं त्या आपल्या हिमूबरोबर खुशाल खेळत होत्या.

गोविंदराव व त्यांची पत्नी हीं दोघेंहि शोकांत अगदीं चूर झालीं होतीं. बिचाऱ्यांचें घर जळून नुकतेच दोन दिवस झाले होते, तोंच कृष्णराव समुद्रांत बुडाल्याची अशुभ वार्ता धोंडीराजानें नावाड्यांकडून त्यांच्या कानावर घातली. एकाद्या जुनाट झाडावर वीज कडाडली म्हणजे, तें झाड जसें मुळासकट उपटून पडतें, त्याप्रमाणें ही अशुभ वार्ता गोविंदरावांच्या कानांवर पडतांच ते मूर्छित होऊन धाडकन् जमिनीवर पडले. कृष्णरावाची आई तर पुत्रशोकानें शुद्ध वेडी होऊन गेली. वेणूची आई इंदिराबाई, तिची तर वरील शोकवार्तेनें कम्बरच खचली. तिचें सर्व धैर्य गळून जाऊन कृष्णरावाच्या आईबापांची समजूत कशी करावी हें तिला सुचेना. श्रीपाद तर बोलून चालून अज्ञान

मूल. तो तर या आक्रांतानें गोंधळूनच गेला. याप्रमाणें या दुःखार्णवांत वरील सर्व मंडळी मोठ्या कष्टानें एकेक दिवस कंठित होती, आणि तिकडे रमाबाई हिमूबरोबर खेळण्यांत, तिच्याशीं गोडगोड बोलण्यांत, तिची श्रद्धा करण्यांत गुंग झाल्या होत्या. हा प्रकार सृष्टीच्या व्युत्क्रमगतीनें बरोबर होता किंवा नाहीं हा जरा प्रश्नच आहे. धोंडीराजास व विश्वनाथरावांस वाटणाऱ्या आनंदासंबंधानें तसें म्हणतां येईल; परंतु रमाबाईची स्थिति तशी नव्हती. आपले आई, बाप, भाऊ कुशल आहेत, असें समजून त्या हिमूबरोबर क्रीडत होत्या. यांत त्यांचा कांहीं अपराध होता असें मुळींच नाहीं. वेणूविषयीं मात्र रमाबाईंना थोडें थोडें वाईट वाटत असे; कारण ती नाहींशी झाल्याचें त्यांना कळलें होतें, परंतु ती कोठें गेली, अथवा तिला कोणी पळविलें, किंवा तिनें आपल्या जीवाचें कांहीं बरें वाईट करून घेतलें वगैरे विचार त्यांच्या मनाला कधीं शिवले नाहींत. त्या वेणूसंबंधानें अगदीं उदासीन असत. वेणु नाहींशी झाल्यामुळें कृष्णरावाचें लग्न कसें होईल, ही काळजी त्यांना मुळींच नव्हती. कृष्णराव चांगला विद्यासंपन्न, सुशील व सुस्वरूप असल्यामुळें वेणूपेक्षां सवाई वेणु कृष्णरावाचे घरीं आपल्या पायानें चालत येईल, अशी त्यांची खात्री होती.

तिकडे धोंडीराज व माधवराव यांच्या सर्व गोष्टी सुरळितपणें चालल्या होत्या. त्यांचा मठ अजून कायम होता. तो मठाधिपति, तो संन्यासी वगैरे सर्व मंडळीचीं व्रतें अथवा अनन्वी कृत्यें पूर्ववत चालू होती. वेणु विश्वनाथरावांच्या घरांतील एका खोलींत तुरुंगवास भोगीत होती. त्या हालअपेष्टांत ती कशी दिवस कंठित असेल त्याची कल्पना तिच्या वांचून इतरांना होणार नाहीं. विश्वनाथरावांस मात्र आतां स्वर्ग काय तो दीड

बोट उरलेला होता. या लढाईत सर्वतोपरी आपलाच जय झाला, याबद्दल त्यांना मोठा अभिमान झाला होता. ही सर्व कृपा श्रीशंकराची असें समजून त्यांनीं श्री अलकेश्वरास एक महारुद्राचें आवर्तन करून व विद्वान ब्राह्मणांना योग्य दक्षिणा देऊन पंचपक्वान्नांचें मोठें टोलेजंग भोजन सर्वांना दिलें. याशिवाय दुसरींहि बरींच सत्कृत्यें त्यांनीं या उत्सवाप्रीत्यर्थ या वेळीं केली. असो.

रमाबाई हिमूबरोबर जरी आनंदानें खेळत होत्या, तरी त्यांच्या चेहऱ्यावर चिंतेची थोडी थोडी झांक दिसून येत होती. त्यांच्या माहेरून बरेच दिवसांत पत्र अथवा निरोप नसल्यामुळें त्यांना साहाजिकच थोडी काळजी वाटत होती. रमाबाईंचें माहेर अवन्तीपुरास होतें, हें आता आमच्या वाचकांना निराळें सांगावयास नको. अवन्तीपुरास पोस्टाची सोय चांगल्या प्रकारची होती; तरी पत्र जाण्यायेण्यास दोन दिवस लागत असत. कारण पोस्टाचा संबंध बोटीशीं नसून दूर असलेल्या रेल्वे स्टेशनाशीं होता. पण दोनच्या ऐवजीं चार आठ पंधरा दिवस झाले, तरी रमाबाईंस अवन्तीपुराहून पत्र नाहीं! माहेरची हकीकत कांहींच कळेना!! बिचारे पोस्टमास्तर अवन्तीपुरचे राजे विश्वनाथराव यांच्या हातांतलें बाहुलें होतें. गोविंदराव रमाबाईंस जीं पत्रें पाठवीत तीं व रमाबाईकडून गोविंदरावांस जीं पत्रें येत तीं सर्व विश्वनाथरावांकडे पोस्ट मास्तर साहेब पावतीं करीत. विश्वनाथराव त्या सर्व पत्रांचें निरीक्षण करून, लागलींच तीं अग्नीच्या भक्षस्थानीं लोटून देत. पत्रांचा असा घोटाळा होत असल्यामुळें रमाबाईंस आपल्या माहेरची कांहींच हकीकत कळेना. यामुळें त्यांच्या मनाला मोठी हुरहुर लागली होती. त्या जरी पुस्तकांकडे आपलें लक्ष लावण्याचा प्रयत्न करीत होत्या, तरी

तें खरोखर केशवरावांकडे लागलें होतें. पुस्तक वाचीत असतांना त्या रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांकडे मधून मधून पहात असत. याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यावर केशवरावांची गाडी आली व केशवराव गाडींतून उतरून वर माडीवर आले. केशवरावांना पाहतांच हिमूचा आनंद गगनांतहि मावेना. ती 'दादा आला दादा आला' असें म्हणून आनंदानें नाचूं उडूं लागली. हिमूचा हा विलक्षण आनंद पाहून रमाबाई म्हणाल्या,

" हिमू, यांत एवढा तुला आनंद तो कशाचा झाला?"

हिमू पूर्ववत उड्या मारीत मारीत म्हणाली,

"आई, मी कीं नाहीं दादाला आतां सगळें सांगेन. माझी बाहुली लपवून ठेविली होतीस तें पण सांगेन."

हिमूचें तें बोलणें ऐकून रमाबाईच्या अंतःकरणास गुदगुदल्या झाल्या. त्या म्हणाल्या,

" अहाहा ! केवढा पण मला धाक दाखवीत आहेस !"

केशवराव बाहेरून आल्याबरोबर त्यांनीं पागोटें, कोट, विजार वगैरे कोर्टाचा पोषाख काढून ठेवून, प्रथम हिमूला उचलून घेतलें व तिला पोटाशीं कुरवाळून धरून तिचे दोन तीन मुके घेतले. हिमूला बापाचा याप्रमाणें भक्कम आश्रय मिळाल्यावर तिनें आईविरुद्ध कागाळी करण्यास आरंभ केला. ती म्हणाली,

" दादा, आज कीं नाहीं, आईनें माझी बाहुली लपवून ठेविली होती बरें का!" केशवराव म्हणाले,

" मग, ती तूं शोधून काढलीस का?"

"मला कीं नाहीं दादा, दुसऱ्या बाहुलीचें त्या बाहुलीबरोबर लगीन लावावयाचें होतें. मी शोधून शोधून दमलें, पण मला कांहीं सांपडेना. मग ती आईनें दिली."

"मग लावलेंस कां तूं लगीन?"

"नाहीं लावलें लगीन. आई म्हणाली कीं, तुला भातुकली देईन, पण कांहीं दिली नाहीं. दादा तूं देशील खाऊ आणून?"

बापलेकीचा याप्रमाणें संवाद चालला असतांना, रमाबाई आपल्या मृदु हातानें हिमूचा गाल धरून म्हणाल्या,

"तिला आतां खरोखरचा वकील भेटला आहे. काय पण एकेक गाऱ्हाणीं सांगते आहे. या हिमूचें आतां लगीन लावून टाका, म्हणजे जाईल ती आपल्या नवऱ्याकडे."

हिमू केशवरावांच्या कडेवर असतांनाच म्हणाली,

"पण दादा, तूं म्हणालास कीं नाहीं, कीं, इतक्या लवकर कांहीं लगीन करावयाचें नाहीं म्हणून?"

हिमूच्या गोडगोड गोष्टी बराच वेळ ऐकून घेतल्यावर केशवरावांनीं तिला खेळण्यासाठीं मोकळें सोडून देऊन, ते एका आराम खुर्चीवर स्वस्थ पडले व जवळच पडलेलीं त्या दिवसाचीं ताजीं वर्तमानपत्रें उलथींपालथीं करूं लागले. रमाबाई तेथें जवळच मर्यादेनें उभ्या होत्या. त्या हळूच म्हणाल्या,

"आज कांहीं बाबांकडचें पत्र वगैरे आलें आहेका?"

केशवराव म्हणाले,

"छेः! मुळींच नाहीं. मला आतां तिकडची मोठी काळजी वाटूं लागली आहे. कृष्णरावाकडून दोन दिवसांनीं तीन दिवसांनीं हटकून

पत्र येत असे, पण आज पंधरा दिवस झाले, तरी मुळींच पत्र नाहीं. मी पत्र पाठवितों त्याचेंहि उत्तर नाहीं. हा काय घोंटाळा आहे हें मला तर कांहीं कळत नाहीं."

"पण 'पत्र नाहीं, पत्र नाहीं' असें म्हणून आतां वाट तरी किती पहावयाची? मला तर बाई मोठी हुरहुर लागली आहे. मी म्हणतें, एकदां स्वतः जाऊन पहावयाचें होईल तर बरें. म्हणजे काय आहे तें तरी कळेल."

"माझ्याहि मनांत तसेंच आलें आहे. मला आतां दोन तीन दिवसांची सवडहि आहे, तेव्हां जाऊन यावें हेंच बरें."

रमाबाई हळूच म्हणाल्या,

"मला बरोबर नेण्यास कांहीं हरकत नसली, तर मीहि येईन म्हणून म्हणतें. बरेच दिवसांत आईला व बाबांना भेटलें नाहीं. कृष्णरावालाहि येथून जाऊन बरेच दिवस झाले आहेत; तेव्हां बरोबर नेली तर अनायासें भेट होईल."

"पण मला वाटतें आतांच दोघांनीं जाऊं नये. मीं अगोदर जाऊन येतें, आणि मग पाहिजे तर जाऊं."

रमाबाई यावर अधिक कांहीं बोलल्या नाहींत. माहेरीं जाण्याची उत्सुकता सर्व स्त्रियांना असतेच; परंतु तेवढ्यासाठीं हट्ट घेणें हें रमाबाईस माहित नव्हतें. त्यांनीं केशवराव नाहीं म्हणतात यांत कांहींतरी हेतु आहे असा विचार करून, स्वतःबद्दल जाण्याचा नाद सोडून दिला. केशवरावांनीं दुसरे दिवशीं जाण्याचें नक्की ठरवून, त्याप्रमाणें दाहांच्या बोटीनें ते अवन्तीपुरास निघून गेले.

---

## प्रकरण तिसरें.

### माया.

कृष्णवसन परिधान केलेली वसुंधरा, त्या कृष्णवसनास अगदीं कंटाळून गेली होती. पीतवर्णाचा सुवर्णशालू प्राच्यदिशेकडून केव्हां येईल असें तिला झालें होतें. या वेळीं समुद्र अगदीं शांत होता. समुद्रकांठचा भूप्रदेश जनशून्य असल्यामुळें, स्तब्धतेचेंच जणूं काय साम्राज्य पसरलें होतें. या बलवत्तर साम्राज्यांत मधून मधून समुद्राच्या लाटा खळबळ करून व वाऱ्याच्या योगानें झाडांचीं पानें सळसळ वाजून दंगाधोपा करीत; पण तेवढ्यानें स्तब्धतेस व्यत्यय येत नव्हता. समुद्रतीराला एक लहानशी नौका असून, दोन नावाडी तिची व्यवस्था करीत होते. समुद्रतीरापासून थोड्या अंतरावर एक लहानसा आश्रम असून, त्या आश्रमांत या वेळीं एक तरुण नवयौवनसंपन्न स्त्री व एक तरुण संन्यासी एका दिव्याजवळ बोलत बसलीं होतीं. तो संन्यासीं मार्गस्थ होण्याच्या तयारीनें तेथें बसून त्या तरुणीस जातेवेळीं दोन हिताच्या गोष्टी सांगत होता. ती तरुणी विषण्ण वदनानें त्याचें म्हणणें ऐकत होती निराशेच्या चिन्हांनीं तिचा चेहरा मुद्रित झाला होता. तिच्या नेत्रांतून टपटप अश्रु गळत होते. तिला त्या स्थितींत पाहून त्या संन्याशाचें हृदय अत्यंत कळवळून आलें. तो तिला कोमल स्वरानें म्हणाला,

“ मनोरमे, कां उगीच रडतेस ? तूं कितीहि शोक केलास, तरी कांहीं उपयोग आहे का ? झाली गोष्ट ती झाली, तिला कोणाचा उपाय

होता का? असें वेड्यासारखें काय बरें करतेस? तुझी इच्छा असेल तर चल, मी तुला तुझ्या घरीं पोहोंचती करितों."

मनोरमा किंचित् काळ स्तब्ध बसली. नंतर अश्रु ढाळीत म्हणाली,

"सच्चिदानंद, घरीं मला कोणाजवळ नेऊन घालणार? त्या जनसमूहाचें दर्शन पुन्हां मला कशाला घडवितां? नको नको! त्या जनसमूहाच्या अंगावरून वहात आलेला वारादेखील मला आतां विषासारखा वाटतो. मी आपला निर्वाह या कंदमुळांवर अथवा या झाडपाल्यावर करीन, पण मला त्या दुष्ट लोकांचें दर्शनदेखील नको."

सच्चिदानंद शून्य दृष्टीनें भूमीकडे पाहून म्हणाला,

"मनोरमे, तूं अगदींच वेडी आहेस. घरीं तुझी वृद्ध आई आहे, तिला तरी आतां तुझ्यावांचून कोण आहे बरें?"

मनोरमा आपल्या वामकरांगुलीचा आपल्या मृदु हनुवटीस किंचित आधार देऊन म्हणाली,

"सच्चिदानंद, तुम्हींदेखील मवां असें म्हणालांत कीं, माझी वृद्ध आई घरीं आहे. तिला तरी आतां तुमच्यावांचून कोण आहे बरें?"

सच्चिदानंदास काय बोलावें तें सुचेना. तो मनोरमेची अनेक प्रकारांनीं समजूत करण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु मनोरमेच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होईना. थोडा वेळ विचार करून तो म्हणाला,

तुझें म्हणणें बरोबर दिसतें; परंतु मी जी दीक्षा पत्करली आहे, ती योग्य रीतीनें पाळणें हें माझें कर्तव्य आहे. देशोदेश फिरून, जी कांहीं देशसेवा होईल ती करावी, असा माझा संकल्प आहे व तसें करणें माझें कर्तव्य आहे. मीं माझ्या जन्मदात्या आईपेक्षां आपल्या मातृदेशास अधिक पूज्य समजतों. तिचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. मी तिचा

अत्यंत ऋणी आहें. या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न मीं जर केला नाहीं, तर मी मनुष्य आहें, असें म्हणवून घ्यावयाला माझी मलाच लाज वाटेल. या माझ्या कर्तव्याचा तूं जर विचार करशील तर मी म्हणतों तेंच बरोबर आहे, अशी तुझीदेखील खात्री होईल."

हें ऐकून मनोरमा थोडावेळ सचिंत बसली. डोळ्यांत आलेलें पाणी पदरानें पुसून ती म्हणाली,

"तुम्हीं म्हणतां त्या मातृभूमीच्या ऋणाचा बोजा माझ्यावरहि अर्थात कांहीं असेलच? तुम्हीं त्या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा आणि या पापिणीला त्या ऋणांत असेंच खितपत रहा म्हणून सांगावें, हें बरें ना? सच्चिदानंद, तुम्हीं आपल्या सहवासाचा लाभ या अभागिनीला दिल्यास, मीदेखील या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीन. माझें म्हणणें तुम्हांला उचित नाहीं का वाटत? ज्या अनाथीचें मलीन मुख पाहण्यांत लोक पाप समजतात, त्या अनाथीस तुम्हीं दूर लोटून देत आहां, हें तुमच्या या वृत्तीला बरें दिसतें ना?"

मनोरमेचे ते उद्गार ऐकून, सच्चिदानंद एक दीर्घ श्वास सोडून स्तब्ध बसला. मनोरमेच्या प्रश्नास काय उत्तर द्यावें हें त्यास सुचेना. सच्चिदानंद स्तब्ध व सचिंत बसलेला पाहून मनोरमा म्हणाली,

"सच्चिदानंद, मीं आपलें सगळें आयुष्य असेंच कंठावयाचें ना? हें आयुष्य संपण्यासाठीं मी काय करूं, तें तरी मला एकदां सांगा. मी सर्वस्वी तुमच्या भरंवशावर होतें. मी कितीतरी आशातीत अंतःकरणानें तुमच्याकडे बघत असें; पण आतां मला सर्वच निराशेचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. मला सुख देणें अथवा दुःख देणें सर्वस्वीं तुमच्या

स्वाधीन आहे. मला सहवासाला घेतल्यावांचून तुम्हीं कोठेंहि जाऊं नका. तुम्हीं जिकडे जाल तिकडे यायला मी तयार आहें. मी बालविधवा, दरिद्री, मला आपल्या मागें दारोदर फिरून भीक मागावयाची मुळींच लाज नाहीं. मी त्या स्थितींत समाधानानें राहीन. आपल्या सहवासानें माझें हृदय हळू हळू निर्मल होईल. मला दूर लोटूं नका; एवढेंच मी तुमच्याजवळ पुन:पुन: मागतें."

सच्चिदानंद मोठ्या घोटाळ्यांत पडला होता. मनोरमेला बरोबर न्यावी तरी पंचाईत, न न्यावी तरी पंचाईत. अशा दुहेरी पेंचांत तो सांपडला होता. मनोरमेला काय सांगावें हें त्याला मुळींच सुचेना. बराच वेळ गेला, तरी सच्चिदानंदाकडून कांहींच उत्तर येत नाहीं, असें पाहून मनोरमा म्हणाली,

"सच्चिदानंद, मी समजलें तुम्हीं स्तब्ध कां तें. तुम्हाला वाटत असेल कीं, ही मनोरमा मोठी पापिष्ठा, चांडाळीण आहे. हिला आपल्या सहवासाला न घेणें बरें, असा तुम्हीं विचार केला असेल; परंतु तुम्हींच सांगा बरें, कीं, मीं या जगांत राहून पाप तरी काय केलें आहे? मीं आजवर कोणाची कपर्दिका चोरली नाहीं. कोणाचें अंत:करण एका शब्दानें देखील दुखविलें नाहीं. निंद्य असें आचरण मजकडून कांहींदेखील घडलें नाहीं. आपल्याहि मनांत मजविषयीं घृणा असावी, असें मीं पाप तरी काय केलें आहे? माझें सतित्व भंग पावलें एवढाच ना तुमचा माझ्या-वर संशयित आरोप? पण त्यांत माझा काय अपराध बरें? त्याचा दोष मजवर काय म्हणून? माझ्या छायास्पर्शानें लोक विटाळ झाला असें मानतात. पशूपेक्षांहि घृणादृष्टीनें मजकडे पाहतात. मला व्यभिचारिणी

समजतात. सच्चिदानंद, मी खरोखरच अशी आहे कां? मीं या लोकांचा असा कोणता बरें अपराध केला आहे? मजकडून खरोखरच कांहीं पाप घडलें आहे का? सच्चिदानंद, या समाजाचा केवढा बरें हा अविचार! दुसऱ्यानें केलेल्या घोर कृत्याबद्दल समाजाकडून मला असह्य कष्ट व्हावेत, हींच काय या समाजाचीं बंधनें? हीच काय समाजाची सुव्यवस्था? त्या चांडळ नरपिशाच्च धोंडीराजास तर–"

नरराक्षस धोंडीराजाची मूर्ति आपल्यापुढें उभी आहे, असें मनोरमेला यावेळीं वाटूं लागलें. त्या मूर्खाच्या आठवणीनें तिला शब्दावरोध होऊन तिचे डोळे पाण्यानें भरून आले. संतापानें तिचें सगळें शरीर कांपूं लागलें. रडत रडत आर्तस्वरानें ती म्हणाली,

" मी निष्पाप, निष्कलंक, निरपराधी असून त्या नरपिशाच्च अधमाधम धोंडीराजाच्या अश्लील व्यवहारामुळें, या समाजाच्या यंत्रणानलांत सारखी होरपळून निघत आहें. अपराध एकानें करावा आणि प्रायश्चित्त दुसऱ्यानें भोगावें, हाच ना या समाजाचा न्याय? ज्यानें अपराध केला, त्याला शासन करण्याची या समाजाला शक्ति नाहीं; म्हणून त्या समाजानें या अनाथीवर आग पाखडण्यास तयार व्हावें, हेंच का या समाजाचें शील! त्या चांडाळानें एवढा अपराध केला, तरी तो या समाजांत खुशाल उजळ माथ्यानें मिरवत आहे आणि मी निरपराधी, समाजाच्या निंदेस व उपहासास पात्र झालें आहें. याच व्यवस्थेला लोक समाज म्हणतात ना? ह्याच समाजाविषयीं लोक आदर बाळगितात ना? ह्या समाजाचीं बंधनें तुटूं नयेत म्हणून लोक कितीतरी काळजी घेत असतात. सच्चिदानंद, तुम्हींदेखील याच समाजाला भीत अहां ना! तुम्हीं एवढा संन्यास ग्रहण केला, खड-

तर दिक्षा पत्करली; तरी या समाजाची भीति तुम्हांलादेखील वाटते. मग हा समाज माझ्यासारख्या अनाथ अबलेला छळायला कां कमी करील? सच्चिदानंद, माझी ही यंत्रणा कशानें कमी होईल, हें मी तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाला विचारूं? मीं काय केलें म्हणजे हे लोक मला निरपराधी समजतील, तें सांगा. सच्चिदानंद, या अनाथीला एकादा चांगला उपाय सांगा. मी पापी नाहीं; तरी लोक मला पापी म्हणतात. मी निरपराधी असून लोक मलाच अपराधी समजतात, मला दुराचारिणी म्हणून म्हणतात. सच्चिदानंद, मी याला काय करूं? हे असह्य कष्ट माझ्यानें सोसवत नाहींत. ही दारुण मनोव्यथा मला पळभर चैन पडूं देत नाहीं. सच्चिदानंद, ह्या हृद्रोगाचें औषध तुमच्यावांचून कोणाजवळ देखील नाहीं. या अभागिनीला आतां या पायांपासून दूर लोटूं नका. हे क्लेश दूर करायला तुम्हांवांचून कोणी समर्थ नाहीं!"

मनोरमेच्या मनोव्यथेला उपमा नव्हती. तिच्या यंत्रणेची कल्पना करून देणें आमच्या लेखणीच्या शक्तीच्या बाहेरचें काम आहे. बिचारीच्या क्लेशाला सीमा उरली नव्हती. तिची मनोव्यथा उलट प्रत्येक क्षणास दुणावत होती. देवाच्याघरीं ती निरपराधी होती. खऱ्या न्यायाच्या दरबारांत ती निर्दोषी होती. पापपुण्याच्या झडतींत ती निष्पापच ठरली असती; पण आमचा हा हितघातकी समाज तिचा उपहास करण्यास सदैव टपून बसलेला दृष्टीस पडे. मठाच्या माडीवरून सतित्व संरक्षणासाठीं तिनें खालीं उडी टाकली, ही हकीकत वाचकांच्या लक्षांत असलेच. मनोरमा त्या विलक्षण आघातानें बराच वेळ निचेष्ट पडली होती. त्या स्थितींतून ती जेव्हां शुद्धीवर आली, तेव्हां तिला एक निराळाच वातरोग जडला. आपलें सतित्व धोंडीराजानें भंग केलें, अशी तिची त्या वेळेपासून सम-

जूत झाली व ती हा वेळपर्यंत कायमच होती. सच्चिदानंदानें तिचें आत्मवृत्त ऐकून घेऊन तिला तिच्या आईकडे त्याचवेळीं पोहोंचवून दिलें होतें.

पांचसहा दिवस मनोरमा सासरींहि नव्हती व माहेरींहि नव्हती. यामुळें ती नाहींशी झाल्याचें वर्तमान तेव्हांच त्या दोन्ही गावांत पसरलें व हळूहळू तें बरेंच लांबवर गेलें, पुढें ही धोंडीराज्याच्या ताब्यांत तीन चार दिवस होती, अशीहि एक बातमी लोकांच्या कानावर गेली. या दोन्ही गोष्टींचा मेळ घालून लोकांनीं आम्हां कादंबरीकारांप्रमाणें त्यावर एक मोठी थोरली काल्पित कादंबरी तयार केली. लोकच ते ! त्यांच्या तोंडाला हात तरी कोणी लावावयाचा !! लोकांच्या त्या टिवल्याबावल्यांमुळें बिचारीस घराबाहेर तोंड काढण्यासहि जागा राहिली नाहीं. लोक खरें आणि खोटें शोधून न पाहतां वाटेल तें बरळत होते. लोक म्हणत होते त्याप्रमाणें झालें, असें जरी मानलें तरी त्यांत त्या अबलेचा खरोखर काय बरें अपराध होता ? पुरुषांनीं पशुवृत्ति स्वीकारून दीन, एकाकी अशा अबलेस गांठून, तिचें सतित्व भंग करावें, याबद्दल या चांडाळांचा संताप व्यक्त न करितां अथवा त्या नरपशूंस चांगली शिक्षा लावण्याचा प्रयत्न न करितां उलट गरीब बिचाऱ्या अबलेचाच उपहास करून घृणा व्यक्त करणें, हें निःसंशय मनुष्यत्वास काळिमा आणणारें कृत्य होय.

आमची हल्लींची समाजरचनाच अशी चमत्कारिक व बेंगरूळ पद्धतीची आहे, कीं, त्यामुळें आमची उन्नति होण्याच्या ऐवजीं एकसारखी अधोगतीच होत चालली आहे. दुष्ट, नीच, मदांध, नरपशूंविषयीं संताप व्यक्त करण्याऐवजीं हा समाज उलट अशा अबलांविषयीं उपहास व्यक्त

करून दाखवीत आहे, अशी स्त्री दृष्टीस पडली, कीं, लोक नाक मुरडतात, तिच्याकडे क्षुद्रदृष्टीनें पाहतात, तिच्याविषयीं घृणा दर्शवितात, आणि असे विलक्षण वेडेचार करून तिचा पदोपदीं मानभंग करितात. हेंच काय या आमच्या समाजाचें सौजन्य!

मनोरमेची स्थितीहि अशीच अनुकंपनीय झाली होती. लोकांच्या या उपहासांनीं मनोरमेच्या हृदयास शंभर विंचू एकाच वेळीं डसल्याप्रमाणें वेदना होत असे. ती भयंकर यंत्रणा दूर व्हावी, ते असह्य क्लेश नाहींसे व्हावेत, म्हणून ती अंत:करणापासून सच्चिदानंदास उपाय विचारीत होती. मनोरमेच्या अंत:करणाची ती तळमळ पाहून सच्चिदानंदाची छाती दुभंग होऊन गेली, त्याचें अंत:करण कळवळून आलें, डोळ्यांत अश्रु चमकूं लागले, त्या पवित्र सुशिलेची ती अवस्था पाहून, त्याची मति कुंठित होऊन गेली आणि मस्तक गुडघ्यावर टेंकून तो सचिंत दृष्टीनें मनोरमेकडे पाहूं लागला. बराच वेळ गेला तरी सच्चिदानंद स्तब्धच आहे, असें पाहून मनोरमा पुन: म्हणाली,

"सच्चिदानंद, कांहीं उपाय नाहीं ना? या अभागिनीचें दु:ख निवारण करण्याचा तुम्हाला कांहींच उपाय सुचत नाहीं असें दिसतें. तुम्हांसारख्या साधुपुरुषांनादेखील कांहीं उपाय सुचत नाहीं, यावरून माझ्या दुर्दैवाला सीमाच राहिली नाहीं असें म्हटलें पाहिजे. सच्चिदानंद, मी कितीहि दुर्भागी असलें, तरी माझ्यासाठीं तुम्हीं मुळींच वाईट वाटूं देऊं नका. मजसारख्या पापिणीसांठीं तुम्हीं कशाला अश्रु गाळतां? आत्महत्या करून मी या जगाचा शेवटचा निरोप घेणार होतें, मी आपली फिर्याद देवाच्या दरबारांत लावणार होतें; पण तितकेंदेखील माझें

सौभाग्य नाहीं. तुम्हीं त्या वेळीं निष्पापबुद्धीनें प्रयत्न करून मला वांचविलें; पण जगून मी तुमच्या दुःखास मात्र कारणीभूत झालें. तुम्हीं मला वांचविण्याचा निर्मल अंतःकरणानें प्रयत्न केला; पण त्यामुळें तुम्हीं मात्र आपल्या सुखाला आंचवलां. सच्चिदानंद, या दुष्टेला तुम्हीं कशासाठीं वांचविलेंत?"

मनोरमेचें हें बोलणें ऐकून सच्चिदानंद किंचित् काळ स्तब्धच होता. नंतर एक दीर्घ श्वास सोडून तो हताश स्वरानें म्हणाला,

"मनोरमे, मी यःकश्चित् मनुष्य. मी कोणाला वांचवूं अथवा मारूं शकेन, असें मला वाटत नाहीं. जीं सूत्रें विश्वचालक प्रभूच्या स्वाधीन आहेत, त्याबद्दल क्षुद्र मनुष्यांनीं अभिमान बाळगणें मूर्खपणा होय. मी पामर तुला काय वांचविणार! ईश्वरानें तुला वांचविलें असेंच म्हटलें पाहिजे. तुझी स्थिति शोचनीय तर खरीच; पण त्याला आतां उपाय काय! ज्या ईश्वरानें तुला वांचविलें, त्या ईश्वरावर विश्वास ठेऊन, त्याच्याच चिंतनांत दिवस काढण्यावांचून तुला आतां कांहींदेखील उपाय नाहीं."

सच्चिदानंदास जेव्हां कांहीं सुचेना, तेव्हां त्यानें ईश्वराकडे बोट दाखवून दिलें; पण मनोरमेस तें त्याचें सांगणें उघड उघड उडवाउडवीचें वाटलें. ती पुन्हां पूर्ववत् आर्तस्वरानें म्हणाली,

"सच्चिदानंद, माझ्यासंबंधानें तुम्हीं इतका वेळ विचार करून, शेवटीं हेंच ठरविलेंत ना? तुम्हीं माझ्या प्रश्नाचा विचार दयेच्या दृष्टीनें केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर न्याय व शास्त्र या दृष्टीनें देखील केला नाहीं. केवळ रूढीकडे दृष्टि देऊन मला असा निराशेचा निरोप देणें,

तुमच्या या हल्लींच्या वृत्तीला मुळींच शोभत नाहीं. अंतःकरणाच्या उच्चतेची साक्ष मोठमोठ्यांना देखील पटवितां येत नाहीं असें म्हणतात, तेंच खरें. परदुःख हें शीतळच असतें. माझा होणारा मानभंग, माझा उपहास, माझी लोकांकडून होणारी कुचेष्टा, याची तुम्हांला कल्पना नसणें साहजिकच आहे. अंतःकरणांत पेटलेल्या वणव्याची पीडा तुम्हांला कोणत्या शब्दांनीं सांगूं, तेंच मला कळेनासें झालें आहे."

"मनोरमे, त्याला कोणाचा उपाय आहे? हीं समाजाचीं शासनें आहेत. आपणाला जोंपर्यंत या समाजांत रहावयाचें आहे, तोंपर्यंत तीं शासनें भोगलीं पाहिजेत."

"सच्चिदानंद, तुम्हीं एवढा संन्यास ग्रहण केला, तरी या समाजाच्या प्रबळ शक्तीला मान तुकावण्याची तुमची तयारी आहेच. या हल्लींच्या हितघातकी समाजाचें नांव निघालें कीं, माझ्या अंगाचा कसा संताप होऊन जातो. अहो, पूर्वीची ती समाजपद्धति किती तरी निर्दोष होती. बालविवाहाची पृथा मुळींच नसल्यामुळें, त्या वेळीं राष्ट्रांत विधवा क्वचितच दृष्टीस पडत. ज्या विधवा होत त्या प्रौढ व संसारसुखाचा अनुभव घेतलेल्या असल्यामुळें, त्या संन्यास दीक्षा ग्रहण करून ईश्वर-चिंतनांत आनंदानें आयुष्य घालवीत. आणि त्यावेळीं स्त्रियांविषयीं विलक्षण आदर असून शिवाय त्यांना आपल्या सतित्व संरक्षणासाठीं कट्यार किंवा जंबिया बाळगण्याची परवानगी होती. हल्लींच्या राज्यांत ती परवानगी नसल्यामुळें आम्हीं अबलाहून अबला झालों आहोंत. सच्चिदानंद, माझ्याजवळ जर त्यावेळीं एखादें चांगलें हत्यार असतें, तर मी त्या धोंडीराजाचा खरोखर खून केला असता; पण आम्हां हिंदी

स्त्रियांना सतित्व संरक्षणाचा तोदेखील मार्ग खुला नाहीं. बरें या समाजाची सहानुभूति आहे असें म्हणावें, तर तीहि नाहीं. समाज उलट माझीच निंदा व उपहास करीत आहे,"

"मनोरमे, तूं म्हणतेस तें खरें. समाज हा असाच असावयाचा. समाजांत काहीं सज्जन असतात, कांहीं दुर्जन असतात. मारत्याचा हात धरवतो; पण बोलत्याचें तोंड धरवत नाहीं, अशी म्हण आहे. त्यांतून जे दुर्जन असतात, ते तर काय बोलतील याचा मुळींच कांहीं नियम नसतो; परंतु शहाण्या माणसानें जनरवांकडे लक्ष देणें हा वेडेपणा होय. तूं या समाजाचें एवढें भय कां बाळगितेस तेंच मला समजत नाहीं!"

"सच्चिदानंद, मघां आपणच म्हणालांत कीं, समाजाचीं शासनें हीं सहन केलींच पाहिजेत; आणि आतां तुम्हींच म्हणतां कीं, समाचाचें भय कां बाळगितेस म्हणून? तुमच्या या बोलण्यावरून मी समाजावयाचें तरी काय? मी केलेली विनंति मान्य करण्याचें तुम्हाला धैर्य नसल्यामुळें तुम्हीं मला कांहीं तरी सांगून माझी समजूत करीत आहां, पण तुमच्या या थोरपणाला हें मुळींच शोभत नाहीं. मी आपला सारा जन्म असाच घालवावा ना? मी आपलें आयुष्य सुखानें पण निर्मलपणें वालवावयाला कांहींच उपाय नाहीं ना? सच्चिदानंद, हें कलंकित शरीर आपण जर आपल्या पदारांत घ्याल, आपल्या पुण्यमय चरणाची सेवा या दासीकडून घेत जाल, मला आपली म्हणून समजाल, तर मला पावन केल्याचें पुण्य तुम्हांला मिळेल. तूं निष्पाप, निष्कलंक आहेस, असें तुम्ही मला सातसातदां सांगतां; तें सांगणें जर अंतःकरणापासून असेल, तर या मनोरमेचा आतां अव्हेर करूं नका."

मनोरमेचें हें बोलणें ऐकून, सच्चिदानंदाची अवस्था मोठी चत्कारिक झाली. मनोरमेस काय उत्तर द्यावें, हें त्याला सुचेना. कांहीं वेळ सचिंत राहून तो म्हणाला,

" मनोरमे, दया व सदसद्विवेकबुद्धि, या दृष्टीनें विचार केला, म्हणजे तुझें म्हणणें कबूल करावें लागेल; परंतु रूढि व शास्त्र याचाहि विचार केलाच पाहिजे. अद्याप उच्चवर्णाच्या जातींत पुनर्विवाह शास्त्र-संमत मानीत नाहींत आणि जोंपर्यंत शास्त्रसंमति नाहीं, तोंपर्यंत विधवांनीं आपलें आयुष्य संन्यासांतच घालविलें पाहिजे."

मनोरमा करुणस्वरानें म्हणाली,

"सच्चिदानंद, तुम्ही शास्त्रसंमति म्हणून उगीच स्तोम माजविलें आहे. विधवांनीं संन्यास ग्रहण करून राहिलें पाहिजे असा तुमच्या त्या शास्त्रांत कोठेंच खुलासा नाहीं. सच्चिदानंद, मजसारख्या विधवांना विधवा म्हणून म्हणणें हेंदेखील खरोखर पाप आहे. अहो, ज्या दिवशीं माझा पति वारला, त्या दिवशीं मी आपल्या बरोबरीच्या मुलीबरोबर रस्त्यांत खुशाल आनंदानें हंसत खेळत होतें, मी त्यावेळीं इतकी लहान होतें कीं, पति वारला म्हणजे काय झालें, तेंच मला कळलें नाहीं. पति म्हणजे काय हेंच जर मला कळत नव्हतें, तर त्याच्या मृत्यूनें माझ्या मनावर तरी काय परिणाम व्हावयाचा होता! माझ्या आईला रडतांना पाहून मी रडें; परंतु पतीसाठीं म्हणून आजवर दोन अश्रूदेखील गाळले नाहींत. पतीच्या मृत्यूनंतर मला कांहीं वर्षांनीं सासरची माहिती मिळाली व सासूश्वशूर यांची ओळख झाली. सच्चिदानंद, तुम्हीच सांगा, मला विधवा म्हणणें ही निर्दयता, कीं, शास्त्रपद्धति? पुरुषांनीं स्मशानांत पाऊल टाकण्याच्या

आधीं देखील विधुरावस्था सोडून द्यावी आणि स्त्रियांनीं मात्र अर्भकावस्थेंतहि विधवा म्हणून संन्यास ग्रहण करावा, ही शास्त्रपद्धतीच नव्हे ! सच्चिदानंद, याला तुम्हीं रूढि म्हणा अथवा शास्त्र म्हणा, मी किंवा मजप्रमाणें हे कष्ट सहन करणाऱ्या अबला याला निर्दयताच म्हणणार."

मनोरमेचें म्हणणें सच्चिदानंदास सर्वतोपरि पटलें. तथापि तिच्या म्हणण्याला त्याला संमति देण्याचें धैर्य होईना. आणखी कांहींतरी युक्तिवाद करून, तिचें मन फिरविलें पाहिजे, असा विचार करून तो म्हणाला,

"मनोरमे, तुझे विचार बरोबर दिसतात. तुझी विनंति अमान्य करणें हें निःसंशय निर्दयतेचें द्योतक होय; पण तुझे विचार तुला आपल्या तारुण्यावस्थेमुळें विशेष बरोबर वाटतात, असें मला वाटतें. शिशुपणांत तुला पुनर्लग्न करावें, असें वाटत होतें काय? छे ! मुळींच वाटलें नसेल; पण आतां तारुण्यामुळें तुझें मन विकारवश झालें आहे असें मला वाटतें. जे विकार आजवर तुला शिवले नव्हते, त्यांचा उदय केवळ तारुण्यामुळें झाला आहे. तूं नीट विचार कर, म्हणजे विकारवशतेमुळेंच आपण सच्चिदानंदाजवळ भलतीच मागणी केली, असें तुला कळून येईल."

मनोरमेस हें म्हणणें कसेसेंच वाटलें. आपल्या उदात्त अंतःकरणाची सच्चिदानंद थट्टा करीत आहे, असें जाणून ती लागलीच म्हणाली,

"सच्चिदानंद, असें म्हणणें तुमच्या साधुतेला शोभत नाहीं. आज भारतवर्षांत जर ती पूर्वीची सर्वोत्तम विवाहपद्धति सुरू असती, तर मला माझ्या आईबापांकडून याचवेळीं माझ्या पसंतीप्रमाणें पति मिळविण्याची अनुज्ञा मिळाली असती. यापूर्वी मला पति, सासुश्वशूरांसंबं-

धानें कांहीं बोधच होत नव्हता. संसार म्हणजे काय, स्त्रीयांचीं खरीं कर्तव्यें कोणतीं, राष्ट्राच्या उपायोगी स्त्रियांना कसें पडतां येईल, वगैरे गोष्टी मला आतांच कळूं लागल्या. कोणाचा सहवास जोडून घ्यावा, म्हणजे आपलीं कर्तव्यें आपणांस चांगल्या रीतीनें बजावितां येतील, हें मला आतांच समजूं लागलें. माझें पवित्र कर्तव्य बजाविण्यासाठीं मी तुम्हांला विनंति केली. या विनंतीला विकारवशता किंवा तारुण्याचा दोष म्हणणें म्हणजे मनाच्या क्षुद्रपणाचें लक्षण होय. मी जर विकारवश झालें असतें, तर त्या मेल्या धोंडीराजाच्या मठाच्या माडीवरून खालीं उडी मारली नसती. सच्चिदानंद, तें साहस मी विकारवशतेमुळेंच केलें नाहीं?"

सच्चिदानंदास काय बोलावें तें सुचना. आपण मनोरमेवर विकारवशतेचा दोष अगदीं विनाकारण केला, असें त्याला वाटूं लागलें. मनोरमेस काय सांगावें याचा तो विचार करीत आहे, तोंच मनोरमा म्हणाली,

"सच्चिदानंद, निर्दयतेचा स्वीकार केल्यावांचून तुम्हांला माझा आतां अव्हेर करतांच येणार नाहीं. माझा जर कांहीं दोष नसेल, तर या मनोरमेस आतां नाहीं म्हणून म्हणूं नका. माझ्या हृदयांत जो प्रणय आहे, तो खात्रीनें धर्मविरहित नाहीं. मी कांहीं तुम्हांस अनुचित कार्य करण्यास सांगत नाहीं. माझें मागणें अगदीं पवित्र आहे. या मनोरमेस नाहीं म्हणणें तुमच्या सदयतेस शोभणार नाहीं. तुम्हांसारख्या पवित्र पतीचा सहवास खात्रीनें या लोकीं व परलोकीं सुखास कारणीभूत होईल. मी आपल्या अंत:करणांतला विचार मोठ्या कष्टानें तुम्हाला कळविला आहे. माझी दया जर आपणास न येईल, तर माझें नशीब!

दुसरें काय ! ! पण सच्चिदानंद, आपण इतके कठोर आहां अशी माझी मुळींच कल्पना नाहीं."

मनोरमेचा शब्दओघ सारखा सुरू होता. त्यांत मोहनीमय माधुर्य असल्यामुळें व स्वर दुःखाच्या भरानें कातर असा निघत असल्यामुळें सच्चिदानंदाची छाती विदीर्ण होऊन गेली. कोणाहि कठोर मनुष्यास देखील तिची दया यावी, अशी तिची स्थिति होती; मग सच्चिदानंदासारख्या कोंवळ्या मनाच्या मनुष्यास तर दया येणें साहजिकच आहे; परंतु साधूचें हृदय जसें लोण्याप्रमाणें मऊ असतें तसें तें दगडाप्रमाणें कठिणहि असतें. तीच अवस्था या वेळीं सच्चिदानंदाची झाली होती. मनोरमेची दयाजनक स्थिति एकीकडून त्याच्या हृदयास दया उत्पन्न करीत होती, तर दुसरीकडून रूढि व शास्त्र त्यास निर्दय बनवीत होतीं. सच्चिदानंद असा घोंटाळ्यांत पडल्यामुळें त्यास काय बोलावें तें सुचेना. त्याची अवस्था इतकी चमत्कारिक झाली कीं, त्याच्या जिव्हेला चलनच मिळेना. मनोरमेचें अंतःकरण पवित्र आहे, ती निरपराध आहे, ती निर्दोष आहे, ती निष्कलंक आहे, ती सद्गुणी आहे, ती सुस्वरूप आहे, तिचे विचार उदात्त आहेत, तिची विनंति मान्य करणें आपलें कर्तव्य आहे, असें त्याला क्षणोक्षणीं वाटे; परंतु रूढि व शास्त्र यांच्या भीतीमुळें तो अगदीं गांगरून गेला होता. मनोरमेस कांहींतरी सांगितल्यावांचून तर त्याची सुटका नव्हती. शेवटीं मोठ्या कष्टानें तो तिला म्हणाला,

" मनोरमे, तूं जे कांहीं विचार सुचविलेस, ते कितीहि उदात्त व योग्य असले, तरी मला त्याबद्दल कांहीं विचार केला पाहिजे. माझी

तर जाण्याची आतां अगदीं वेळ होत आली आहे. एवढ्या थोड्या वेळांत मला आपली अनुमति तुला देतां येत नाहीं. मी पुन्हां इकडे येणार आहें, त्यावेळीं तुला कायतें कळवितों. तोंपर्यंत विवेकानें तुझ्या मनांत वदल झाल्यास बरेंच झालें. माझ्या हृदयांत दयामाया कांहीं नाहीं, अशी कदाचित् तुझी समजूत झाली असेल; पण तसें तूं समजूं नकोस. माझें जाणें तूं माझ्या निर्दयतेचें द्योतक समजत असशील; पण तसें तूं समजूं नकोस. मी येईपर्यंत या आश्रमांत आनंदानें रहा. ईश्वर चिंतनांत दिवस घालीव, म्हणजे हे उद्भवलेले विचार कदाचित् नाहींसेहि होऊन जातील."

असें म्हणून सच्चिदानंद आपलें प्रवासी सामान घेऊन उभा राहिला. मनोरमाहि डोळ्यांत आसवें आणून उभी राहिली. सच्चिदानंदाच्या बोलण्यावरून त्याचा विचार तिला तेव्हांच कळून आला. आपण या सत्पुरुषाची इतका वेळ विनाकारण याचना करून, याला आपल्या क्षुद्र हृदयाची ओळख करून दिली, असें तिला वाटूं लागलें. ती मुग्धा अनुतापपीडित स्वरानें म्हणाली,

"सच्चिदानंद, तुमच्या बोलण्याचा सगळा अर्थ मला समजला. जी गोष्ट बोलूं नये, ती तुमच्या अंत:करणाची मला ओळख नसल्यामुळें मी बोलून गेलें, याबद्दल वाईट वाटूं देऊं नका. या अनाथीनें तुम्हाला भलतीच विनंति केली याबद्दल मला क्षमा करा."

मनोरमा इतकें बोलून स्तब्ध उभी राहिली. मनोरमेचे हे शब्द कांहीं विलक्षण तऱ्हेनें सच्चिदानंदाच्या हृदयपटलावर रेखाटले गेले. प्रत्युत्तरानें मनोरमेला बरें वाटेल, असें कांहीं बोलावें, म्हणून तो प्रयत्न करीत होता; परंतु तें त्यास सुचलें नाहीं. तें उत्तर नुसत्या नजरेनें

दिल्यासारखें दाखवून, तो आश्रमाच्या बाहेर पडून, नावेंत जाऊन बसला. मनोरमाहि त्यास पोहोंचविण्यासाठीं समुद्रतीरापर्यंत आली होती. नाव चालूं लागल्यावर मनोरमा निराशेच्या तडाख्यानें विव्हल होऊन वेडी झाली होती. समुद्रकांठच्या एका टेंकडीवर उभी राहून आपल्या दृष्टि-सीमेपर्यंत ती सच्चिदानंदास पहात होती. सच्चिदानंदाची नाव दृष्टिसी-मेच्या पलीकडे गेल्यावर मनोरमेनें समुद्रांत धाडकन् उडी टाकून दिली !

## प्रकरण चौथें.

# प्रेत.

मनोरमा ही एक तरुण बालविधवा होती. आपलें आयुष्य भयंकर वैधव्यावस्थेंतील दुःखांत कंठण्यावांचून तिला कांहीं मार्ग उरला नव्हता. केवढें दुर्भाग्य बिचारीचें! जग म्हणजे काय, हें जिनें पुरे डोळे उघडून पाहिलें नव्हतें, अशा बाल्यावस्थेंत ती पत्नी होऊन लागलीच विधवा झाली होती. कोण हा आमच्या समाजांतील रूढीचा भंयकर परिणाम! त्या बिचारीला विवाहसमयीं पत्नीच्या अधिकाराचाहि बोध झाला नाहीं, तरी समाज तिला अमक्याची स्त्री, म्हणून संबोधित होता. वैधव्यदीक्षेची शिक्षा जेव्हां तिला मिळाली, तेव्हांहिं त्या मुग्धेस विधवा म्हणजे काय हें कळलें नाहीं. तरी आमचा समाज तिला विधवा म्हणून संबोधित होता. शिव! शिव! कोण ही त्या अबलेची विटंबना! या भंयकर यातना सोसण्यास ती दीन गाय अगदीं असमर्थ होती; तथापि समाज तिला त्या यातना सोसण्यास पात्र आहे असें समजत होता. त्या बिचारीनें या समाजाचा असा अपराध तरी काय केला होता? तिनें काय कोणाचा खून केला होता? का तिनें कोणाचा अपमान केला होता? तिनें असें केलें तरी काय होतें? तिच्या हातून असें पापाचरण तरी कोणतें घडलें होतें? नाहीं, तिनें कोणतेंहि पातक केलें नव्हतें. ती बालिका निर्दोष—निरपराध—होती. तिचा कांहींदेखील अपराध नव्हता. समाजानें त्या अनाथीस शिशुपणांत पत्नी करून, लागलीच वैधव्याच्या

भयंकर यंत्रणानलांत लोटून दिलें होतें. खरा अपराध समाजानें केला होता. वास्तविक समाजानें चूक केली होती आणि समाजाच्या चमत्कारिक रूढीबंधनामुळें ती बिचारी जीवंत असून या जगास मुकली होती.

ज्या समाजानें तिला कोत्या व दुराग्रही विचारानें दुःखार्णवांत लोटून दिलें होतें, त्या समाजाची वास्तविक मनोरमेकडे सहानुभूति असावयास पाहिजे होती; परंतु मौज ही कीं, हा छिद्रान्वेषणी समाज तिच्याकडे घृणा दृष्टीनें पहात होता, तिचा उपहास करीत होता, तिला नांवे ठेवीत होता, तिच्यावर नाहीं नाहीं ते दोषारोप लादीत होता आणि तिच्याविषयीं वाटेल तें बरळत होता! बिचारी निष्पाप—निष्कलंक—निरपराध मनोरमा हा जाच कोठवर सहन करणार! शेवटीं कंटाळून 'व्रणार्थ पशुच्या शिरावर वनीं उभे काकसे' अशा लोकांचा निरोप घेऊन, निरामय अशा अरण्यांत ती निघून गेली. मनोरमा जनसमूहास कंटाळून, अरण्यांत भयंकर पशूंचा सहवास जोडण्यास तयार झाली, यावरून मूर्खलोकांचे कुत्सित विचार भंयकर पशूंच्या तीक्ष्ण नखांहूनहि जास्त हृदयविदारक असतात, असें म्हणावें लागतें. मनोरमेस सच्चिदानंदाचा आश्रम माहीत होता. ती जंगलांतून रस्ता शोधीत शोधीत लवकरच त्याच्या आश्रमांत येऊन राहिली. सच्चिदानंदानें तिला आपल्या आश्रमांत मोठ्या आनंदानें घेतलें व तिची सर्व प्रकारची व्यवस्था लाविली. मनोरमा त्या आश्रमांत सच्चिदानंद तेथून जाईपर्यंत रहात होती. सच्चिदानंदाच्या अंतःकरणाचा तो पवित्रपणा पाहून ती सच्चिदानंदास देवाप्रमाणें पूज्य मानीत असे. सच्चिदानंद हा खरोखरच साधुपुरुष असून, त्याचें अंतःकरण पवित्र होतें. तो मनानें उदार असून, भूतदयासंपन्न होता.

सच्चिदानंदाचें पहिलें नांव शंकर असें होतें. शंकराचा अभ्यास बी. ए. पर्यंत झाला असून, त्यास मुंबईस सेक्रेटरीयटमध्यें शंभर रुपयांची नौकरी होती. त्याच्या बापासहि मुंबईस तार आफिसमध्यें नौकरी होती; परंतु मध्यंतरी जो तारमास्तरांचा संप झाला होता, त्यावेळीं त्यानें नौकरी सोडून देऊन कलकत्त्यास खाजगी नौकरी मिळविली. बाप कलकत्त्यास गेल्यावर लवकरच सगळ्या हिंदुस्थानांत स्वदेशी चळवळ सुरू झाली व स्वावलंबनाच्या मार्गानें जाणें प्रत्येकास अभिमानास्पद वाटूं लागलें. शंकरहि अशाच विचारांनीं वैतागून जाऊन, त्यानें आपल्या शंभर रुपयांवर पाणी सोडलें व कलकत्त्यास जाऊन एका स्वदेशी कारखान्यांत नौकरी धरली. कलकत्त्याकडे असतांना शंकराचे दिवस मोठ्या आनंदानें चालले होते; परंतु सर्व दिवस सुखानेंच जावेत असा ईश्वरीसंकेत नसल्यामुळें, शंकरचा बाप इहलोकचा त्याग करून परलोकीं निघून गेला. या एका दुःखाची आठवण बुजते न बुजते तोंच त्याची सुंदर व अत्यंत प्रिय पत्नी त्यास सोडून मृत्यूच्या स्वाधीन झाली. एकामागून एक दुःखाचे दोन तडाके बसल्यामुळें त्याची हिंमत पार खचून गेली. त्याच्यावर दुःखाचा असा एकाएकीं डोंगर कोसळल्यामुळें तो अगदीं हताश होऊन गेला. त्याची अवस्था अगदीं वेड्याप्रमाणें झाली. त्याच्या मनास स्वस्थता अशी वाटेना. समाधान वाटावें म्हणून त्यानें नानाप्रकारच्या कादंबऱ्या वाचल्या, नाटकें पाहिलीं, प्रेक्षणीय देखाव्यांचीं दर्शनें घेतलीं; तथापि त्यास समाधान असें वाटेना. याप्रमाणें हताश होऊन इकडे तिकडे फिरत असतां, त्यास परलोकवासी स्वामी विवेकानंद यांच्या एका शिष्यानें आपल्या आश्रमांत आश्रय देऊन, कर्तव्याची ओळख करून दिली. वेद, शास्त्र, पुराण, योग वगैरे ग्रंथांच्या परिशीलनानें त्यास मोठें समाधान वाटूं लागलें.

आपल्या जन्मभूमिची सेवा करण्याची त्याला त्यावेळीं मोठी उत्कट इच्छा झाली व त्याप्रमाणें तो त्या कार्यासहि लागला.

शंकर यास आतां त्याच्या वृद्ध आईवांचून कोणीहि राहिलें नव्हतें. पुष्कळ दिवस बंगालमध्यें राहिल्यावर तो आपल्या आईला घेऊन, कोकणांत येऊन राहिला होता. त्याच्या गांवापासून जवळच समुद्रतीरीं एक रमणीय भूप्रदेश होता. तेथें त्यानें आश्रम बांधून, यास आनंदाश्रम असें नांव दिलें होतें. त्याची वाणी मोहक असून विषय प्रतिपादन करण्याची शैलीहि मोठी विलक्षण होती. तो ठिकठिकाणीं व्याख्यानें देण्यासाठीं हिंडत असून त्याचीं व्याख्यानें ऐकण्यासाठीं हजारों लोक उत्सुकतेनें येत व प्रसन्न चित्तानें ऐकत. त्यानें आपल्या असामान्य वाणीनें सारें महाराष्ट्र हालवून सोडून ज्ञानदान हेंच कर्तव्य, हाच मोक्षाचा मार्ग, व यांतच नरदेहाचें सार्थक असा त्यानें सर्वांचा ग्रह करून दिला. शंकराच्या या एकंदर व्यवहारावरून त्यास स्वामी सच्चिदानंद असें नांव प्राप्त झालें होतें. एके दिवशीं तो आपल्या अनुयायी मंडळीसह मागें सांगितलेल्या दिगंबर मठाजवळून आपल्या आश्रमांत जात असतां, त्यास स्त्री कंठांतून मोठ्यानें 'धांवा धांवा' असा शब्द ऐकूं आला. त्याबरोबर तो मठाजवळ गेला. आतां मठांत शिरणार, तों मठाच्या माडीवरून एका सर्वांगसुंदर स्त्रीनें खालीं जमिनीवर धाडकन् उडी टाकली. त्या विलक्षण प्रकारानें सच्चिदानंद मोठ्या घोंटाळ्यांत पडला होता; तथापि त्यानें लवकरच ताडलें कीं, या स्त्रीनें केवळ सतित्व संरक्षणासाठींच खालीं उडी टाकली असावी. मठाच्या माडीवरून उडी टाकल्यास, बहुधा मृत्यूच यावयाचा इतकी उंच ती माडी होती; परंतु खालीं उंच

गांज्याचीं झाडें असल्यामुळें मनोरमेस विशेष इजा झाली नव्हती; पण मठांतील विलक्षण प्रकारामुळें व जमिनीवरील विषम आघातामुळें ती अचैतन्यावस्थेंत जमीनीवर पडली होती. सच्चिदानंदानें यावेळीं विशेष वाटाघाट किंवा चौकशी न करितां मनोरमेस बरोबर घेऊन तो निघून गेला. आश्रमांत नेऊन मनोरमेस कांहीं उपचार केल्यावर ती शुद्धीवर आली. सच्चिदानदानें तिची विचारपूस करून तिला तिच्या आईकडे पोहोंचतें केलें; परंतु ती घरीं जाऊन पोहोंचावयाच्या आधींच गांवांतील लोकांनीं तिच्याविषयीं भलत्याच बातम्या पसरविल्या होत्या. लोकांचा तो उपहास तिला ऐकवेना; पण लोकांच्या तोंडाला हात लावण्याचें तिच्या स्वाधीन नसल्यामुळें ती दीन अनाथ मनोरमा पुन्हां सच्चिदानंदाच्या आश्रमांत येऊन राहिली. मनोरमा व सच्चिदानंद या उभयतांचे स्वभाव सरळ व सारखे असल्यामुळें स्नेहभाव वाढत गेला व उभयतांमध्यें एकमेकांविषयीं बळकट असें प्रेम उत्पन्न होत गेलें. शेवटीं मनोरमेनें आपलें हृद्गत सच्चिदानंदास कळविलें; परंतु त्या तिच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून, सच्चिदानंद तसाच निघून गेला. यामुळें मनोरमेस मरणापेक्षांहि जास्त दुःख होऊन तिनें अनुतापाच्या भरांत एकदम समुद्रांत उडी टाकून दिली.

सच्चिदानंदानें जरी वरपंगीं तिचा अव्हेर केला होता, तरी तिची विनंति स्वीकारण्याचें त्याच्या मनांत वारंवार येत होतें; परंतु जनभीति व आणखी दुसरीं कांहीं कारणें असल्यामुळें त्यानें ती गोष्ट पुढें ढकलली होती. त्याच्या मनांत जें प्रेम उत्पन्न झालें होतें, त्या प्रेमामुळें तो मचव्यांत बसून जरी बराच दूर गेला होता, तरी दृष्टि मनोरमेकडे होती.

मनोरमेनें समुद्रांत उडी फेंकली हें त्यानें स्पष्ट पाहिलें. मनोरमेनें समुद्रांत उडी टाकतांच सच्चिदानंद मोठ्यानें 'हाय हाय' म्हणून ओरडला. बिचारे नावाडी वल्हीं मारण्यांत अगदीं गर्क झाले होते; पण सच्चिदानंदाचें ओरडणें ऐकून ते एकदम दचकले. पाहतात तों सच्चिदानंद विषण्ण वदनानें अश्रु गाळीत आहे. सच्चिदानंदाची ती अवस्था पाहून एक नावाडी म्हणाला.

"महाराज, तुम्ही कां रडतां? तुम्हाला काय झालें?"

सच्चिदानंद आर्तस्वरानें म्हणाला,

"बाबानों, काय सांगूं? आपण जेथून निघालों तेथें जर लवकर परत न्याल, तर मजवर मोठे उपकार होतील. ती पहा! समोर जी टेंकडी आहे, त्यावरून आतांच मनोरमेनें समुद्रांत उडी टाकली!"

सच्चिदानंदानें असें सांगतांच त्या नावाड्यांनीं मचवा टेंकडीकडे परत चालू केला. त्यांनीं लांब नजर करून पाहिलें तों मनोरमा समुद्रावर तरंगत असलेली त्यांना दिसली. ईश्वरकृपेमुळें यावेळीं वारा अनुकूल असल्याकारणानें मचवा लागलाच टेंकडीजवळ आला. मनोरमा अजून पाण्यावरच तरंगत होती. नावाड्यांनीं कुशलतेनें तिला आंत घेतलें व मचवा किनाऱ्यास लावला. मनोरमा जरी बेशुद्ध झाली होती; तरी ती लवकरच दुरुस्त होईल, अशीं तिचीं चिन्हें दिसत होतीं. नावाड्यांनीं तिचे पाय धरून तिला चार पांच वेळां गरगर फिरविलें. त्यामुळें मनोरमेला वांत्या होऊन, तिच्या पोटांतलें सर्व पाणी बाहेर पडलें व ती चांगली शुद्धीवर आली. नंतर इकडे तिकडे पडलेलें गवत वगैरे गोळा करून त्याचा चांगला जाळ केला व ऊब येण्यासाठीं त्या जाळाजवळ मनोरमेस बसविलें. तिचें ओलें झालेलें वस्त्र सुकत टाकून,

सच्चिदानंदानें तिला दुसरें वस्त्र परिधान करण्यास दिलें, चांगली ऊब मिळाल्यावर ती पूर्ववत् ताजीतवानी झाली. मनोरमेनें सच्चिदानंदास डोळे भरून पाहिल्यावर ती आर्तस्वरानें म्हणाली,

" सच्चिदानंद, तुम्ही येथें कोठून आलांत ? "

सच्चिदानंद किंचत् कष्टकारक स्वरानें म्हणाला,

" मनोरमे, या प्रश्नाचें तुला काय उत्तर द्यावें ?"

मनोरमेची स्थिति या वेळीं मोठी चमत्कारिक झाली होती. ती म्हणाली,

" सच्चिदानंद, मीं आपल्या जीवाला कंटाळून समुद्रांत उडी टाकली; पण हें मेलें नशीब पहा किती चमत्कारिक आहे ! मी आपली पुन्हां जिवंतच्याजिवंत आहें. या नशिबांत आणखी काय काय लिहिलें आहे, तें तरी कोणाला ठाऊक ! सच्चिदानंद, मला एकादां वांचविलें तें एक बरें केलें; पण पुन्हां आतां कशाला या पापिणीला वांचविलें ? "

असें म्हणून मनोरमा डोळे पुसूं लागली. मनोरमेची ती दयाजनक स्थिति पाहून सच्चिदानंदाचें हृदय कळवळून आलें. त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. त्याच्यानें आतां स्पष्ट बोलल्यावांचून मुळींच राहवेना. तो मनोरमेला आपल्या हृदयाशीं धरून म्हणाला,

" मनोरमे, आतां मुळींदेखील कष्टी होऊं नकोस. केवळ तुझ्या निर्मल विनंतीसाठींच तुला वांचविलें. अशा खऱ्या, पवित्र व दुर्मिळ प्रेमाचा सांठा अनायासें मिळाल्यावर तो कोण वांया दवडील ! "

सच्चिदानंदाचे ते शब्द ऐकून मनोरमेच्या हृदयांत साहजिक लज्जा उत्पन्न झाली. तिनें सच्चिदानंदाची मिठी हळूच सोडविली आणि ती किंचत् दूर उभी राहून मधुर स्वरानें म्हणाली,

"महाराज, शेवटीं या गायींची करुणा आपणास आली, याबद्दल मी आपले किती तरी उपकार मानूं! ज्या जगन्नियंत्यानें मजविषयीं तुमच्या हृदयांत प्रेम उत्पन्न केलें, त्या प्रभूचें कौतुक गाण्यास मला जरी सहस्त्र मुखें असतीं, तरी तीं कमीच पडलीं असतीं. या गोष्टीला हे नाविक साक्षी आहेत, हें लक्षांत असलें म्हणजे बरें."

सच्चिदानंद म्हणाला,

"एकटे नाविकचसे काय, पण भगवान् श्री सूर्यनारायण, ही धरणी माता व हा अगाध महासागर हीं सारीं साक्षीभूत आहेत. माझ्या प्रेमाविषयीं तूं कधींहि संशय घेऊं नकोस."

मनोरमेनें या वेळीं सहास्य वदनानें सच्चिदानंदाकडे पाहून कृतज्ञता दर्शविली. त्यामुळें सच्चिदानंदाच्या डोळ्यांतून आनंदाश्रु बाहेर आले. त्याच्या हृदयांत मनोरमेस पूर्णपणें जागा मिळाली. मनोरमेचा हात आपल्या हातांत हळूच धरून तो सस्मित स्वरानें म्हणाला,

"मनोरमे, तूं बरीच थकली आहेस. चल, आश्रमांत जाऊन थोडा फलाहार करूं आणि ऊन कमी होईपर्यंत विश्रांति घेऊन मग बरोबरच मुंबईस जाऊं."

असें म्हणून सच्चिदानंद मनोरमेस आश्रमांत फलाहारासाठीं घेऊन गेला. नावाड्यांनींहि आपल्या जवळच्या भाकऱ्या काढून त्याचा फन्ना उडविला आणि उन्हाची वेळ असल्यामुळें ते झाडाच्या सावलींत पडून स्वस्थ विश्रांति घेऊं लागले. सर्वांना चांगला आराम मिळाल्यावर नावाड्यांनीं मचवा तयार केला व त्यांत मनोरमेस व सच्चिदानंदास घेऊन ते मार्गस्थ झाले.

ही वेळ सायंकाळची असून या वेळीं मचव्यांत आनंद भरून राहिला होता. नाना प्रकारच्या हितगुजाच्या गोष्टी चालल्या होत्या. नावाडी मोठ्या आनंदानें वल्हीं मारीत लावण्या गात होते. त्यांनीं आपला सूर पाण्याच्या खळखळाटाबरोबर मिळवून दिला होता. नावाड्यांचे ते चमत्कारिक सूर, ताल व ठेके ऐकून व पाहून मनोरमेस व सच्चिदानंदास मोठी मौज वाटत होती. अशा प्रकारची करमणूक सुरू असल्यामुळें वेळ कोणीकडे निघून गेला तें कोणाच्याहि लक्षांत आलें नाहीं. त्या दिवशीं पौर्णिमा होती. संध्याकाळ उलटून गेल्यामुळें चंद्राचें स्वच्छ चांदणें समुद्रावर पडलें होतें. या रम्य वेळीं सच्चिदानंदाचा मचवा मोठ्या जोरानें चालला होता. इतक्यांत सच्चिदानंदाच्या दृष्टीस मोठा थोरला जाळ पडला. तो जाळ पाहून तो त्या नावाड्यांस म्हणाला,

"अरे, हा समोर मोठा जाळ कसला दिसतो ?"

नावाडी त्या जाळाकडे पाहून जरा भांबावून गेले; परंतु लागलेच त्यांना असें वाटलें कीं, अवसे पुनवेस भुतेंखेतें दृष्टीस पडतात, त्यांतलाच हा कांहींतरी प्रकार असावा. ही कल्पना त्या नावाड्यांची लागलीच दृढ झाली. एक नावाडी म्हणाला,

"महाराज, तो जाळ कसला! आज पौर्णिमा आहे. पौर्णिमेचीं भुतेंखेतें निघतात, त्यांपैकींच हें कांहींतरी आहे."

सच्चिदानंदास नावाड्यांच्या या कल्पनेचें मोठें हंसूं आलें. मनोरमेनें अजून या गोष्टीचा चांगला विचार केला नव्हता. भुतेंखेतें आहेत किंवा नाहींत याविषयीं तिची ठाम अशी कांहींच समजूत नव्हती. आपल्या घरीं निर्भय ठिकाणीं चार माणसांत ती असली, म्हणजे भुतेंखेतें सब झूट आहेत, असें ती प्रतिपादन करीत असे; परंतु एकाकी व भयाण

ठिकाणीं असल्यावर भुतांच्या कल्पनांनीं तिला भीतीहि वाटत असे. या वेळीं तिची अशीच कांहीं चमत्कारिक अवस्था झाली होती. भयाण अशा समुद्रांत प्रत्यक्ष तो जाळ पाहून, तिच्या हृदयांत साहजिकच थोडी भीति उत्पन्न झाली, पण जवळ दोन चार माणसें असल्यामुळें कसेंतरी धैर्य धरून, ती मुकाट्यानें बसली होती. सच्चिदानंदाचीं मात्र भुतेंखेतें नाहींत, अशी पक्की खात्री होती. कोळ्यांची तशी समजूत करून देण्यासाठीं तो म्हणाला."

" अरे, भुतें हीं कदाचित् जमिनीवर असतील, पण तीं समुद्रावर कशीं येतील ? समुद्रांत तर तीं बुडून जातील."

सच्चिदानंदाची कल्पना नावाड्यांस वेडेपणाची वाटली. एक नावाडी म्हणाला,

" नाहीं महाराज! देवाप्रमाणेंच भुतें असतात. भुतें तर समुद्रावर होडीप्रमाणें चालतात. तीं कशीं बुडतील बरें ?"

नावाड्यांचा हा समज पाहून सच्चिदानंदास हंसूं आलें. तो म्हणाला,

" असें कां ? बरें, पण तुम्हीं भुतें कधीं पाहिलीं आहेत का रे ?"

एक नावाडी म्हणाला,

" छे! मी आजपर्यंत भूत कसें असतें, तें कांहीं बघितलें नाहीं; पण लोक सांगतात कीं नाहीं, कीं, भुतें अशीं अशीं असतात. डाकीण असते, ती म्हणे खोल विहिरींत राहते. हडळ असते, ती तर पांखरासारखी या झाडावरून त्या झाडावर उड्या मारते. आज मात्र डोळ्यानें हा भुतांचा प्रकार पाहिला."

सच्चिदानंद म्हणाला,

" तुमची कल्पना अगदीं चुकीची आहे. मला असें वाटतें कीं, तो मचवा असावा. त्यांतील उतारू कांहीं संकटांत सांपडल्यामुळें त्यांनीं मचव्याचें शीड पेटवून दिलें असावें. त्यांचा उद्देश इतकाच कीं, कोणी-तरी येऊन पार पाडावें."

त्या नावाड्यांपैकीं एक नावाडी म्हणाला,

" महाराज, जेथून जाळ निघत होता, थेट त्याच जागेवर आपण आतां आलों आहों. येथें तर कांहींहि दिसत नाहीं, यावरून तें खात्रीनें भूतच असलें पाहिजे."

सच्चिदानंद म्हणाला,

" अरे, तुम्हीं असा भलताच ग्रह करून घेऊं नका. जरा इकडे तिकडे लक्षपूर्वक पहा. जर कोणी कांहीं संकटांत सांपडला असेल तर त्याला आपण वांचविण्याचा प्रयत्न करूं."

एक नावाडी इकडे तिकडे पाहून एका दिशेकडे बोट करून म्हणाला,

" तो पहा, तो मचवा चालला आहे,"

कोळ्यानें दाखविलेल्या दिशेकडे सगळ्यांनीं पाहिल्यावर त्यांना एक मचवा दिसला; परंतु तो विशेष लांब असल्यामुळें त्याच्याविषयीं त्यांना कांहींच अनुमान काढतां येईना; पण पिशाच्च म्हणून जी एक नावाड्यांची कल्पना झाली होती, ती नाहींशी होऊन त्यांचें लक्ष समुद्राकडे लागलें. येथून मुंबई साधारण जवळच असून किनाऱ्यावरील उंच उंच ठिकाणचे दिवे ताऱ्याप्रमाणें लुकलुक करीत होते. त्या दीपदर्शनामुळें नांवाड्यांना उत्साह वाटून ते आपला मचवा जोरानें वल्हवूं लागले. मचवा जोरानें चालला असतां मचव्यास दुसरें लांकूड लागल्याचा आवाज झाला. त्याबरोबर एक नावाडी मोठ्यानें ओरडून म्हणाला,

" अरे, मुर्दारे मुर्दा! हा पहा, या फळीवर मुर्दा आहे."

नावाडी म्हणजे बोलून चालून अडाणी लोक. त्यांना वाटलें हा मुर्दा मचव्यांत घेऊन कांहीं पैसाअडका सांपडेल तो घ्यावा. या आशेनें ते दोघेहि नावाडी मचव्यांत मुर्दा घेऊं लागले. तो हिडीस प्रकार पाहून मनोरमा फारच भ्याली. ती म्हणाली,

" अरे, तें प्रेत कशाला आंत घेतां? प्रेताला शिवूंदेखील नये."

सच्चिदानंद मनोरमेच्या पाठीवर हात ठेवून म्हणाला,

" मनोरमे, तूं फारच भित्री आहेस. प्रवासांत काय काय अडचणी येतात, याचा तुला अनुभव नाहीं. घेऊं दे त्यांना तें प्रेत. मुंबईस गेल्यावर पोलीस त्याच्या वारसाचा शोध करील आणि तसें झालें म्हणजे, त्या प्रेताची उत्तरक्रिया तरी यथासांग होईल."

कोळ्यांनीं तें प्रेत आंत घेतलें व कांहीं सांपडतें का म्हणून शोधूं लागले, तों दोन्हीं नावाड्यांचे हात रक्तानें भरले. तें पाहून एक नावाडी म्हणाला,

" अरे, हें बघ डोक्यांतून भळाभळा रक्त चाललें आहे."

सच्चिदानंदास इतका वेळ तें प्रेतच आहे, असें वाटत होतें; परंतु रक्ताची गोष्ट ऐकतांच तो एकदम आशाजनक स्वरानें म्हणाला,

" जर अझून रक्त वाहत आहे, तर तो मनुष्य जिवंत आहे. थांबा, मला या माझ्या पटक्यानें त्याची जखम बांधूंद्या. मेलेल्या मनुष्याच्या शरीरांतून केव्हांहि रक्त निघत नाहीं."

सच्चिदानंदानें लागलेंच त्याचें रक्तानें लडबडलेलें तोंड चांगलें पुसून टाकून, त्याच्या डोक्याची जखम बांधून टाकली. त्याचे सर्व भिजलेले कपडे काढून टाकून, मऊ अशा एका घोंगडीवर त्याला निजविलें. त्या

लहानशा मचव्यांत जेवढीं ऊबदार वस्त्रें मिळालीं तेवढीं त्याच्या अंगावर टाकून सर्वांनीं मिळून त्यास ऊब आणण्याचा प्रयत्न सुरू केला. सच्चिदानंद त्याची छाती चोळूं लागला. मनोरमा त्याच्या पायांचे तळवे चोळूं लागली. याप्रमाणें उपचार सुरू झाल्यावर त्या मनुष्याचा श्वासोश्वास थोडाथोडा सुरू झाला. इतक्यांत मचवाहि धक्याला लागला.

## प्रकरण पांचवें.

## सूड.

मनुष्याच्या स्वभाववैचित्र्याचें यथातथ्य वर्णन करणें हें कुशल लेखकांवांचून इतरांस कठिण होय. या कादंबरींतील उपनायक विश्वनाथराव, यांच्याविषयीं आम्हीं कितीहि लिहिलें, तरी त्या इभ्रतबाज पुरुषाचें स्वभावचित्र अपुरेंच राहणार. प्रभुता, ऐश्वर्य, विद्या यांनीं गर्वित होऊन पुष्कळ लोक या जगास तृणवत् मानूं लागतात. आपणाहून जगांत कांहीं चांगलें आहे, असें त्यांना वाटत नाहीं; परंतु या इभ्रतखोर प्रतिष्ठितांना आपल्या गर्वाची हें जग किती पर्वा करतें, हें कळत असतें काय? आपण आरवल्यावांचून सूर्योदय होणार नाहीं, अशी कोंबड्यांना जशी घमेंड असतें, तद्वतच या इभ्रतखोरांना आम्हाशिवाय या जगाचें चालणार नाहीं, असा गर्व असतो. लहान अर्भकांनीं देखील ज्या अभिमान्यांना हंसावें इतकी ज्यांची योग्यता, त्यांना जगाच्या मान्यतेची पर्वा नसणें हें साहजिकच आहे; परंतु ज्या ईश्वराच्या सत्तेनें हें सारें जग चाललें आहे, त्या ईश्वराच्या घरीं आपला गर्व कोणत्या मापानें मापला जाणार, तेथें आपल्या अभिमानाची किंमत तरी किती आणि आपणास तेथें आपल्या कृतीचें बक्षीस तरी कोणतें मिळणार? याचा हे लोक कधीं विचार तरी करतात काय? वास्तविक ईश्वरीसूत्रांत फरक करणें हें आम्हां क्षुद्र मनुष्याच्या शक्तीबाहेरचें कार्य होय; तथापि कित्येक इभ्रतखोरांनां ईश्वरीसूत्रें आपल्याच हातीं आहेत, असा अभिमान असतो.

इश्रतीच्या व्यसनानें अंध होऊन वाटेल तीं कार्यें घडविण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला असतो; परंतु ईश्वरीसूत्र निराळेंच असतें.

अवन्तीपुरांतील विश्वनाथराव जहागिरदार यांना आपण मोठे कर्तृत्ववान् आहों, असा अभिमान होता. आपण जें मनांत आणूं तें निःसंशय करूं, अशी त्यांना मोठी घमेंड वाटत होती. वेणूचा विवाह माधवराचाबरोबर करण्याचें त्यांचे मनांत येतांच तेवढ्यासाठीं त्यांनीं दांडगा प्रयत्न चालविला होता. अगोदर वेणूस फसवून आपल्या ताब्यांत घेऊन ठेविलें. कृष्णराव आडवा येणार, तर त्यास समुद्रांत ढकलून देऊन त्यांनीं त्यांच्या समजुतीप्रमाणें त्याला जलसमाधि दिली होती. गोविंदरावांच्या घरास आग लावून, त्यांस अगदीं गायीपेक्षांहि दीन करून टाकलें होतें. वेणूची आई तर काय बोलून चालून अबला. त्या बापडीकडून उपसर्ग लागण्याची कांहींच भीति उरली नव्हती. याप्रमाणें विश्वनाथरावांनीं एवढा कडेकोट बंदोबस्त केला होता, तरी हा व्यूह कसा ढासळून टाकतां येईल, याची वाटाघाट ईश्वराचे घरीं कधींपासूनच सुरू झाली होती; तथापि या ईश्वरी योजनसंबंधानें जाहागिरदार साहेब कधींच विचार करीत नव्हते. बरेंवाईट, पापपुण्य, धर्माधर्म, या कल्पनाच त्यांच्या मनाला कधीं शिवत नसत. ते आपल्याकडून हा विवाहतंतू ताणून दुसऱ्या टोंकास पोंहोंचविण्याचा प्रयत्न करित होते; परंतु मध्यतरींच तो कोठें तुटेल किंवा काय, याची काळजी त्यांना मुळींच नव्हती. जणूं काय आपण चालविलेल्या प्रयत्नांत ईश्वरास देखील हात घालण्याचा अधिकार नाहीं, असें ते दर्शवीत होते. असो. तूर्त आपण या घमेंडखोर विश्वनाथरावांना सोडून देऊन, मुंबईत चोपाटीवर असलेल्या रमाबाईच्या बंगल्याकडे दृष्टि वळवूं.

केशवराव अवंतीपुरास निघून गेल्याचें आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्यांना जाऊन पांच सहा दिवस झाले, तरी त्यांच्याकडून कांहीं पत्र निरोप नसल्यामुळें रमाबाईंना मोठी काळजी लागली होती. आजतर त्यांना त्यासंबंधानें नाना कुकल्पनांनीं भंडावून सोडिलें होतें. कसा तरी वेळ घालवावा, म्हणून त्या आपल्या लहानग्या हिमूबरोबर सज्यांत बोलत बसल्या होत्या. हिमू आपल्या आईला 'दादा केव्हां येईल' हा एकच प्रश्न वारंवार विचारीत होती. रमाबाई केव्हां तिला पोटाशीं कुरवाळून, केव्हां तिच्या नाजुक गुलाबी गुलगुलित गालाचें चुंबन घेऊन, 'आतां येतील बरें बाळ;' असें उत्तर देत. केशवराव आजवर न आल्यामुळें रमाबाईस मोठी हुरहुर लागली होती. आई, बाप, बंधु व पति यांच्याविषयींचे नाना प्रकारचे विचार रमाबाईंच्या मनांत येत होते. दुसऱ्यांचें अनिष्ट चिंतण्याच्या कल्पना वैऱ्याला जितक्या सुचत नाहींत, तितक्या स्वताच्या मनाला जास्त सुचतात; या मनुष्यस्वभावाप्रमाणें या वेळीं रमाबाईची स्थिति झाली होती. वारंवार रस्त्याकडे लांबवर नजर करून, आपल्या घराकडे एखादी गाडी येत आहे किंवा काय, तें पहावें; एखादी गाडी दृष्टीस पडली, तर तिच्याकडे मोठ्या उत्सुकतेनें लक्ष पुरवावें आणि ती गाडी दारापुढें न थांबता पुढें निघून गेली, म्हणजे हिरमुसलें तोंड करून पुन्हां काळजींत पडावें; असा क्रम रमाबाईंचा चालला होता. या वेळीं त्यांना करमणुक काय ती हिमूची होती; परंतु हिमू तरी वारंवार आपल्या दादाविषयींच विचारी. यामुळें त्यांना हिमूची समजूत घालून, स्वतःच्या मनाचेंहि समाधान करून घ्यावें लागे. रमाबाईंनीं सहज म्हणा अथवा लहान मुलांच्या तोंडून निघणारे शब्द लवकरच खरे होतात, अशी बायकी समजूत असल्यामुळें म्हणा,

त्यांनीं हिमूला आपल्या पोटाशीं घट्ट कुरवाळून धरून व तिचा एक मुका घेऊन तिला विचारलें.

" हिमू, तूं सांग बरें, केव्हां घरीं यायचें होईल तें ! "

हिमू एका गाडीकडे बोट दाखवून म्हणाली,

" आई, दादा आतां येईल. ती बघ, ती गाडी आली."

हिमूनें बोटानें दाखविलेल्या दिशेकडे रमाबाईनें पाहिलें, तों खरो-खरच एक गाडी त्या रस्त्यानें धांवत येत असतांना दिसली. रमा-बाईची नजर गाडी आपल्या घरापुढें उभी राहते किंवा पुढें निघून जाते याकडे होती. इतक्यांत ती गाडी रमाबाईच्याच बंगल्यापुढें येऊन उभी राहिली आणि त्या गाडींतून केशवरावच खालीं उतरले. केश-वरावांना पाहातांच रमाबाईना व हिमूला मोठा आनंद झाला. हिमूच्या आनंदास तर पारावारच उरला नाहीं; परंतु रमाबाईस झालेला आनंद लागलाच नाहींसा झाला. कारण केशवरावांचा चेहरा त्यांना फारच खिन्न व काळवंडून गेलेला दिसला. केशवराव माडीवर येतांच रमा-बाई म्हणाल्या,

" रस्त्यानें ऊन लागलें वाटतें. चेहरा अगदीं सुकून गेला आहे. खुशाल आहेतना घरचीं सगळीं माणसें ? "

या प्रश्नाचें उत्तर केशवरावांनीं कांहींच दिलें नाहीं. त्यांनीं आपल्या अंगावरील प्रवासी पोषाख काढून ठेवून, एक दीर्घ श्वास सोडला व हताश होऊन ते एका आरामखुर्चीवर बसले. केशवरावांचा तो उसासा ऐकून व त्यांचा तो हताश चेहरा पाहून, रमाबाईच्या पोटांत चर्र झालें. त्या पुन्हां केविलवाण्या स्वरानें म्हणाल्या,

" आई, बाबा सगळीं खुशाल आहेतना ? "

केशवरावांचे डोळे पाण्यानें भरून आले. ते आर्तस्वरानें म्हणाले,

" तुझी आई व बाबा दोघेंहि खुशाल आहेत."

रमाबाई अधिक घाबरून जाऊन म्हणाल्या,

" आणि माझा कृष्णराव? तो खुशाल आहेना ? "

केशवरावांची मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. त्यांची छाती दुःखानें दुभंग झाली होती. यामुळें त्यांच्या तोंडांतून एक शब्दहि निघेना. रमाबाई पुन्हां केविलवाण्यास्वरानें म्हणाल्या,

" सांगा हो, माझा कृष्णराव खुशाल आहेना ? तो अवंतापुरासच आहेना ? "

केशवराव आपल्या डोळ्यांस पदर लावून म्हणाले, " नाहीं. "

रमाबाईस ' नाहीं ' या शब्दाचा कांहींच अर्थ कळला नाहीं. केशवरावांच्या एकंदर चिन्हांवरून कांहींतरी अशुभ वार्ता कळणार, असें त्यांना वाटूं लागलें. त्या दीनस्वरानें म्हणाल्या,

" नाहीं ! नाहीं याचा अर्थ काय? तो अवंतिपुरास नाहीं, कीं, खुशाल नाहीं ? "

केशवराव आपलें मस्तक हातावर स्थिर करून म्हणाले,

" तो खुशाल आहे, कीं नाहीं, याचा तपास लागला नाहीं; पण तो अवंतीपुरास नाहीं."

केशवरावांचें संदिग्ध बोलणें ऐकून रमाबाईच्या डोक्यांत निराळीच कल्पना आली. त्यांना असें वाटलें कीं, कृष्णराव कदाचित् वेणूबरोबर कोठेंतरी गेला असावा. ही कल्पना खरी ठरवून घेण्यासाठीं त्या म्हणाल्या,

" वेणु आपल्या घरींच आहे का ? "

" छे ! तीहि आपल्या घरीं नाहीं. "

वेणु बरेच दिवसांपासून नाहींशी झाल्याचें रमाबाईंना माहीत होतें, यामुळें त्यांची ती कल्पना लागलीच ठाम झाली. त्या म्हणाल्या,

" पण कृष्णराव कोणीकडे गेला, याचा कांहीं तपास लागला का ? "

केशवराव शोकानें अत्यंत व्याकूल होऊन म्हणाले,

खर "नला मी आतां सांगू तरी काय ? कृष्णराव गेला ! तो आपणा सर्वांना बाईची न~लोकीं निघून गेला ! ! "

हा भयंकर वज्राघात रमाबाईंच्या हृदयावर होतांच त्या दुःखातिरेकानें मटकन खालीं बसल्या. त्या आपल्या पतीला कवटाळून म्हणाल्या,

" तुम्ही पाहिला कां माझा कृष्णराव परलोकीं गेला तो ? त्यांनीं माझ्याविषयीं तुमच्याजवळ कांहीं सांगितलें का ? अरेरे ! असा रोग तरी कोणता झाला होता ? त्या खेडेगांवांत औषधोपचारासाठीं वैद्य-देखील मिळाला नसेल. कृष्णराव, कायरे हें केलेंस ! वृद्धपणीं आईचा व बाबांचा आतां कोण सांभाळ करील. आई व बाबा कृष्णराव कृष्णराव म्हणून एकसारखा टाहो फोडीत असतील. काळ्या पाषाणास देखील पाझर फुटला असेल; पण मेल्या अंतका, तुला कांहीं दया आली असेल का ? त्या वृद्धांची काठी हिसकावून घेऊन तुला काय मिळालें ? देवा कायरे हा प्रसंग ! माझ्या हिमूवर कृष्णरावाचें केवढें प्रेम ! बाई हिमू, ये, इकडे ये. तुझा मामा गेला बरं तुला टाकून ! त्याला या लेंकराची देखील दया आली नाहीं. माझा कृष्णराव हिमूविषयीं तरी कांहीं म्हणाला कां ? "

कारटी मोठी अभद्र आहे; हिचें मुखावलोकन देखील करूं नये. कृष्णराव, या समाजांत जरी सर्वच लोक अशा क्षुद्रबुद्धीचे आहेत, तरी कांहीं उदात्त अंत:करणाचे महात्मे आहेतच. आमच्या घरा शेजारीं असेच थोर विचारांचे एक गृहस्थ रहात असत. माझ्या वैधव्यावस्थेबद्दल त्यांना फार वाईट वाटे व ते नेहमीं दयार्द्र अंत:करणानें माझा पूसतपास करीत असत. माझ्या अभद्रपणाची साक्ष लोकांना पुरी पटल्यामुळें, मजबरोबर खेळण्यासाठीं लोकांच्या मुली मजकडे येईनातशा झाल्या, व मलाहि त्या मुली आपल्या आईबापांच्या सांगण्यावरून आपल्या घरीं येऊं देत नसत; परंतु आमच्या शेजारच्या गृहस्थानें असा तिरस्कार केव्हांहि दर्शविला नाहीं. मी त्यांच्या घरीं जाऊन त्यांच्या मुलांबरोबर नित्य खेळत असें, त्यांच्या मुलीबरोबर मीहि शाळेंत जात असें आणि ते उदार गृहस्थ मला आपल्या मुलीप्रमाणेंच मानीत असत. शाळेंतील माझा अभ्यासक्रम पाहून त्या गृहस्थांस मोठें कौतुक वाटे. विद्यार्जनांत माझी विलक्षण हुशारी पाहून मी त्या गृहस्थांच्या कृपेस पूर्ण पात्र झालें होतें. माझ्यामागें त्या वेळीं लग्नाची काळजी उरली नसल्यामुळें मी आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत शाळेंत जात होतें. इतक्या अवधींत मी मराठी अभ्यास पुरा करून, थोडें इंग्रजी व थोडें संस्कृत ज्ञान संपादन केलें व पुढेंहि शिकण्याचा माझा विचार होता, पण त्या शाळेंत जास्त शिकविण्याची सोय नसल्यामुळें मीं त्या शाळेचा निरोप घेऊन घरींच रामायण, भागवत, भारत या ग्रंथांचें वाचन सुरू ठेवलें. प्रथम प्रथम त्या थोर ग्रंथांच्या परिशीलनानें मला कांहींच कळेना. परंतु कांहीं दिवसांनीं मला बरेंच कळूं लागलें व मोठी मौज वाटूं लागली. माझी तर अशी ठाम समजूत झाली आहे कीं, हे

ग्रंथ आमच्या राष्ट्राला अमूल्य राष्ट्रीयसंपत्तीप्रमाणें असून त्या ग्रंथांचें ज्ञान प्रत्येक आर्यगृहिणीला असणें अवश्य आहे.

कृष्णराव, ते माझे सुखाचे दिवस केव्हांच भराभर संपून जाऊन, मेलें हें खडतर तारुण्य प्राप्त झालें. मला जर देवानें कुरूपपणा दिला असता, तर या तारुण्याबद्दल मी मुळींच काळजी बाळगिली नसती; पण विधात्यानें मला थोडेंसें सौंदर्य दिल्यामुळें तारुण्यावस्थेबरोबरच माझ्या साडेसातीस आरंभ झाला. मी जर कुरूप असतें, मजकडे पाहिल्याबरोबर लोकांना किळस उत्पन्न व्हावी, अशा प्रकारचें रूप जर मला देवानें दिलें असतें, तर मी त्याची अत्यंत ऋणी झालें असतें; परंतु मला मोहक सौंदर्य देऊन तो पुष्कळच चुकला, असें मला वाटतें. मी आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षीं तर तारुण्यावस्थेमुळें अधिक सुस्वरूप दिसूं लागलें. जगांत किती प्रकारचे लोक असतात, हें तुम्हांला माहितच आहे. सुष्टांपेक्षां दुष्टच अधिक दृष्टीस पडतात. समाजांत दुष्ट, निंदक, मदांध, व्यसनी व दुराचारीच फार आढळून येतात. त्या लोकांच्या त्रासामुळें मला रस्त्यांतून फिरणेंहि अवघड झालें. कांहीं कामानिमित्त मी घरांतून बाहेर पडलें कीं, चावट लोक मजकडे निरखून पहात, कित्येक मोठमोठ्यानें खांकरत, कित्येक घोड्याप्रमाणें मोठमोठ्यानें हिंसळत व कित्येक मला स्पष्टपणें ऐकूं येतील असे फाजील शब्द आपल्या स्नेह्यांजवळ उच्चारीत. कृष्णराव, कोण ते माझे हाल! त्या मर्मांतिक वेदनांची नुसती आठवण झाली, तरी अंगाचा अगदीं संताप होऊन जातो. मग त्या वेळीं मला काय वाटत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे.

तुम्हीं ज्याला समाज म्हणतां, ज्या समाजाविषयीं तुम्हीं आदर बाळगितां, ज्या समाजाचीं बंधनें तुम्हीं पाळतां, त्या समाजाचें आम्हां अनाथ विधवांविषयीं हेंच काय प्रेम ! हीच काय या समाजाची आम्हांविषयीं सहानुभूति ? आमच्यावर ईश्वर कोपला, म्हणून त्या आगीवर यांनीं आणखी तेल ओतावें, हेंच काय या समाजाचें आम्हांविषयीं कर्तव्य ? कृष्णराव, हा हितघातकी समाज आम्हांविषयीं एक काडीभर देखील सहानुभूति दाखविण्यास तयार नाहीं. कोणाहि सुस्वरूप तरुण विधवेचा अनुभव माझ्याप्रमाणेंच असेल. आम्हीं अबला असल्यामुळें या समाजाचे मर्माघात निमुटपणें सहन करतों. कारण आमचा कोणी वालीच नाहीं. आम्हांस एकदां वैधव्य प्राप्त झालें, म्हणजे वाटेल त्यानें वाटेल तें बोलावें, प्रभातकालीं प्रथमतःच माझ्यासारख्या विधवा स्त्रीचें कोणास दर्शन झालें, तर त्यानें तो मोठा अपशकून झाला, असें म्हणावें; आम्हांस शिव्या द्याव्यात, वाईट बीभत्स शब्द आम्हांविषयीं वापरावेत आणि आमचा पदोपदीं तिरस्कार दर्शवावा हाच काय या समाजाचा न्याय ? आम्हीं विधवा झालों, यांत आमचा काय बरें अपराध ? उलट यामुळें आम्हीं सर्वांच्या दयेस व सहानुभूतीस पात्र व्हावयाच्या; पण या समाजांत एवढा न्याय कोठें आहे ? वाटेल तशीं वाईट कृत्यें करून पुरुषांना या समाजांत खुशाल उजळ माथ्यानें हिंडतां येतें; परंतु ईश्वरीक्षोभामुळें वैधव्याचा डाग लागलेल्या स्त्रियांना घरांत एकीकडे सगळ्यांत अधिक अंधाराची जी जागा असेल, त्या जागेत बसून काळ कंठावा लागतो.

कृष्णराव, लोक जरी माझ्यामागें इतके हात धुवून लागले होते, तरी त्याचें मला विशेष कांहीं वाटत नसे. कारण लोकांच्या बोलण्याकडे

लक्ष द्यावें, असा माझा स्वभावच नाहीं; पण मला वाईट वाटतें तें एवढ्याचसाठीं कीं, माझ्यासारख्या अनेक तरुण विधवांचीं मर्मस्थलें या कुटिल समाजाचे मर्माघात कसे सहन करीत असतील? असो. याप्रमाणें मी आपलें आयुष्य कंठित असतां मजवर फारच निराळा प्रसंग आला आणि त्यामुळें लोकांच्या निंदाप्रचुर स्वभावाला आणखी प्रोत्साहन मिळालें. तो भयकर प्रसंग येण्याचें कारण तो दुष्ट धोंडीराज होय. तुम्ही पुरुषासारखे पुरुष असून, त्यानें तुम्हांला देखील फशीं पाडलें; मग मजसारख्या अबलेला संकटांत लोटायला कठिण तें किती! मी एके दिवशीं दिगंबर साधूच्या मठाजवळून आपल्या सासरीं जात असतां तो चांडाळ त्या मठाजळ मला भेटला आणि म्हणाला, ‘मनो-रमाताई, वर एक महात्मे साधु आले आहेत. काय त्यांची थोरवी सांगावी! शेंकडों लोक त्यांच्या दर्शनासाठीं येत आहेत!!’ असें त्यानें कांहींतरी खोटें सांगून मला मठांत नेलें; पण तेथें बघतें तों साधु न संन्याशी! तो भयाण मठ व तो धटिंगण पाहून माझी तर भीतीनें अगदीं गाळण उडाली. इतक्यांत त्या चांडाळानें मला एका खोलींत कोंडून तीन दिवस बंदिवासांत ठेवलें. मीं आपल्या सतित्व संरक्षणाची तेथें अगदीं पराकाष्टा केली. शेवटीं सुटकेचा मार्ग नाहीं, असें जाणून मीं मठांतील माडीच्या खिडकींतून उडी टाकली. त्या विषम आघातानें मी अचैतन्य होऊन भूमीवर पडलें आणि त्याच स्थितींत मला सच्चिदानंदांनीं आपल्या आश्रमांत आणलें. मीं शुद्धीवर आल्यावर सच्चिदानंदांना आपली सर्व हकीकत कळविली. ती ऐकून घेऊन त्यांनीं मला परत माझ्या आईकडे पोंहोंचती केली.

मी अचैतन्यावस्थेंत भूमीवर पडलें असतां माझे सतित्वाचा नाश झाला असावा, असें मला शुद्धीवर आल्यानंतर वाटूं लागलें. मीं माझ्या गांवीं गेल्यावर तर तो माझा समज अधिकच दृढ झाला; कारण लोकांचे वाग्बाण त्या वेळीं निरनिराळ्या स्वरूपाचे माझ्या हृदयावर येऊन आदळूं लागले. मला त्या दुष्टानें तीनचार दिवस मठांत ठेवलें होतें, एवढ्या एका गोष्टीवरून लोकांनीं आपलें डोकें खर्च करून निरनिराळे इतिहास तयार केले होते. लोक माझ्याकडे बोट दाखवून निःशंकपणें मनास येईल तें बोलूं लागले. कोणी माझी निंदा करीत, तर कोणी मला खुशाल विश्वयोषितांच्या दृष्टीनें लेखीत. जणूं काय लोकांना माझ्या दयाजनक स्थितीचा विचार करण्यास देवानें हृदयच दिलें नव्हतें. माझ्या आईचा मजविषयीं पहिल्यापासूनच वाईट ग्रह झालेला होता. त्यांत आणखी या जनवार्तेची भर पडल्यावर तर, तिची अशी ठाम समजूत झाली कीं, ही कारटी कुलकलंकास कारणीभूत होणार. तेव्हांपासून आजवर ती देखील मजशीं सहानुभूतीनें वागली नाहीं. माझी आई जरी मजशीं धुसपुस करून वागत असे, तरी ती मला पूज्यच वाटत असे; परंतु पुढें पुढें तिला असें वाटूं लागलें कीं, पोरीच्या तारुण्याचा उपयोग पैसा मिळविण्याकडे करावा. ही तिची राक्षसी कल्पना मला दृग्गोचर झाल्याबरोबर ती जरी माझी आई होती, तरी मी तिला रागानें यथास्थित बोललें. कृष्णराव, त्या वेळीं माझ्या मनाची स्थिति खरोखर फार चमत्कारिक झाली होती. मला खाणें सुचेना, पिणें सुचेना, रात्रीची झोंपदेखील येईना. रात्रंदिवस 'देवा, मी या तारुण्याचें काय करूं ?' म्हणून मनाशीं विचार करीत असें. मला माझें तारुण्य व स्वारुण्य शत्रूपेक्षां भयंकर, विषापेक्षां कडू व शस्या-

पेक्षांहि तीक्ष्ण वाटूं लागलें. तारुण्यावांचून मला कांहीं सुचेना व दिसेना. माझ्या मनाला समाधान असें वाटेना. शेवटीं ज्या पुण्यवान पुरुषानें माझी संकटांतून सुटका केली होती, त्याच्याच चरणावर जाऊन लोळण घेण्याचा विचार केला व त्याप्रमाणें एके दिवशीं आईला न कळवितां मोठ्या कष्टानें सच्चिदानंदाच्या आश्रमांत निघून आलें.

मी सच्चिदानंदाच्या आश्रमांत येऊन राहिलें, तरी माझ्या मनाला समाधान असें वाटेना. मठांत घडलेला भयंकर प्रकार माझ्या मनांत वारंवार येऊन, तो मला अगदीं भंडावून सोडीत असे. त्या विलक्षण गोष्टीची मला आठवण झाली, म्हणजे एक तर मला त्या दुष्टाचा सूड घ्यावा किंवा आपल्या जीवाचें तरी कांहीं बरें वाईट करावें असें वाटे; परंतु सूड घेणें, किंवा जीव देणे या दोन्हींहि गोष्टी त्या आश्रमांत माझ्या स्वाधीन नव्हत्या. आश्रमांत सच्चिदानंदाच्या दर्शनासाठीं व त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं नित्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत. त्यामुळें तेथें आत्महत्या करण्याची मुळींच सवड नव्हती; तथापि आत्महत्या करण्याची माझी इच्छा अनावर होत चालली होती. शेवटीं एकदां संधि साधून, मीं या इहलोकचा त्याग करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें गळ्याला दोरीचा फांस घेऊन एका झाडाला टांगून घेतलें. आणखी थोडा वेळ तेथें कोणीं आलें नसतें, तर मी सुखानें मरून गेलें असतें; पण इतक्यांत तेथें दहा पांच लोक धांवून येऊन, त्यांनीं माझ्या गळ्याचा फांस तोडून टाकला. त्या वेळीं माझ्या मनाची स्थिति कशी झाली होती, याची कल्पना आतां मला स्वत:ला देखील करतां येत नाहीं. माझ्या या कृत्यामुळें सच्चिदानंदांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला. त्यांनीं मला प्रेमपूर्वक अनेक हिताच्या गोष्टी सांगितल्या व मी निर्दोष आहे

अशी त्यांनीं माझी खात्री करून दिली. कृष्णराव, तुमच्या मतानें मी निर्दोष आहें का ?"

कृष्णराव पूज्यबुद्धीनें म्हणाला,

"होय मनोरमाताई. आपण मला पूर्ण निर्दोषी आहां असें वाटतें. तुम्हांला दोषी म्हणणें हा या समाजाचा भ्रांतिमूलक समज होय. ज्या दुष्ट, नीच नराधमानें तुम्हांला विनाकारण त्रास दिला, त्याला शासन करण्याचें या समाजाचे अंगीं सामर्थ्य नसल्यामुळें तो तुमच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन, तुम्हांस नांवें ठेवीत आहे. त्या नीच पशूनें या समाजांत खुशाल फिरावें आणि तें या आपमतलबी समाजानें निःशंकपणें पहावें, हें या समाजाच्या पंगूपणाचें लक्षण होय. या अशा आंधळ्या समाजाची याचमुळें प्रगति होत नाहीं. श्रीमंत व सत्ताधीश अशा लोकांकडे तर या समाजास पाहण्याचें देखील धैर्य होत नाहीं. या लोकांनीं वाटेल तशीं घाणेरडीं कृत्यें केलीं, तरी यांना समाजांत मान आहे तो आहेच. मनोरमाताई, या समाजानें तुमची कितीहि निंदा केली, तरी त्याकडे लक्ष देण्याचें तुम्हांला कांहीं देखील कारण नाहीं. तुम्हीं खात्रीनें निर्दोषी व निर्मळ आहां."

कृष्णरावाचें बोलणें संपल्यावर मनोरमा म्हणाली,

"कृष्णराव, सच्चिदानंदांनीं जरी मला पुष्कळ हितोपदेश केला, तरी तारुण्यासंबंधानें माझ्या मनांतील विचार नाहींसा झाला नाहीं. अनेक ग्रंथांच्या परिशीलनानें व सच्चिदानंदासारख्या विद्वानाच्या हितोपदेशानें माझ्या मनावर कांहीं निराळाच परिणाम झाला व त्यावरून मीं आपलीं कांहीं मतें ठरविलीं.

१. बारापासून पंधरा वर्षांच्या वयाच्या मुलीस देशस्थिति, त्यांचें शिक्षण व शरीरस्थिति, याकडे लक्ष देऊन, कुमारिका समजावें व कुमारिकांचा विवाह करणें शास्त्रविरुद्ध व अमानुषपणाचें समाजानें ठरवावें.

२. तारुण्यावस्थेस आरंभ होण्याबरोबर त्यांच्या संमतीनें योग्य पतीशीं त्यांचा विवाह व्हावा व तोच विवाह शास्त्रसंमत धरून समाजानें कायदेशीर मानावा.

३. दुर्भाग्यवशात् गर्भधारण होण्याच्या पूर्वी, किंवा असंतान स्थितींत तरुण स्त्री विधवा झाल्यास ज्यांची इच्छा असेल, त्यांना श्री शंकराचार्यांनीं पुनर्विवाह करण्याची परवानगी द्यावी.

या माझ्या मतांसंबंधानें मी नित्य विचार करीत असतें. माझ्या लग्नासंबंधानें जर विचार केला, तर मला विधवा मानणें अत्यंत चुकीचें होय. इतकेंच नव्हे, तर तें अशास्त्र व अमानुषपणाचें होय, असें मला वाटतें. हल्लींच्या दुष्कर प्रसंगीं तरुण विधवांनीं ब्रह्मचर्यानें राहणें अत्यंत बिकट होय. ब्रह्मचर्यव्रतानें राहावें, असा कित्येक उपदेश करितात; परंतु शक्याशक्यतेबद्दल ते विचार करीत नाहींत. मनाचा दुर्बलपणा व स्वाभाविक अबलत्व यांमुळें क्षणोक्षणीं विधवांकडून किती अनाचार होतो, याकडे मुद्दाम डोळे मिटून दुर्लक्ष करणें, एकट्या समाजाच्याच दृष्टीनें नव्हे, तर राष्ट्राच्या दृष्टीनें देखील मोठ्या अधोगतीचें लक्षण होय. माझा विवाह, माझें वैधव्य व मजवरील अनेक प्रसंग, ह्यांमुळें माझ्या मनानें असें पक्कें घेतलें होतें कीं, योग्य पतीबरोबर विवाह करून त्याच्या सहवासांत राहण्यावांचून आपणास अन्य मार्ग नाहीं. सच्चिदानंदांची विद्वत्ता, समता, उदात्त तत्वें व गंभीर मनोवृत्ति पाहून मीं

त्यांच्याबरोबर विवाह करण्याचा निश्चय केला. सच्चिदानंद माझीं तत्वें मान्य करतात; इतकेंच नव्हे, तर तीं त्यांना राष्ट्राच्या दृष्टीनें आवश्यक व कल्याणकारक वाटतात. म्हणून एके दिवशीं मी त्यांना आपला मनोदय कळविला; परंतु केवळ मानसिक धैर्याच्या उणिवीमुळें माझी विनंति त्यांनीं अमान्य केली व ते मुंबईस जाण्यास निघाले. सच्चिदानंद मार्गस्थ झाल्यावर पुन्हा माझ्या मनांत आत्महत्येचे विचार घोळूं लागले; मी लागलीच समुद्रांत उडी टाकली; पण सच्चिदानंदांनीं मला त्या वेळीं वांचविलें व माझा स्वीकार केला. कृष्णराव, एवढेंच या अभागिनीचें चरित्र."

कृष्णराव कृतज्ञतापूर्वक म्हणाला,

"मोकळ्या मनानें तुम्हीं आपली सर्व हकीकत मला सांगितली, याबद्दल मी आपला फार ऋणी आहें. बरें पण मनोरमाताई, केशवराव अजून आले नाहींत हें कसें काय?"

कृष्णरावाचें शेवटचें वाक्य पुरें होतें न होतें, तोंच केशवराव, रमाबाई व हिमू कृष्णरावापुढें येऊन उभे राहिले. रमाबाई कृष्णरावाला कडकडून भेटल्या. हिमूनें तर मामा, मामा म्हणून एकच जयघोष सुरू केला.

## प्रकरण सातवें.

# मौज.

विश्वनाथरावांच्या आनंदास आतां पारावार राहिला नव्हता. आपण य:काचित् मनुष्यप्राणि आहों, हें ते मुळीं विसरूनच गेले होते. अभिमानाच्या अंधत्वामुळें आपलें जहाज कोणच्या खडकाकडे वाहून जात आहे, हें त्यांना मुळींच दिसत नव्हतें. आपण ज्या कार्यास आरंभ करतों, त्यांत आपणास हटकून यश मिळतें, अशी त्यांची समजूत झाली होती. या यशाचें कारण स्वत:च्या कार्यकुशलतेशिवाय कांहीं असावें असें त्यांना वाटेना. धन्य आपली कर्तबगारी! धन्य आपला प्रयत्न!! आणि धन्य धन्य मी!!! असें म्हणून जहागिरदार साहेब स्वत: आपल्या हातानें आपल्यावरून दिवा ओंवाळून घेत होते. त्यानां आतां स्वर्ग कायतो दीड बोट उरला होता. त्या वेळीं अवन्तीपुरांत सगळीकडे वेणूच्या लग्नाची चर्चा चालली होती. विश्वनाथरावांच्या बाजूकडील भिक्षुकादि मंडळीला मोठा आनंद झाला होता. हीं आशाळभूत भुतें विश्वनाथरावांकडे वारंवार येऊन, 'योग्य योग्य. रावसाहेबांना या कामीं फार श्रम पडले; पण शेवटीं ईश्वरानें तुम्हांसच यश दिलें, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.' असें म्हणत. यावर विश्वनाथराव किंचित् स्मितहास्य करून 'हा सगळा श्री काशीविश्वेश्वराचा प्रभाव! प्रयत्न माझा आणि यश त्याचें!!' असें उत्तर देत. जो जो कोणी विश्वनाथरावांकडे येऊन त्यांना याप्रमाणें हरभऱ्याच्या झाडावर चढवी, त्याच्याशीं ते गोड गोड बोलत, त्याला पानसुपारी देत आणि त्याचा चांगला आदरसत्कार करीत.

वेणूच्या लग्नास आतां कांहीं फार अवकाश राहिला नव्हता. उद्यां सकाळीं दाहा वाजतां विश्वनाथरावांचे शालक माधवराव, यांच्याबरोबर वेणूची जन्माची गांठ बांधली जाणार होती. उद्यांच लग्न असल्यामुळें विश्वनाथरावांच्या घरीं मोठी गडबड उडाली होती. निमंत्रित, बिननिमंत्रित, आगांतुक, आप्त, सोयरे, स्नेही वगैरे सर्व मंडळी लग्नासाठीं गोळा झाली होती. जहागिदार साहेबांचा प्रचंड वाडा माणसांनीं गजबजून गेला होता. सर्वांची व्यवस्था वाड्यांत लागेना, म्हणून दारापुढें चांगल्या कारागिरांकडून मोठा सुशोभित व भव्य मांडव घातला होता. मांडवाच्या चारी बाजूंला चार कमानी उभारल्या असून आंत तीन ठिकाणीं कारंजीं उडण्याची व्यवस्था केली होती. शेंकडों प्रकारच्या हंड्या झुंबरें लावलीं असून, मुंबईहून मुद्दाम इंजिन आणून विजेचे दिवे लावण्याची सोय केली होती. तालुक्याचे व जिल्ह्याचे अधिकारी लग्नसमारंभास यावयाचे असल्यामुळें त्यांच्यासाठीं वाड्याजवळच तंबू, डेरे, राहुट्या ठोकून दिल्या होत्या. अवन्तीपुरावर विश्वनाथरावांची सत्ता असल्यामुळें व हातांत ऑनररी मॅजिस्ट्रेटचा अधिकार असल्यामुळें त्यांनीं सर्व अवन्तीपूर लोकांकडून शृंगारून काढलें होतें. सारांश या वेळीं अवन्तीपुरांत कोणाकडेहि जा, तेथें वेणूच्या लग्नावांचून दुसरा विषयच ऐकूं यावयाचा नाहीं; इतकें विलक्षण स्वरूप वेणूच्या लग्नाला आलें होतें.

माधवरावाची विश्वनाथरावांजवळ फारशी किंमत नव्हती. त्याच्या लग्नाला एवढा खर्च करावा, अशी त्यांची मुळींच इच्छा नव्हती; परंतु केवळ स्वतःच्या इभ्रतीसाठीं व सत्ताधीश जें बोलतात, तें खरें करून दाखवितात, अशी शेखी मिरविण्यासाठीं त्यांनीं हा लोकांना दिपवून

टाकण्याचा प्रयत्न चालविला होता. वास्तविक माधवरावमामांचा विवाह होण्याचा मुळींच संभव नव्हता आणि यदाकदाचित झालाच, तर त्यांच्याचसारख्या रूपवान् मुलीबरोबर होईल, असें सर्वांना वाटत होतें. परंतु विश्वनाथरावांनीं तिकडे लक्ष घातल्यामुळें सुंदर, सुस्वरूप, सुशील व उपवर मुलीबरोबर मामासाहेबांचा विवाह होण्याचा प्रसंग आला होता. या विलक्षण गोष्टीमुळें मामासाहेबांचा अनुजवर्ग आनंदानें डोलत होता. लग्नासाठीं आलेले सर्व लोक मुलगी पाहून खुष झाले होते. विश्वनाथरावांच्या राणीसाहेब राधाबाई, यांच्या आनंदाला तर सीमा राहिली नव्हती. त्या साभिमानानें नाकांतील झुपकेदार नथ उडवीत उडवीत, 'मामांचा विवाह अशातशा मुलीबरोबर नाहीं, तर अप्सरे बरोबर आहे' असें म्हणत. या विवाहप्रसंगीं धोंडीराजास तर स्वतःच्या कर्तबगारीचें कौतुक गातां गातां पुरें झालें होतें. इतर लोकांना म्हणजे ज्यांचा या विवाहाशीं फारसा संबंध नव्हता, तेहि खुषी होते. ते म्हणत कोणाबरोबर कोणाचा कां विवाह होईना; पण चार दिवस गांवांत मौज उडेल, पक्कान्नांवर ताव मारावयास सांपडेल, वेश्यांचें सुस्वर गाणें ऐकावयाला मिळेल व नाच पहावयाला मिळेल; हा लाभ काय थोडा आहे?

याप्रमाणें सर्व आनंदांत मग्न होते; पण बिचाऱ्या वेणूची काय स्थिति असेल बरें? शिव, शिव! तिच्या यंत्रणेस सीमा उरली नव्हती!! विश्वनाथरावांच्या माजघरांतील खोलींत, अथवा स्पष्ट म्हणावयाचें म्हणजे तुरुंगांत, वेणु एका कोपऱ्यांत रडत बसली होती. तिला तेथें खाण्यास किंवा पिण्यास नव्हतें, अथवा वस्त्रपात्राची ददात होती, असें मुळींच नाहीं; परंतु कृष्णराव व स्वतःचा माधवरावाबरोबर होणारा विवाह, या

कराल काळजीनें ती दुःखार्णवांत बुडून गेली होती. वेणु तेथें एक-सारखी आक्रोश करीत होती, पण त्याकडे कोणाचें लक्ष नव्हतें. 'रडेना रडली तर, आम्हाला तिच्या रडण्याशीं काय करावयाचें आहे?' असें सर्व जण म्हणत. विश्वनाथराव तर असें स्पष्ट म्हणत कीं, 'विवाहसंबंधांत मुलीच्या स्वतःच्या अनुमतीची मुळींच जरूर नाहीं.' स्वतः विश्वनाथरावांचेंच जेथें असें राक्षसी मत झालें होतें, तेथें वेणूच्या संमतीकडे लक्ष देतो कोण? अरेरे! आमच्या समाजाचा विवाहसंबंधांत हा केवढा मोठा अन्याय!! ज्यांना आपलें हितानहित कांहीं कळत नाहीं, पति म्हणजे काय हें ज्यांना समजत नाहीं, माहेर व सासर यांचीं ज्यांना कल्पना करितां येत नाहीं, अशा अज्ञान मुलींचा विवाह पुढील कोणत्याहि गोष्टींचा विचार न करितां वाटेल त्याच्याशीं करणें, अथवा समजुतदार मुलींच्या संमतीची पर्वा न करितां वाटेल त्याच्या-बरोबर तिची जन्माची गांठ घालून देऊन सगळ्या समाजास व राष्ट्रास अधोगतीस लावणें, हा केवढा निर्घृणपणा!!!

राष्ट्राची खरी खरी मंगलकारक संपत्ति म्हटली म्हणजे सुमाता ही होय. सुमाता राष्ट्राची खरी आणि पवित्र अशी शक्ति आहे. जहाल व नेमस्त यांना आमच्या राष्ट्रांच्या अधोगतीचीं कारणें कोणतींहि वाटोत, आम्हांस तर आमच्या राष्ट्राच्या अधोगतीचें खरें कारण, सुमातांचा अभाव हेंच वाटत आहे. आमच्या राष्ट्राचा मानभंग व तेजोभंग जो क्षणोक्षणीं होत आहे, त्यांचें जर एखादें खरें कारण असेल, तर तें सुमातांचा अभाव हेंच होय. या अवनतीच्या मुळाशीं विश्वनाथरावां-सारखे समाजकंटक आहेत. ही मुळांशींच असलेली कीड काढून टाकल्यावांचून आमच्या राष्ट्राचें कल्याण होणें शक्य नाहीं, असें

आम्हांस तरी निदान वाटतें. समाजांतील दुराग्रही व गतानुगतिक लोकांनीं विवाहासारख्या परममंगल, पवित्र व महत्वाच्या कार्यांत नाहीं नाहीं त्या निर्घृण रूढींना कवटाळून धरून, साऱ्या राष्ट्राची घाण करून टाकली आहे; असें चांगला विचार करणारास सहज दिसून येणार आहे.

मुलामुलींच्या संमतीकडे दुर्लक्ष, त्यांच्या कुलशीलाकडे दुर्लक्ष, त्यांच्या शारिरिक प्रकृतीकडे दुर्लक्ष, त्यांच्या वयमानाकडे दुर्लक्ष व त्यांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करून, या समाजकंटकांनीं, सारा समाज दुर्दशेच्या तडाख्यांत आणून सोडला आहे. आमचें राष्ट्र परकीय सत्तेमुळें दुर्बळ व दरिद्री होत आहे, अशी कुरकुर करण्यांत ज्यांना मोठी हौस वाटते, त्यांना केवळ विषम विवाहाच्या निर्घृण रूढींमुळें राष्ट्रांतील लोक निःसत्व व तेजोहीन होत आहेत तें दिसूं नये, हें मोठें आश्चर्य होय. आमचें राष्ट्र जर या दुहेरी पेंचांत सांपडलें आहे, तर प्रथम कोणता पेंच सोडविणें सुलभ व अवश्य आहे, याचा विचार करावयाची जबाबदारी आम्हीं आमच्या वाचकांवरच टाकतों.

विषमविवाहाचे दुष्परिणाम पदोपदीं दृष्टीस पडत असतां तिकडे दुर्लक्ष करणें, हें आमच्या मूर्खपणाचें निर्मळ द्योतक होय. सुमातांचा अभाव हेंच आमच्या राष्ट्राच्या दुर्दैवाचें कारण आहे; हें आम्हीं केव्हांहि विसरून चालावयाचें नाहीं. सुमातांच्या प्राप्तीसाठीं प्रत्येक भारतवासियानें प्रयत्न केला पाहिजे. निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासांत व आमच्याहि पूर्व इतिहासांत हेंच तत्व ग्रथित केलेलें आहे. मनानें खंबीर, शरीरानें बळकट, नीतीनें पूर्ण व तेजानें उज्वल, अशा संततीचा लाभ भारतवर्षास सुमतांवांचून व्हावयाचा नाहीं. विषमविवाह नाहींसे झाल्यावांचून सुमतांची प्राप्ति हिंदुस्थानास व्हावयाची नाहीं. या

प्राप्तीसाठीं—या महत् कार्यासाठीं—प्रथम समाज—पुष्पवाटिकेंतील समाजकंटक दूर केले पाहिजेत; त्यावांचून समाजाची सुधारणा व्हावयाची नाहीं.

विवाहसंबंधांत मुलामुलींची अनुमति मिळविण्याचा प्रकार कित्येकांना अनिष्ट वाटत असल्यामुळें, ते त्यांच्या अज्ञान अवस्थेंतच विवाहसंबंध घडवून आणतात; परंतु पुढें विवाहितांना सज्ञानावस्था प्राप्त झाल्यावर, जे अनिष्ट प्रकार आमच्या समाजांत घडून येऊं नयेत, अशी आमच्या सुशिक्षितांची इच्छा असते, ते प्रकार घडून येतात. पति व पत्नी यांच्यांत मतैक्य रहात नाहीं, लहान मोठ्या कुरबुरी नेहमीं सुरू असतात, संसारकृत्यें व्यवस्थित होत नाहींत, उभयतांकडून अनन्वित प्रकार होत असतात, नानाप्रकारचीं संकटें त्यांच्यावर येतात, संतति अशक्त, रोगी व खुजी असल्यामुळें त्यांच्या काळजींत उभयतांहि चूर असतात, त्यांना हा प्रपंच कष्टतर वाटतो, व संसारिक आपत्तीमुळें ते इतके त्रस्त होतात कीं, आत्महत्या करण्यापर्यंत मजल येते. या सर्व अनर्थांचें मूळ विषमविवाह हें होय. या विषमविवाहामुळें आमची इतकी दुर्गति होत चालली आहे, तरी कित्येक दुराग्राही लोक आपला हट्ट सोडण्यास कबूल नाहींत; हें आमच्या देशाचें मोठें दुर्भाग्य होय. असो.

उद्यां सकाळीं दाहा वाजतां माधवरावाबरोबर आपलें लग्न झालें, म्हणजे पुढें आपली काय स्थिति होईल, या दारुण शोकाकुल विचारानें वेणूची अवस्था अगदीं वेड्याप्रमाणें झाली होती. अंतःकरणांतील भयंकर काहुरामुळें तिला अपल्या बाह्य शरीराची शुद्धि राहिली नव्हती. ती दुःखातिरेकानें मोठमोठ्यानें उसासे टाकीत होती; परंतु त्याची तिला माहिती नव्हती. तिच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु गळत होते; पण ते तिला दिसत नव्हते. इतकी ती विवाहविचारांत मग्न झाली होती.

तिनें अन्नपाणी अगदीं सोडून दिलें होतें; पण तिच्यावर खाण्यापिण्याची विशेष सक्ति करीत, म्हणून ती कसे तरी दोन घांस आळेंबळें खात असे. या विवाह चिंतेमुळें वेणु एखाद्या क्षयरोग्याप्रमाणें फिकट व शक्तिहीन झाली होती.

आज सायंकाळच्या वेळीं विश्वनाथरावांचा वाडा व मंडप माणसांनीं अगदीं गजबजून गेला होता. मुलगा व मुलगी यांचा मांडव एकच असल्यामुळें कांहीं मंडळी इकडची व कांहीं मंडळी तिकडची असा भेदाभेद राहिला नव्हता. या वेळीं अक्षदीची मोठी जंगी मिरवणूक निघावयाची असल्यामुळें, प्रत्येक जण भपकेबाज पोषाक करून नटला होता. बायकांनीं अंगावर घालतां येतील तितके दागिनें घातले होते. ताशे, वाजंत्री, ब्यांड वगैरे वाद्यें प्रचंड गर्जना करीत होतीं. दोन मोठाले सुंदर घोडे भूषणांनीं अलंकृत करून सज्ज केले होते कागदाच्या फुलझाडांचा मोठा बाग तयार केला होता. कलावंतिणी अप्सरेप्रमाणें चित्ताकर्षक पोषाख करून व पायांत नूपुरें बांधून आल्या होत्या. मिरवणुकीसाठीं कारबाइडचे हजारों दिवे बरोबर पेटवून घेतले होते. याप्रमाणें एकंदर सर्व तयारी झाल्यावर ही मोठी मिरवणुक वाजतगाजत व शोभेची दारू उडवीत हळू हळू चालूं लागली. हजारों पुरुष, स्त्रिया दोनचारशें नौकर चाकर, गाड्या, घोडे व मिरवणुक पाहण्यासाठीं गोळा झालेले तमासगीर या सर्वांमुळें त्या मिरवणुकीस प्रचंड स्वरूप आलें होतें. सर्व लोक ही अभूतपूर्व मिरवणूक पाहून थक्क होऊन गेले. या एकंदर समारंभासाठीं विश्वनाथरावांना बरेंच कर्ज झालें होतें. यावेळीं त्यांच्या एकंदर कर्जाची बेरीज पन्नास हजार रुपये झाली होती. एवढें

कर्ज केवळ इभ्रत, घराण्याचा लौकीक व स्वतःची भरभराट दाखवि-ण्यासाठीं त्यांनीं केलें होतें; परंतु लोकांना चकित करणें व दिपवून टाकणें, हा जो त्यांचा मुख्य हेतु, तो साधल्यामुळें त्यांना या कर्जाची मुळींच क्षिति वाटत नव्हती.

अवंतीपुर गांव फार मोठें होतें असें नाहीं, पण गांवांतील घरे दूरदूर अंतरावर असल्यामुळें मिरवणुकीस मोठा रंग आला होता. ही मिरवणूक मुद्दाम इंदिराबाईंच्या म्हणजे वेणूच्या दारावरून न्यावयाची ठरलें होतें. त्याप्रमाणें कांहीं वेळानें मिरवणूक वेणूच्या दारापुढें आली. घरांत इंदिराबाई, गोविंदराव, गोविंदरावांची पत्नी व श्रीपाद, एवढीच मंडळी होती. हा एवढा वाद्यध्वनि कां होत आहे; हें श्रीपादशिवाय सर्वांना तेंव्हांच समजलें. श्रीपाद लहान पोर, स्वभाविक उत्साहप्रिय! ती मौज पाहण्यासाठीं साहजिक उत्सुकतेनें बाहेर आला. वेणूचें घर म्हणून, मिरवणुकींतील खटपट्यांनीं त्या घरापुढें जाणूनबुजून पुष्कळशी दारू सोडली. बिचाऱ्या श्रीपादला अनायासें गम्मत पहावयाला मिळाली. वेणूचें घर आल्याबरोबर विश्वनाथराव दोन भिक्षुकांसह मोठ्या ऐटीनें तिच्या घरांत गेले. गोविंदरावांवर विश्वनाथरावांनीं एवढी जरी आग पाखडली होती, तरी त्यांच्या हृदयांतून क्षमता नाहींशी झाली नव्हती. त्यांनीं विश्वनाथराव आंत आल्याबरोबर त्यांचा योग्य आदर सत्कार करून, त्यांना बसवून घेतलें. रीतीप्रमाणें बरोबरच्या उपाध्येबोवांनीं व ग्रामजोशांनीं 'विश्वनाथराव यांचे शालक माधवराव व इंदिराबाईंची मुलगी वेणु, यांच्या विवाहाचा निश्चय उदईक आठ घटकेचा केलेला आहे; तरी आपण सहकुटुंब सहपरिवारें येऊन कार्यसिद्धि करावी.' अशी गर्जना करून, गोविंदरावांच्या हातावर अक्षता दिल्या. अरेरे,

केवढा मानभंग! कोण ही अप्रतिष्ठा!! विचाऱ्याच्या दुःखावर किती विलक्षण डागणी!!! परंतु तो धैर्याचा डोंगर, शांतीचा पुतळा, क्षमतेचा सागर, या हलकट व दुष्ट हिडीस प्रकारामुळें थोडा देखील रागावला नाहीं. उलट शांतपणें त्यांनीं सर्वांना सुपाऱ्या देऊन निरोप दिला. पण या प्रकारानें तो दुष्ट, चांडाळ, पशूपेक्षां पशु विश्वनाथराव, खजील न होतां उलट मोठ्या प्रौढपणाचा आव आणून म्हणाला,

"गोविंदराव, अहो इंदिराबाई, लग्नाला आलेंच पाहिजे. ज्या माधवरावाला तुम्ही आपली वेणु देणार नव्हता, त्याच माधवरावाबरोबर वेणूचा विवाह होणार आहे, तेव्हां त्या प्रसंगीं तुम्हीं आलेंच पाहिजे. मी जेव्हां वेणूची मागणी केली होती, तेव्हां माझा उपहास करून. मला 'नाहीं' म्हणून सांगितलें. म्हणे 'आम्हीं आपली सोन्यासारखी मुलगी, त्या काळ्या शिद्याला देणार नाहीं;' पण आतां त्याच कोळशाच्या पुतळ्याबरोबर त्या सोन्याच्या पुतळीचा विवाह होणार आहे. म्हणून तुम्हांला मुद्दाम निमंत्रण केलें आहे."

याप्रमाणें विश्वनाथराव अद्वातद्वा वाटेल तसें बोललें; परंतु त्याबद्दल त्यांना गोविंदरावांकडून किंवा इंदिराबाईकडून, कोणत्याहि प्रकारचें प्रत्युत्तर मिळालें नाहीं. यामुळें विश्वनाथरावांचा अधिकच संताप झाला; पण बोलत बसण्यास सवड नसल्यामुळें त्यांची स्वारी घराबाहेर पडली, व मिरवणूक वाजत गाजत पुढें निघून गेली.

## प्रकरण आठवें.

### लग्न.

विश्वनाथरावांनीं काढलेली मिरवणूक मिरवत मिरवत मुद्दाम सुशोभित केलेल्या मंडपांत येऊन दाखल झाली. मंडपांत खूप बहारीची आरास केली होती. हंड्या झुंबरें, विजेचे दिवे यांनीं सर्व मंडप झगझगीत प्रकाशमान झाला होता. मंडपांत गाद्या, लोड, तक्के, गालीचे, रुजामे, व्याघ्रासनें यांची प्रशस्त व व्यवस्थित बैठक घातलेली होती. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें सर्वजण आपआपल्या आसनावर स्थित झाल्यावर, कलावंतिणीच्या सुंदर आलापदार गाण्यास व त्याच बरोबर साभिनय मनोहर नृत्यास सुरवात झाली. कारंजांतील निरनिराळ्या रंगांचें पाणीहि उडूं लागलें. जणुं काय तें त्यावेळीं कलावंतीणाच्या नृत्याची स्पर्धाच करीत आहे असें वाटे. या एकंदर विलक्षण चित्ताकर्षक देखाव्यामुळें मंडळी अगदीं चित्रासारखी तटस्थ झाली. कांहीं वेळ नाचरंग झाल्यावर सर्वांना अत्तर गुलाब पानसुपारी देऊन हा समारंभ बरखास्त झाला. जिकडे तिकडे आवर निवर झाल्यावर आप्त, सोयरे, स्नेही वगैरे पाहुणे मंडळी भोजनास बसली. श्रीमंतांच्या येथलें भोजन ! नाना प्रकारचीं पक्वान्नें केलीं होतीं. कधीं काळीं दृष्टीस पडणारीं तीं पक्वान्नें पाहून सर्वांनीं त्यांवर यथेच्छ ताव मारला व सर्वजण सुखानें झोपीं गेले.

सगळ्यांना गाढ झोंपा लागल्या होत्या. रात्र अर्धी अधिक उलटून गेली होती. काळा कुट्ट अंधःकार सर्वत्र पसरल्यामुळें वसुंधरा कृष्णवसन

परिधान केल्याप्रमाणें दिसत होती. गजबजून गेलेल्या सृष्टीस यावेळीं निखालस स्तब्धता आली होती. आकाशांत तारका लुकलुक करीत होत्या. दिवसां दमले भागलेले लोक निद्रा देवीला वश झाले होते. सर्व प्राणी विश्रांति सुखाचा लाभ घेत होते. अहाहा! किती शांत वेळ ही; पण या प्रशांत समयाचा आमच्या वेणूला काय उपयोग! या शांत वेळीं ती बिचारी आपल्या दारुण विपत्तीचा विचार करीत बसली होती. तिची अवस्था फार कठिण झाली होती. तिच्या डोळ्यांतून एकसारखे अश्रु वहात होते. एवढें मोठें जगत्, पण या जगास ती आतां शून्य दृष्टीनें पहात होती. तिची सर्व आशा लयास जाऊन ती हताश झाली होती. तिला ठेविलेल्या तुरुंगांत ती रडत बसली होती. तिच्याजवळ कोणींहि नव्हतें, तिच्याकडे कोणाचेंहि लक्ष नव्हतें. बिचारी आश्रयविहीन सगळा दिवस सगळी रात्र त्या तुरुंगांत आपल्या प्रारब्धगतीचा विचार करीत होती. वेणूचें पूर्वीचें तें भुवनमोहिनी सौंदर्य नाहींसें झालें होतें. तिची अलोट शरीरकांति नाहींशीं झाली होती. तिची पूर्वश्री लोपून गेली होती. ती निस्तेज झाली होती. विश्वनाथरावांच्या त्या तुरुंगांत पडल्यानंतर पंधरा दिवसांच्या आंतच ती रूप, तेज व शक्तिहीन झाली होती. तिच्या पवित्र हृदयांत मोठें काहूर माजलें होतें. आपली आई कोठें असेल, श्रीपाद कसा असेल, कृष्णराव काय करीत असेल, याविषयीं ती क्षणोक्षणीं विचार करी. या सर्वांपेक्षांहि स्वतःच्या लग्नाच्या विचारांनीं तर तिला जीव नकोसा झाला होता. बळजबरीनें छळ करून दुष्टपणानें हे पशु मला त्या राक्षसाच्या गळ्यांत उद्यां बांधणार, याला मी काय करूं? असें ती त्या दयामय ईश्वरास अंतःकरणपूर्वक विचारीत होती. तो भयंकर प्रसंग टळावा म्हणून ती त्या कृपाघनाची अनन्य-

भावानें प्रार्थना करीत होती. हरहर! गरीब बिचाऱ्या निष्पाप वेणूवर कोण हा भयंकर प्रसंग!

विश्वसाक्षी विश्वेश्वराची करुणा भाकीत ती बसली असतां एकाएकीं तिच्या खोलींत विश्वनाथराव आपल्या अर्धांगीसह अवतीर्ण झाले. उभयतांचें दर्शन होतांच वेणु लटलट कांपूं लागली. उभयतां राजाराणीची जोडी कशाला आली आहे, याचा तिला कांहीं तर्क करितां येईना. दोघें खोलींत येऊन तिच्यासमोर बसलीं, तरी वेणूनें आपली भूमिगत दृष्टि यत्किंचित् देखील वळविली नाहीं.

विश्वनाथरावांनीं आपल्याबरोबर एक मोठा थोरला दागिन्यांचा डबा आणला होता. तो वेणूपुढें ठेवून ते आपल्या पत्नीला म्हणजे राधाबाईला म्हणाले,

"हं, हे आणलेले दागिनें वेणूच्या अंगावर घालून कोणते लहान, कोणते मोठे होतात, तें पहा; म्हणजे कांहीं कमजास्त असल्यास ताबडतोब सोनाराकडून दुरस्ती करून घ्यायला बरें पडेल. उद्यां वेळेवर मग हे लहान झाले, हे मोठे झाले, ही कटकट नको"

वेणु चैतन्यशून्य बसली होती, तिचा लय सगळा कृष्णरावाकडे लागला होता. विश्वनाथरावांला असें वाटत होतें, कीं, हे बहुमोल अलंकार पाहून वेणु लागलीच आपल्या म्हणण्यास रुकार देईल; परंतु त्या थोर मनाच्या वेणूनें त्या क्षुद्र दागिन्यांकडे पाहिलें देखील नाहीं. राधाबाईनें त्या दागिन्यांच्या डब्यांतून पायांत घालावयाचा तोड्यचा जोड आपल्या हातांत घेतला व त्याकडे पहात पहात त्या म्हणाल्या,

“ वा! किती सुबक तोड्यांचा जोडा झाला आहे. आमच्या वेळेस असा शिंदेशाई तोड्यांचा जोड सोनारांना घडतांच येत नव्हता. पाहूं वेणु, तुझ्या पायांला कशा दिसतात त्या!”

वेणु कांहीं एक बोलली नाहीं, अथवा तिनें आपला पायहि तोडे घालण्यासाठीं पुढें केला नाहीं. राधाबाई पुन्हा म्हणाल्या,

“ वेणु, हा काय बाई तुझा हट्टवादी स्वभाव! चांगलें सोन्यासारखें स्थळ मिळालें असून रात्रंदिवस अशी रडत बसतेस, याला म्हणावयाचें तरी काय? आमचें बाई भरलेलें घर. येथें नको असें अष्टौप्रहर रडत बसूं. एवढें पाण्यासारखे पैसे खर्च करून, पाटीभर दागिनें तयार केले, तरी तूं आपली कष्टी ती कष्टीच.”

वेणु इतका वेळ स्तब्धपणें राधाबाईचें बोलणें ऐकत होती, पण आतां तिला बोलल्यावाचून राहवेना. पदरानें डोळ्यांतील अश्रु पुसून ती म्हणाली,

“ राधाबाई, तुम्हीं माझा असा काय हा छळ मांडला आहांत. मी या तुमच्या पाटीभर दागिन्याला घेऊन काय करूं? माझें मुख्य भूषण कृष्णराव आहे, तो मला द्या म्हणजे झालें. एका कृष्णरावावांचून मला सर्व पुरुष बंधुभावांप्रमाणें आहेत. माधवरावाला मी आपल्या बंधूप्रमाण समजतें, त्यांच्याशीं त्यांच्या या अनाथ बहिणीचा विवाह तुम्हीं लावणार तरी कसा? मीं काया—वाचा—मनानें कृष्णरावाला वरलें आहे. आतां माझा पुन्हा दुसऱ्याबरोबर कसा विवाह करितां येईल? हे दागिनें तुम्हीं जर बाजारांत ठेवाल, तर तुमच्या माधवरावाला माझ्यापेक्षां सुंदर वाटेल तितक्या बायका मिळतील. या पाटीभर दागिन्यांपेक्षां तुम्हीं जर मला

वाटीभर विष द्याल, तर मजवर अनंत उपकार होतील. असा हा विषमविवाह करण्यापासून फायदा तो काय ?"

वेणुचें बोलणें ऐकून विश्वनाथराव उपहाससहकारानें थोडेसें हंसले व म्हणाले,

"ऐकलेंसना कसें आहे वक्तृत्व तें? नाहींतर तूं! तुला धड बोलतां देखील येत नाहीं. अहो वेणुबाई, तुमच्याबरोबर माधवरावांचा जो विवाह करावयाचा आहे, तो तुमच्या फायद्यासाठीं नाहीं, तर माधवरावाच्या फायद्यासाठीं करावयाचा आहे, समजलेंना?"

वेणु म्हणाली,

"माझ्यापासून माधवरावांना तरी काय फायदा होणार? मी ही अशी अशक्त, दुबळी, नेहमीं रोगानें पीडलेली. माझा प्राण केव्हां जाईल याचा कांहीं नियम आहे का? माझ्यापासून माधवरावांना सुख तें काय होणार? त्यांना त्यांच्या अनुरूप व सशक्त मुलगी पाहून द्या म्हणजे त्यांना खरें सुख मिळेल, त्यांना दोन मुलें बाळें होतील, त्यांचा संसार चांगला थाटला जाईल. मजबरोबर त्यांचा विवाह करून त्यांना कशाला उगीच सुतकाचा संस्कार करवितां?"

वेणुचें तें बोलणें ऐकून राधाबाई चटकन म्हणाल्या,

"बाई, तुला काय झालें आहे मरायला! चांगली टमटमा बोलतेस आणि मरतेस कशानें? आणि मेलीस तर मेलीस! तुझ्या प्रेताबरोबर देखील आम्हीं माधवरावाचें लग्न करूं. तुझे आई बाप मोठ्या दिमाखानें म्हणाले होते कीं, आम्हीं आपली गोरीपान सुस्वरूप मुलगी, त्या काळ्या मांगाला देणार नाहीं. म्हणे 'तो वयानें घोडा आहे, ज्ञानानें शंख आहे, व्यसनानें पूर्ण आहे.' पण आतां त्या तुझ्या आईला म्हणावें,

शेवटीं त्या काळ्या मांगाचीच गांठ पडली. आम्हीं कांहीं लग्न लावायला सोडणार नाहीं, मग उगीच हट्ट धरून फजितवाडा कां करून घेतेस? लोक आम्हांला कांहीं हंसावयाचे नाहींत, हंसतील तुलाच म्हणून म्हणतें, हा असा वेडेपणा न करतां या दागिन्यांत काय कमजास्त करावयाचें आहे, तें सांग. म्हणजे सोनाराकडूकन दुरुस्ती करायला बरें पडेल."

आपल्या मस्तकावर हात आपटून हताश वाणीनें वेणु म्हणाली,

" राधाबाई, नका हो त्या लग्नाचें नी त्या दागिन्यांचें नांव काढूं. मीं तुम्हाला एकदां सांगितलें कीं, मीं आपल्या मनानें कृष्णरावाला वरलें आहे म्हणून. मग वारंवार विवाहाचा विषय काढून कां उगीच माझा छळ करतां? तुम्हीं माझे धर्माचे आई बाप आहां, माझ्यावर एवढी दया करा. माधवरावाला मी आपल्या बंधूप्रमाणें समजतें. त्याच्याबरोबर माझा विवाह लावूं नका. मी तुमच्या पायां पडतें, तुम्हाला पदर पसरतें, माझ्यावर एवढा जुलूम करूं नका. माझे आईबाप तुम्हांला कांहीं बोलले असतील, तर त्याबद्दल मी तुमच्याजवळ क्षमा मागतें. अहो, असें बळेंच लावलेल्या लग्नला कोठें लग्न म्हणतात का? जी गोष्ट शास्त्राला व देवाला कबूल नाहीं, ती गोष्ट तुम्हीं मुद्दाम कां घडवून आणतां?"

पाषाण, पिशाच्च, राक्षस यांना कोठें दया आहे? यांना कोठें माया आहे? यांना कोठें विचारशक्ति आहे? यांना कोठें हृदय आहे? यांना कोठें देवाचा धाक आहे? त्या उभयतां पशूंच्या अंत:करणावर वेणुच्या करुणवाणीनें कांहीं एक परिणाम झाला नाहीं. उलट विश्वनाथराव किंचित् रागावून म्हणाले,

"वेणू, कोणाला तूं त्या देवाचा आणि शास्त्राचा धाक दाखवीत आहेस? तुझ्यासारख्या नास्तिक मुलीपेक्षां मी शास्त्राला व देवाला जास्त मानतों, समजलीस? तुझा विवाह माधवरावाबरोबरच व्हावा, असा देवाचा संकेत असून, तें शास्त्रालाहि मान्य आहे. मी तुझें व माधवरावाचें टिपण चांगल्या जोतिषाकडून जुळवून पाहिलें आहे आणि त्यांनीं जो उद्यांचा मुहूर्त दिला आहे, तो इतका उत्तम आहे कीं, तुम्हांला चांगल्या प्रकारचीं मुलें बाळें होऊन सुखानें नांदाल. आणि नांदावयाला कांहीं हरकत आहे असें नाहीं. कारण मी उद्यांच माधवरावाला वरदक्षणा म्हणून, दाहा हजारांचा ऐवज देणार आहें. शिवाय मला कांहीं जमीनजुमला द्यावयाचा आहे तो निराळाच. एवढ्या फायद्याची गोष्ट असून, तुला हे भिकेचे डोहाळे कां आठवतात? तूं म्हणतेस मी तुमची मुलगी आहें, मी तरी तेंच म्हणतों. मला कन्यादान करावयाला मिळावें म्हणून मीं एवढी खटपट केली आहें."

वेणु स्फुंदत स्फुंदत म्हणाली,

"मुलीची स्वतःची संमति असो वा नसो, टिपण जुळलें म्हणजे तें लग्न खुशाल लावावें, हें कांहीं खरें शास्त्र नव्हे. आपल्या या हिंदुसमाजांतील सारीं लग्नें टिपण जुळवूनच होतात; पण तरुण विधवांची संख्या जास्त जास्तच होत चालली आहे; हाच काय त्या जोतिःशास्त्राचा उजेड! अहो, ज्या गोष्टी परमेश्वराधीन आहेत, त्या माणसांनीं आपल्या ताब्यांत घेऊं म्हटल्यास कशा घेतां येतील? तसेंच तुमच्या त्या विपुल संपत्तीचा मला काय उपयोग बरें? माकडाला माणकाची ज्याप्रमाणें किंमत त्याप्रमाणेंच मला तुमची संपत्ति. ज्या संपत्तींत सुखाचा लेश नाहीं, ती संपत्ति घेऊन मला काय करावयाचें आहे? इतकी संपत्ति तुमच्याजवळ

असून, माझ्यासारखी अशक्त, दुबळी व नादान पोर कशाला उगीच माधवरावाच्या गळ्यांत बांधता? मी तर त्यांना बंधूप्रमाणें समजतें, मी आपलें शरीर प्राणांसह कृष्णरावाला अर्पण केलें आहे, त्याच्यावांचून सर्व पुरुष मला आपल्या भाऊबापाप्रमाणें आहेत."

राधाबाई इतका वेळ आपल्या मुखकमलाच्या दोन्ही पाकळ्या मिटून बसल्या होत्या. त्यांनीं आतां आपल्या जिव्हायंत्रास किल्ली देऊन बोलण्यास सुरवात केली,

"वेणु, तूंच कांहीं दिवसांपूर्वी माझ्या भावाला काळा मांग, कोळसा, शनी, असें म्हणत होतीस आणि आतां म्हणतेस तो माझा भाऊ आहे; पण अशी गोरीपान इंद्राची परी कांहीं बाई, माझ्या भावाची बहिण शोभावयाची नाहीं. अशा मुलीस त्याची बटिक करून ठेविली पाहिजें; पण आम्हीं थोर म्हणून तुला त्याची बायको करीत आहों. त्या काळ्या मांगाचीच तुला आतां सेवा करून राहिलें पाहिजे. त्याच्या सहवासांत तुला आतां दिवस कंठिले पाहिजेत आणि त्याचें उष्टें अन्न खाऊन तं आपला पिंड पोसला पाहिजे. तूं नेहमीं कृष्णराव कृष्णराव म्हणून म्हणत असतेस; परंतु तो कृष्णराव समुद्रांतल्या जलचरांनीं कधींच खाऊन टाकला बरें! तुला शेकडों वेळा सांगितलें कीं, तुझा कृष्णराव मेला, ठार झाला म्हणून; तरी तूं त्याला जिवंत म्हणून समजतेस या तुझ्या वेडेपणाला म्हणावयाचें तरी काय? तो कृष्णराव मेला, त्याचें घर जळालें, आणि त्याचा बाप आतां तुझ्या आईकडे तुकडे खात आहे. वेणु, त्या कृष्णरावाची आशा सोडून दे आणि मुकाट्यानें माधवरावाच्या गळ्याला मिठी मार; नाहीं तर तुझी कांहीं धडगत नाहीं. तुझे हे सुधारकी खेळ आमच्या घरांत मुळींच खपावयाचे नाहींत."

वेणूच्या विपत्तीस पारावार नव्हता. तिच्या दुःखास मर्यादा नव्हती, तिच्या मर्मांतिक वेदना सीमेच्या बाहेर होत्या. ती व्याकुल स्वरानें म्हणाली,

" राधाबाई, कृष्णरावासंबंधानें कां उगीच अभद्र बोलतां ? मला वाटेल तितकें वाईट बोला, मला वाटेल त्या शिव्या द्या, माझा वाटेल तितका छळ करा; पण माझ्या कृष्णरावाला कोठेंहि कुशल नांदूं द्या. कृष्णराव अजून जिवंत आहे. तो सुखानें आहे, असें माझी मनोदेवता मला वारंवार सांगते. त्याचें मरण तुम्हीं कां चिंतितां ? त्यानें तुमचें असें काय वाईट केलें आहे ? ईश्वर कृष्णरावाला सुखी ठेवील असा मला भरंवसा आहे."

इतकें वेणूचें बोलणें झाल्यावर विश्वनाथरावांनीं तिला कृष्णरावाला कसा नाहींसा केला, त्याचें घर कसें जाळलें, गोविंदरावांची हल्लीं काय स्थिति आहे, वगैरे सर्व हकीकत सांगितली; परंतु ती वेणूला खरी वाटेना. ती म्हणाली,

" तुम्हीं कृष्णराव मेला, असें जों जों म्हणत अहां, तों तों कृष्ण-रावाचें आयुष्य वाढत आहे. मी तुमच्या माधवरावाबरोबर विवाह करण्यास मुळींच कबूल नाहीं. माझे आईबाप त्याला काळा मांग म्हणत होते आणि मीहि त्याला काळा मांगच म्हणणार. तुमच्या अंगीं जेवढी क्रूरता असेल, तिची तुम्हीं पराकाष्ठा केली, तरी मी मुळींच भीत नाहीं. माझा प्राण घेतला, तरी मी त्या मांगाबरोबर विवाह करण्यास कबूल नाहीं; सत्तेच्या जोरावर वाटेल तसा जुलूम करावयाल आतां सोपें वाटत असेल; पण ही अशाश्वत सत्ता नाहींशी झाल्यावर फार जड जाईल. तुमचीं ही घोर कृत्यें तुम्हांस केव्हांतरी प्रतिफळ देतीलच देतील. वेळ आली तेव्हां रावणासारख्यांची दुर्दशा उडण्यास

अवकाश लागला नाहीं मग तुम्हां सारख्यांचा पाड तो काय? तुमच्या सत्तेचा तुम्हांला कितीहि अभिमान असला, तरी तो दोन दिवसांचा आहे, हें मला पक्कें माहीत आहे. माझा भरंवसा दयामय ईश्वरावर आहे. तो माझा वाली आहे. तो मला सुखाचे दिवस दाखविल्यावांचून कधींहि राहणार नाहीं."

विश्वनाथराव जरा क्रुद्ध होऊन आपल्या अर्धांगीला म्हणाले,

" अग ये, ही भिकारीण कांहीं ऐकावयाची नाहीं! उद्यां हिला फराफरा ओढीत नेऊन, लगीन लावलें म्हणजे झालें. चल ऊठ, उचल तो दागिन्यांचा डबा. ईश्वर हिचा कसा काय वाली आहे, तें आतां पाहूं उद्यां."

विश्वनाथराव याप्रमाणें बोलून राधाबाईसह तेथून चालते झाले.

रात्र संपत चालली, क्रमाक्रमानें एक वाजला, दोन वाजले, तीन वाजले. पहांटेचा गार वारा सुटला. कुणब्यांच्या बायका घरधनी पहांटेस शेतावर जावयाचा म्हणून दळावयाला उठल्या. क्रमानें तीनच्या मागून एक घंट्यानें चार वाजले. चार वाजल्यावर विश्वनाथरावांकडील आचारी, पाणके, शागीर्द वगैरे खटपटी मंडळी डोळे चोळीत उठली. ज्यांनीं ज्यांनीं रात्रीं भोजनावर येथेछ हात मारला होता, ते अजीर्णामुळें पहांटेस जागे झाले. खेडेगांवांत शौचकूपाची सोय नसावयाची; परंतु विश्वनथरावांनीं मुद्दाम वाड्यापासून कांहीं अंतरावर ही व्यवस्था केली होती. त्या बाजूला पहांटे उठलेली मंडळी भरा भरा शौचविधीसाठीं जाऊं लागली; परंतु पांच पन्नास पावलें गेले नाहींत, तोंच त्यांना काळ्या विजारी व काळीं डगलीं घातलेल्या लोकांनीं मोठ्यानें दरडाविलें—

"एओ, किदर जाते हो? चलो पीछे जाव."

ही दरडावणी ऐकून जे भोळसर व भित्रे होते त्यांचीतर धोत्रेंच खराब झालीं. जे कांहीं धैर्यवान होते, ते अम्मळ पुढें येऊन म्हणाले,

"कांहो शिपाईदादा, आम्हांला जाऊं कां देत नाहीं?"

या प्रश्नानास शिपायांनीं उत्तर दिलें नाहीं. विश्वनाथरावांच्या वाड्याभोंवतीं यावेळीं पोलिसच्या शिपायांनीं गराडा घातला होता. दोनशें पोलिसचे शिपाई, आठ दाहा स्वार, जमादार, फौजदार व इन्स्पेक्टर एवढें सैन्य किल्याला वेढा घालण्याच्या कामीं गुंतलें होतें. हे शिपाई बाहेरचा इसम आंत येऊं देत नव्हते व आंतील बाहेर जाऊं देत नव्हते. शौचविधीस जाणाऱ्या लोकांना वाटलें, जहागीरदार साहेबांच्या येथलें लग्न फार मोठें व्हावयाचें, म्हणून एवढे शिपाई बंदोबस्तासाठीं आले असावेत. अशी समजूत झालेल्यांपैकीं कित्येक पुन्हा म्हणाले,

"अहो, आम्हीं जहागीरदार साहेबांच्या घरचेच आहोंत. आम्हांला जाऊं द्यायला कांहीं हरकत नाहीं."

शिपायांच्या जमादार वटवट करणाऱ्या लोकांच्या पाठीवर चाबूक मारण्याचा आव आणून म्हणाला,

"जाव, पीछे जाव. सब पीछे जाव. जहागीरदार साहेबके घरमें झाडा करो. हम किसीको जाने आने नहीं देगा. जाव एकदम सब पीछे जाव."

बिचारी आलेली मंडळी तशीच मागें परतली आणि ज्याला जशी सोय सांपडली, तसे ते आपआपले शौचविधी उरकूं लागले. शिव शिव! कोण ती फजिती!! अधाशासारखें रात्रीं खाल्लेलें आणि बाहेर जायला

तर रस्ता नाहीं, यामुळें सगळ्या वाड्यांत गडबड उडाली. लहान मोठीं मुलें, बायका, पुरुष या सर्वांची मोठी त्रेधा उडाली. तेव्हां विश्वनाथराव उठून, स्वतः चौकशी करूं लागले. पोलीसचे शिपाई आले आहेत, हें ऐकून त्यांचें धाबें दणाणून गेलें. यावेळीं काय करावें हें त्यांना सुचेना. कसें तरी धैर्य धरून, ते, माधवराव व धोंडीराज यांस बरोबर घेऊन इन्स्पेक्टर साहेबांच्या भेटीस आले. नमस्कार करून ते त्यांना म्हणाले.

"माझ्या घरीं आज लग्न आहे, शुभ कार्य आहे. आपण आलांत हें फार चांगलें झालें. कलेक्टर साहेबहि यावयाचे आहेत. वाड्यांत चला, मी उतरण्याची व्यवस्था करतों. सर्वांची भोजनाची व्यवस्था लावतों. टाळी वाजेपर्यंत राहिल्यास सर्वांना आनंदानें मार्गस्थ करीन."

विश्वनाथरावांनीं शेवटचें वाक्य मोठ्या खुबीनें उच्चारलें होतें; पण इन्स्पेक्टर लांच खाणारा नसल्यामुळें तो तिकडे दुर्लक्ष करून म्हणाला,

"आपलेंच नांव विश्वनाथराव वाटतें? आपल्या घरीं कोणाचें लग्न आहे?" विश्वनाथराव म्हणाले.

"होय. हे आमचे शालक माधवराव यांचें."

"आणि धोंडीराज म्हणून आपला मुलगा आहे, तो कोठें?"

"आपल्या समोरच आहे, साहेब."

तिघांची ओळख होतांच इन्स्पेक्टर जमादारास म्हणाला,

"जमादार, हे तिघेहि आरोपी येथेंच आहेत. त्यांना कैद करून बोटीवर घेऊन चला."

हुकमाप्रमाणें जमादारानें तिघांनाहि कैद करून, रस्ता मोकळा केला. पोलीसचें काम संपतांच त्यांनीं मोठ्यानें बिगुल फुंकला व ते


निघून गेले. विश्वनाथरावांच्या वाड्यांतून लोक भराभरा बाहेर जाऊं लागले. दोन पैशाची आशा धरून आलेले भट भिक्षुक हिरमुसलीं तोंडें करून निघून गेले. आचारी, पाणके, वाजंत्री वगैरे जो तो आपआपला मार्ग शोधूं लागला. राधाबाई मोठ्यानें आक्रोश करून पोलीसांना शिव्या देऊं लागली. हजारों माणसांनीं गजबजलेला तो वाडा व तो मांडव थोड्या वेळांत सर्व निर्मय झाला.

सूर्योदय झाला. सूर्याचीं कोंवळीं किरणें सर्वत्र पसरून जिकडे तिकडे आल्हादकारक प्रकाश पडला. वेणु आपल्या खोलींत कसें करूं काय करूं या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत बसली होती. बाहेर पोलीसचा बिगुल वाजल्याबरोबर, तिच्या छातींत एकदम धडकी भरली. लग्नासाठीं आणलेला ब्यांड वाजूं लागला, असें तिला वाटलें. स्वत:ची आतां धिंड निघेल, या भीतीनें तिच्या सर्वांगास कंप सुटला. त्या तरुणीची स्थिति या वेळीं फार कष्टकारक झाली होती. तिचे कृष्णवर्ण कुरळ केश पाठीवर अव्यवस्थित रुळत होते. रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते. शरीर निस्तेज व वस्त्र मलीन झालें होतें. दु:खाचा एक मोठा उसासा टाकून ती म्हणाली,

"हे करुणानिधे दयाघना, या कष्टमय जीविताचा आतां काय उपयोग? ज्या शरीराला पवित्र सुखाची प्राप्ति नाहीं, तें शरीर आतां ठेवूं तरी कशाला? शेवटीं सर्व आशेची निराशा झाली. आज सुटका होईल, उद्यां सुटका होईल, असें म्हणतां म्हणतां लग्न घटकेची वेळ आली! बाहेर वाजंत्री वाजूं लागले!! आतां कसली माझी धडगत!!! देवा, हाच कारे तुझ्या घरीं न्याय? या अनाथ गायीवर होणारा हा जुलूम तुला पाहवतो तरी कसा! कृष्णराव, तूं खरोखरच मृत झालास कारे?

खरोखर असें कांहीं तरी अशुभ झालें असावें. नाहीं तर, तूं माझी सुटका केल्यावांचून कधींहि राहिला नसतास. किंवा या दुष्टांनीं तुला माझ्याप्रमाणेंच एखाद्या तुरुंगांत टाकलें नसेल कशावरून? ईश्वरा, माझ्या कृष्णरावाला सुखी ठेव. कृष्णराव, जी ताटातूट झाली, ती अखेरपर्यंत झाली. तुझ्या पवित्र चरणांचें दर्शन माझ्या नशीबीं नाहीं, हेंच खास. कृष्णराव, या लोकीं नाहीं तर नाहीं, पण परलोकीं तरी या वेणूचा स्वीकार कर. तुझी सर्वांगसुंदर मूर्ति अंतःकरणांत ठेवून, तुझ्या चरणीं लीन होऊन, मी या कष्टमय जगाचा त्याग करतें."

असें म्हणून वेणूनें त्या खोलींत असलेल्या दगडाच्या जोत्यावर जोरानें मस्तकाघात केला. त्या आघातानें वेणु मूर्छित होऊन, जमीनीवर धाडकन् प्रेतवत् पडली. तोंच त्या खोलींत कृष्णराव आला; पण वेणूस प्रेत-वत् पडलेली पाहून तो मोठ्यानें 'हाय हाय' म्हणून ओरडला व हृदयावर झालेल्या त्या विलक्षण वज्रपातानें तोहि बेशुद्ध होऊन भूमीवर धाडकन् पडला!!



## प्रकरण नववें.

# यमू.

ही वेळ मनोहर अशी सायंकाळची होती. सूर्य अस्ताचलास चालला होता. वसुंधरेस मोठी रमणीयता आली होती. पक्षी झाडांवर बसून मधुर स्वरानें गात होते. प्राच्च दिशेकडील आकाशास विस्तवासारखा लाल रंग आला होता. सूर्य अगदीं क्षितिज्याच्या जवळ आल्यामुळें तो आतां समुद्रांत बुडी मारणार, असें वाटत होतें. या रम्य वेळीं विश्वनाथरावाच्या वाड्याच्या गच्चीवर दोन तरुण स्त्रिया समुद्राकडे टक लावून पहात बसल्या होत्या. यांतील एक स्त्री आमच्या वाचकांची परिचित यमुना होय. तिच्याजवळ बसलेली दुसरी स्त्री गंगा या नांवाची तिची मैत्रिण होती. यमुनेचा मुखारविंद चिंताक्रांत दिसत होता. तिचें शरीर श्रीभ्रष्ट झालें होतें. तिचे डोळे जलपूर्ण होते. केश पाठीवर अव्यवस्थित रुळत होते. ती सौंदर्यहीन दिसत होती. ती निस्तेज झाली होती, निराशासहकारानें ती या जगास आतां शून्य दृष्टीनें पहात होती. या सर्व गोष्टीचें कारण तिचा दुष्ट पति धोंडीराज होय.

वेणूला घरांत आणून ठेवल्यापासून, यमुना आपल्या पतीला, सासूला व सासऱ्याला नीट समजावून सांगे कीं, 'त्या साध्वीची विनाकारण छळणुक करूं नका. तिला आपल्या घरीं पोहोंचतें करा. नाहीं तर त्या साध्वीच्या शिव्याश्रापाला उगीच बळी पडावें लागेल.' याप्रमाणें यमुना सर्वांना पदोपदीं सांगे; पण तिच्या सांगण्याकडे लक्ष देतो कोण?

सत्तेच्या भरंवशानें, पैशाच्या अभिमानानें व इभ्रतीच्या व्यसनानें ज्यांच्या डोळ्यांवर धूर आला होता, त्यांना सुबुद्धि होणार कोठून? उलट त्यामुळें यमुनेचा मात्र अधिक छळ होई. आतां तर यमुनेचा उत्साह पार नाहींसा झाला होता. तिला संसारसुखाची आशा मुळींच उरली नव्हती. आपल्या कपाळाचें कुंकू कसें टिकेल या विवंचनेनें ती वेडी झाली होती. तिचें सर्व लक्ष धोंडीराजाकडे लागलें होतें.

जोंपर्यंत विश्वनाथरावांचा चालता काळ होता, तोंपर्यंत सर्वजण त्यांना जहागीरदारसाहेब जहागीरदारसाहेब म्हणून, त्यांची थुंकी झेलण्यास तयार असत; पण काळ फिरला तेव्हां तेच लोक 'मोंगलाई फार दिवस टिकत नसते' असें म्हणून विश्वनाथरावांस हिणवूं लागले. विश्वनाथरावांच्या प्रत्येक कृतीस गांवांतील भट भिक्षुक 'योग्य योग्य' म्हणून माना डोलावित असत; तेच आतां 'पापाचा घडा कधींतरी फुटणारच' असें म्हणूं लागले. हल्लीं गांवांत याच विषयाची चर्चा चालू होती. दोघे चौघे भेटले म्हणजे जहागीरदारसाहेबांच्या गोष्टी सुरू होत. पोलिसांनीं प्रथम तिघांनाहि पकडलें होतें; परंतु विश्वनाथरावांनीं एकदम पश्चात्ताप दर्शविल्यावरून, कृष्णरावानें त्यांच्यावरची फिर्याद काढून घेतली होती. पोलिसांनीं त्यांना साक्षीदार म्हणून कोर्टापुढें उभे केले होते. सर्व घडलेली खरी हकीकत त्यांनीं सांगितल्यामुळें; त्यांची सुटका होऊन धोंडीराज व माधवराव या उभयतांना सात वर्षांची शिक्षा झाली होती. अपीलांत कांहीं होण्यासारखें नव्हतें; परंतु राधाबाईच्या हट्टामुळें अपील केलें होतें. अपीलाचा निकाल होण्यास बराच अवकाश असल्यामुळें, जामिनावर सोडविण्याचीहि खटपट केली होती. मोठ्या कष्टानें न्यायाधिशांनीं, धोंडीराज यास

जामिनावर सोडलें होतें. यावेळीं विश्वनाथरावांचा पैसा पाण्यासारखा वहात होता. अवघ्या सात आठ दिवसांत वकील ब्यारिस्टरांनीं आठ दाहा हजार रुपये खाऊन टाकले. राधाबाई आपल्या वैभवाच्या डौलांत होत्या, तेव्हां त्यांना ईश्वराची मुळींच ओळख राहिली नव्हती; पण आतां त्यांनीं देवांना भराभर नवस सुरू केले, देवांना थोडीशी लांच दिली, म्हणजे वाईट कार्येंदेखील ते तडीस नेतात; अशी बिचारीची भावना असावी, असें वाटतें. परंतु धोंडीराजाच्या अक्षम्य अपराधा-साठीं, ईश्वराजवळ करुणा तरी कोणत्या तोंडानें भाकावयाची, हें यमु-नेस मात्र कळेना. जसें कर्म, तसें त्याचें फल, हा भगवंताचा नियम तिला माहित होता; तथापि ती अंतःकरणपूर्वक ईश्वराची करुणा भाकीत असे. आज आपला पति जामिनावर सुटून येणार, म्हणून ती गच्चीवर बसून त्याची वाट पहात होती. धोंडीराज यमुनेबरोबर राक्षसाप्रमाणें वागत होता; पण ती साध्वी त्याला आपलें परमप्रिय दैवत समजत असें. पतीपासून यमुनेस काडीइतकें सुख नव्हतें; तथापि ती पतीच्या सुखा-विषयीं अहर्निश काळजी वहात असे. केवढी विलक्षण ही पतिपरा-यणता! राक्षसापेक्षांहि निर्दय पतीविषयीं अलोट प्रेम, पशूपेक्षांहि दुष्ट पतीची निरंतर मंगल कामना, आपले अपरिहार्य क्लेश एका बाजूला ठेवून पतिसेवेंत सदैव तत्परता, पति हेंच दैवत, पति हेंच सर्वस्व, असें समजणारी स्त्री फक्त एक यमुनाच होय. यमुना आपल्या पतीचें काय होणार; या चिंतेनें आज व्याकुळ झाली होती. पुष्कळ वेळ झाला तरी समुद्रावर एक मचवा देखील दिसेना, म्हणून तिच्या डोळ्यांतून अश्रु पडूं लागले. यमुनेस रडतांना पाहून गंगू म्हणाली,

"बाई यमू, तूं हे असे शरीराला कष्ट देतेस, यापासून काय फायदा बरें? आज सात दिवसांत तूं स्नान केलें नाहींस, अन्नपाण्याला शिवलींदेखील नाहींस. अशानें कसें होणार बरें? चल, थोडेंसें कांहीं खाऊन घे."

यमुना कांहीं एक न बोलतां गंगूच्या खांद्यावर मस्तक टेंकून अधिक रडूं लागली. गंगू पुन्हा म्हणाली,

"यमू, तूं काय रडून रडून देहपात करणार होय?"

यमुना रोदनविकलित स्वरानें म्हणाली,

"गंगूताई, तेवढें सौभाग्य या अभागिणीचें कोठें आहे! मी तर मरायला तयार आहें, पण मेला तो मृत्यु माझ्यापासून लांब लांब पळत आहे."

यमुनेचें तें बोलणें ऐकून गंगूला फारच वाईट वाटलें. ती म्हणाली,

"यमू, तुझी स्थिति कष्टप्रद तर खरीच, पण त्याला आतां करायचें कसें? सगळ्या गोष्टी विसरून गेल्यावांचून तुला आतां सुखाची आशा नाहीं."

यमुना म्हणाली,

"गंगू, मी माझ्या सुखासाठीं कोठें रडतें आहें! मला आहेत याहून अधिक यातना झाल्या, तरी त्या मी सोशीन; पण माझ्या पतीला सुख झालें म्हणजे झालें. पण ती आशा आतां कोठें राहिली आहे? त्या तुरुंगांत धड खायला प्यायला देखील मिळत नसेल. माझ्या मृत्यूनें जर तिकडची सुटका होईल, तर मी मरायला देखील तयार आहें."

"यमू, तूं अगदीं वेडी आहेस. तुझ्या मृत्यूनें धोंडीराजाची सुटका थोडीच होणार आहे? तसें असतें तर या घरांत तूं हा वेळ पर्यंत जिवंत राहिली नसतीस."

"तर मग स्त्रीचा उपयोग तरी काय? पतीला जर आपल्या स्त्रीचा कांहीं उपयोग नाहीं, तर त्या स्त्रीनें जिवंत राहून तरी काय फायदा? गंगूताई, मी जर पतीच्या कांहींच उपयोगी पडलें नाहीं, मीं जर पतीवर कांहींच उपकार केला नाहीं, तर मी लोकांच्या निंदेलाच पात्र होईन. आतांच सासूबाई असें म्हणतात कीं, नवरा तिकडे तुरुंगांत कष्ट सोसीत आहे आणि ही बया घरीं सुखानें राज्य करीत आहे."

यमुनेचें तें बोलणें ऐकून गंगूचे डोळे पाण्यानें भरून आले. ती म्हणाली,

"बाई यमू, झालेल्या गोष्टीला तूं तरी काय करणार? मोठाले भयंकर अपराध केलेले, त्याचें प्रायश्चित्त मिळाल्यावांचून कसें राहील बरें? नीच कृत्यें वाटेल तितकीं केलीं, यांत तुझा काय दोष?"

"पण, लोक असें म्हणतील कीं, एवढी शहाणी मुलगी घरांत असून, तिनें कांहीं आपल्या नवऱ्याला ताळ्यावर आणलें नाहीं. जनापवाद आतां माझ्याविषयीं नाहीं नाहीं ते पसरतील, ते मीं कसे ऐकूं? एक वेळ मी माझी निंदा सहन करीन; पण माझ्या पतीची निंदा कशी सहन करूं?"

"यमू, पतीची निंदा होणार त्यांत तुझा काय अपराध! आपली माणसें धड नाहींत, त्याबद्दल लोकांना दोष देऊन काय उपयोग?"

"बाई गंगूताई, हें तोंडाला लागलेलें काळें असें आतां जन्मभर कायम राहणार! हें धुवून काढायला साऱ्या दुनयेंतलें देखील पाणी पुरावयाचें नाहीं."

"यमू, तूं वेडी तर नाहींस. नांवें ठेवायला लोकांना का खूळ लागलें आहे? लोक तुझ्या पतीची जरी निंदा करितात, तरी त्यांना त्याबरोबर तुझी स्तुतीच करावी लागते."

"माझ्या स्तुतीची मला कोठें जरूर आहे! स्त्रियांना स्वतःच्या स्तुतीनें आनंद होत नाहीं. पतीची स्तुति ऐकून, त्यांना आनंद होतो. पतीचे गुणानुवाद ऐकून स्त्रियांना समाधान वाटतें. पतीचा लौकीक तोच स्त्रियांचा लौकीक. तें सौभाग्य मला कोठें आहे! मला माझ्या पतीचा अभिमान बाळगायला कोठें जागा आहे! अशा अपमानकारक स्थितींत जगून उपयोग तरी काय? लोक मला ही अमक्याची बायको असेंच म्हणणार ना?"

"ईश्वरानें तुझ्या पतीला दुर्बुद्धि दिली, त्याला तूं तरी काय करणार?"

"उगीच त्या ईश्वरावर कशाला दोष देतां. लहानपणीं जसें शिक्षण द्यावें, तशीं मुलें होतात. जसा मनावर संस्कार होतो, तशी वागण्याची प्रवृत्ति होते. हा सगळा अशिक्षितपणाचा परिणाम. असें असून, सासूबाई म्हणतात कीं, ही घरांत आल्यापासून सगळ्या घराचा नाश झाला. गंगूबाई, खरेंच कां मी अशी वाईट पायगुणाची आहें?"

"यमू, तुला तुझ्या सासूचा स्वभाव माहित असून, तिच्या बोलण्याकडे तूं कशाला लक्ष देतेस?"

"माझी सासू कशीहि असो, ती मला पूज्यच आहे. मी तिकडे वारंवार सांगें कीं, नका हो नका अशीं भयंकर कृत्यें करूं; पण वैभव व सत्ता यांच्या धुंदींत मला मूर्ख ठरवून, नाहीं

नाहीं त्या गोष्टी केल्या आणि आतां त्याचा हा असा भयंकर परिणाम झाला. माझें ऐकलें नाहीं तर नाहीं; पण स्वतःच्या बुद्धीनें देखील वागावयाचें झालें नाहीं. माधवराव सांगतील त्याप्रमाणें वागावयाचें."

"खरेंच, एवढा अनर्थ त्या मामाच्या नादीं लागून करून घेतला."

"गंगूबाई, त्या माधवरावांनीं घरांत नुसतें बंड माजविलें होतें. सासूबाईंना तो वाटेल तें सांगे आणि सासूबाईहि त्याचें ऐकत. मामंजी, सासुबाई सांगतील तसें ऐकत. यामुळें सगळा नाश झाला. त्यांचा त्यांच्याकडून नाश झाला, तरी सगळें निमित्त माझ्यावर आहे तें आहेच."

यमूच्या तोंडांतून एवढे शब्द बाहेर पडले नाहींत, तोंच राधाबाईची स्वारी गच्चीवर आली. गांवांत सगळे लोक छीः थूः करीत होते, तरी त्याची तिला मुळींच शरम नव्हती. आपली सून आपली निंदा करीत आहे, हें पाहून तिच्या तळव्याची आग मस्तकास गेली. यमुना बसली होती तेथें दाणदाण पाय आपटीत येऊन, तिनें एका हातानें यमूचा सपाटून कान पिरगळला, आणि दुसऱ्या हातानें जोरानें पाठीवर दोन ठोसे देऊन ती म्हणाली,

"अवदसे, कपाळकरंटे, एवढा सत्यानास करून, लोकांवर अभिश्राप द्यायला तयार आहेस ती आहेसच. इतके दिवस घरांतल्या घरांत बोलत होतीस; पण आतां खुशाल लोकांजवळ आमची निंदा करूं लागलीस. अलीकडच्या पोरी किती उलट्या काळजाच्या असतात बाई! नवरा तिकडे तुरुंगांत गेला आहे; पण त्याची लाज हिला थोडी-तरी आहे का! खुशाल सुखानें बोलत बसली आहे; झाल्या ह्या गोष्टी

सगळ्या माझ्याच सांगण्यानें झाल्या ना? निलाजरे, मी वाईट होतें तर होतें, पण तुझा चांगलेपणा तर कांहीं उपयोगीं पडावयाचा होता ना? मी तेव्हांच म्हणत होतें कीं, ही भिकाऱ्याची पोरगी आहे, ही कांहीं नशीबवान नाहीं. बाजारांतून दमडीची केरसुणी घेतात, तिचा देखील शकून पहात असतात; पण ही पांढऱ्या पायाची आमच्या घरांत शिरल्यापासून, घराला उतरती कळा लागून शेवटीं अगदीं कळस झाला."

राधाबाईच्या दोन ठोशानें यमूचा प्राण अगदीं कासावीस झाला; पण काय करणार बिचारी! मुकाट्यानें डोळ्यांका पदर लावून अश्रु ढाळीत बसली. गंगूस तिची फार करुणा आली; परंतु ती तरी करणार काय? तरी ती भीत भीत म्हणाली,

"राधाबाई, त्या गाईला कां विनाकारण छळतां? आज सात दिवसांत तिनें अन्नाचें एक शीत चाखलें नाहीं, कीं पाण्याचा एक घोंट घेतला नाहीं. झालें इतकें पुरें झालें. आणखी या साध्वीची हत्या तरी माथ्यावर घेऊं नका! त्या लक्ष्मीला जर गुण्या गोविंदानें वागविलें असतें, तर कशाला हा असा प्रसंग आला असता? माधवरावाच्या नादीं लागून तुम्हीं आपल्या सगळ्या घरादाराचा नाश करून टाकलात. आतां त्या यमूला छळून उरलेला लौकिक तरी गमावूं नका."

तिसरें मनुष्य आपल्या घरीं येऊन आपल्या तोंडांत साखर घालीत आहे, हे राधाबाईस सहन झालें नाहीं. ती संतापानें लाल होऊन म्हणाली,

"कां, गंगाबाई, तुम्हांला आपल्या घरीं कांहीं उद्योग नाहीं वाटतें? आपल्या घरचें खाऊन लोकांच्या टिवल्याबावल्या करण्याची कित्येक बायकांना खोडच असते. आपण कांहीं माझ्या घरचे उद्योग करीत

जाऊं नका हो! ती माझी सून आहे, आणि मी तिची सासू आहें. मी तिचें वाटेल तें करीन! मला वाटलें तर मी तिला मारून देखील टाकीन!! त्यांत तुम्हांला बोलण्याचें कांहीं कारण नाहीं बरें! हिला छळायला मला कांहीं वेड लागलें नाहीं. ही तशीच पायगुणाची आहे. हिचे एकेक गुण सांगितले, तर रामायणहि तुम्हाला लहान वाटेल. बाई, सोन्यासारखा नवरा असून एक दिवस धड बोलली नाहीं कीं, चालली नाहीं. आतां जेव्हां डोळे उघडले, तेव्हां बसली आहे रडत. हिला रडतांना पाहून तुम्हाला जर दया येत असेल, तर ती अगदीं फुकट आहे, बरें! करावयाचें एक आणि दाखवावयाचें एक, असा हिचा स्वभाव आहे. ही आमच्या घरांत शिरल्यापासून आम्हाला एक-सारखी उतरती कळा लागली आहे, अशी ही सून मेली, तर मी एक सत्यनारायण करीन. माझ्या मुलाला दुसऱ्या मुली मिळणार नाहींत, असें कांहीं नाहीं!"

गंगाबाईस बोलण्याचें कांहीं कारण नव्हतें, तथापि यमुनेसाठीं तिचें अंतःकरण तिळ तिळ तुटत असल्यामुळें, तिला बोलल्यावांचून राहवेना. राधाबाईचा गडगडाट संपल्यावर ती म्हणाली,

"राधाबाई, मला तर वाटतें, या घराचा तुम्हीं सारा विध्वंस केलात. तुमचे शत्रूदेखील यमुनेची स्तुति करतात. साऱ्या गांवातले लोक यमुनेस तुमच्या घरची लक्ष्मी समजतात. तुमच्या मुलानें सुशिक्षीण संपादन केलें नाहीं, हा वाटतें यमुनेचाच दोष? घरांत लक्ष्मीसारखी सुशील, सुरेख, सुशिक्षित नांदती बायको असून, तुमच्या मुलाला धड जिला नाक डोळेहि नाहींत, अशी ती बाजारबसवी रंगू आवडली, हा

वाटतें यमुनेचाच दोष? घरीं सोन्यासारखें अन्न टाकून, अष्टौप्रहर मद्य व मांस खाऊन, रस्त्यानें झिंगत फिरावयाचें, हा वाटतें यमुनेचाच अपराध? लोकांची पोर वेणु, तिच्यावर तुमचा काडीइतका देखील हक्क नाहीं. असें असून तिचा वाटेल तसा छळ केला, ही यमुनेचीच चूक? माधवरावाबरोबर तिचें तिच्या अपखुषीनें लग्न लावावयाचें यमुनेनेंच ठरविलें असेल? बिचाऱ्या गोविंदरावांनीं दोन हिताच्या गोष्टी सांगितल्या, तर त्यांच्या घराला आग लावून दिली. हा यमुनेचाच दोष असेल? जो तुम्हाला कधीं ब्र देखील बोलला नाहीं, त्या कृष्णरावाला समुद्रांत लोटून दिले. यांत यमुनेची काय चूक झाली बरें? तुम्हांला वाटलें आमचेंच राज्य आहे; पण ईश्वराच्या घरीं कांहीं न्याय आहे. चांगल्याला चांगलें, आणि वाईटाला वाईट लोक म्हणणारच. यमुनेसारखी बालबोध वळणाची, सुशील, सुशिक्षित स्त्री तीच एक होय. नवऱ्याचा इतका जांच, तरी त्याच्या चरणीं सदां लीन. कसाबाप्रमाणें सासुसासरे, पण त्यांच्या आज्ञेंत सदा तत्पर. तुम्हाला जीं माणसें गोड, तीं तिला देवाप्रमाणें पूज्य. यमुना मनुष्य नसून, खरोखर देवता आहे. तिच्या पायांचें तीर्थ आमच्या आर्य महिलांनीं रोज घेतलें पाहिजे. देवलोकींची लक्ष्मी तुम्हाला लाधली असून, तिची तुम्ही माती माती करून टाकिली. 'तुम्हाला बोलण्याचें कारण नाहीं.' असें तुम्हीं मघां म्हणालांत, पण मी कां बरें बोलूं नये? मी का स्त्री नाहीं? मी कां हिंदू नाहीं? मला का संसारांतल्या अडचणी माहित नाहींत? सूनपणाचा अनुभव मला कां मिळाला नाहीं? सासूत्व कसें असतें तें कां मला माहित नाहीं? मला कां दयामाया नाहीं? यमुनेसारख्या निष्कलंक, निष्पाप, पवित्र स्त्रीविषयीं मला अभिमान कां असूं नये बरें? हिंदुसमा-

जांत सासू, असा शब्द उच्चारला कीं, अंगावर कांटा उभा राहतो, याची मला कांहींच चीड असूं नये? यमुनेसारख्या साध्वी स्त्रीसाठीं जिला थोडी फार दयामाया आहे, अशी स्त्री आपणाशीं भांडणारच भांडणार. अशा अभागिणीचा कैवार घेणें, हें प्रत्येक समजुतदार स्त्रीचें कर्तव्य होय. राधाबाई, तुम्हाला जर राग आला असेल, तर खुशाल मला दहा शिव्या द्या; पण मी आपलें कर्तव्य करायला कधीं चुकावयाची नाहीं आतां तुम्हीं तिला पशुसारखी निर्दयपणें मारलीत हें कांहीं चांगलें केलें नाहीं. या गोष्टीचा पश्चात्ताप करण्याची पाळी ईश्वर तुमच्यावर लवकरच आणील. बाई यमू, येतें मी आतां. राधाबाई, तिच्यासाठीं मी आपल्या पायांपडून सांगतें कीं, त्या गाईचा छळ करूं नका."

इतकें बोलून गंगाबाई लागलीच निघून गेली. ती जात असतां राधाबाई तोंड वेडेंवांकडें करून म्हणाली,

"फिंदरे, हें तुझें तोंड आहे कीं, तोफखाना! अग बाई बाई, काय पण तोंडाचा पट्टा सोडला होता!"

प्रकरण दहावें.

## माता.

मातेची थोरवी वर्णन करण्यास मानवी जिव्हा अगदींच असमर्थ होय. सुमातांची योग्यता साद्योपांत रेखाटण्यास ईश्वरीप्रसादाचीच लेखणी पाहिजे. मातेचे गुणानुवाद गाण्यास वाग्देवीला देखील धैर्य होणार नाहीं; मग आमच्या सारख्या अज्ञ लेखकांनीं तो प्रयत्न करून, वाचकांच्या उपहासास पात्र होणें टाळलेलेंच बरें. संतश्रेष्ठ तुकारामानें, अनंतकोटी विश्वपालकास 'विठाबाई माउली' या थोर उपमेनें आळवून पान्हा फोडला. यावरून माउली या शब्दांत केवढा चमत्कार सांठविला आहे, त्याची सहज कल्पना कारितां येईल. राष्ट्रीय वीरसंत रामदास यांनींहि 'रामाबाई' ह्मणून प्रभूची करुणा भाकली आहे. ज्या मातेची उपमा साधुजनांनीं भगवंतास दिली, त्या मातेची योग्यता प्रभूइतकीच होय. 'जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसि' असें जें एका कवीनें लिहून ठेवलें आहे, तें अगदीं यथार्थ होय.

आज आमच्या वेणूस अत्यंत आनंद झाला होता. तिला मोठें समाधान वाटत होतें. तिला मोठा अभिमान वाटूं लागला. त्या कैदखान्यांतून तिची सुटका झाली, याबद्दल तिला जो आनंद झाला होता, त्यापेक्षां हा आनंद अधिक होता. कृष्णरावाला तिनें डोळे भरून पाहिल्यावर, तिला जो आनंद झाला होता, त्याहून आजचा आनंद कांहीं निराळा होता. यथा समयीं तिचें व कृष्णरावाचें लग्न

झालें, त्यावेळीं तिला जो आनंद झाला होता, त्या आनंदांत आणि आजच्या आनंदांत फार फरक होता. आजच्या आनंदाचें कारण निराळें होतें. आज तिच्याजवळ तिची आई इंदिरा बसून, तिच्या-बरोबर हितगुजाच्या गोष्टी सांगत होती. अर्थात् आज तिच्या आनंदाला उपमा नव्हती.

वेणूचें कृष्णरावाबरोबर लग्न होऊन, दोनच दिवस झाले होते. लग्न समारंभ मुंबईस चौपाटीवरील केशवरावच्या बंगल्यांतच झाला. वेणूचे कांहीं दिवस रुग्ण शय्येवर व नंतर कांहीं लग्नसमारंभाच्या गडबडींत गेल्यामुळें, इंदिराबाईंना तिच्याशीं स्वस्थपणें दोन गोष्टी बोलायला सवडच झाली नव्हती. लग्नासाठीं आलेली पाहुणे वगैरे मंडळी घरोघर गेल्यावर घरांतील गडबड कमी झाली व त्यामुळें सर्वांना निवांतपणें बसण्या उठण्यास सवड मिळाली. एका कोचावर आई शेजारीं बसून, वेणु लडिवाळपणानें म्हणाली,

"आई, हा कल्पनातीत सुखाचा दिवस येईल, अशी मला मुळींच आशा उरली नव्हती; पण केवळ ईश्वराच्या कृपेमुळें हा आनंदाचा दिवस उगवला."

वेणूचे डोळे पाण्यानें भरून आले. मागील गोष्टींच्या स्मृतीमुळें तिची तशी स्थिति व्हावी, यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं. इंदिरा-बाईंनीं वेणूचे डोळे आपल्या पदरानें पुसून त्या तिला कुरवाळून म्हणाल्या,

"वेणु, असें अक्षय डोळ्याला पाणी आणू नये बरें. जें झालें तें आतां सगळें विसरून जा. अजून तुला चांगली शक्ति आली नाहीं. जरी डोक्याची जखम भरून आली आहे, तरी तेथें नवीन

रक्त यावयाचें आहे. तुला आणखी कांहीं दिवस जपून राहिलें पाहिजे, असें वैद्याचें म्हणणें आहे."

आपलें मस्तक आईच्या वक्षस्थलावर ठेवून वेणू म्हणाली,

"आई, आतां कांहीं त्याची काळजी करायला नको. एवढी मोठी जखम, पण त्या वैद्यानें किती लवकर भरून आणली."

वेणूच्या गालावरून हात फिरवित तिची आई म्हणाली,

"वेणू, तो वैद्य तर म्हणत होता कीं, ही जखम भरून यायला दोन महिने लागतील; पण तूं जेव्हां आठ पंधरा दिवसांच्या आंतच बरी झालीस, तेव्हां त्यानें तुझ्या उपशमाचें मूळ निराळेंच आहे, असें जाणलें. तूं त्यावेळीं मस्तक आपटून मोठा अविचार केलास. ईश्वराचीच कृपा म्हणून तूं वांचलीस; नाहींतर आम्हां सर्वांना तूं दुःखांत लोटून दिलें असतेंस."

"आई, तर मी त्या कैदखान्यांत दुसरें काय करायला समर्थ होतें बरें? कपाळमोक्ष करण्यावांचुन मला मार्गच उरला नव्हता. त्यावेळीं मला विशेष वाईट वाटे तें एवढेंच कीं, शेवटपर्यंत तिकडच्या चरणाचें दर्शन झालें नाहीं. पण प्रभूच्या कृपेमुळें सर्व कांहीं सुरळीत घडून आलें. आई, त्या मेल्या नीच धोंड्यानें, बिचाऱ्या मनोरमेवर देखील असाच प्रसंग आणला होता. शेवटीं तिनें देखील देहपात करण्याच्या उद्देशानें माडीवरून खालीं उडी टाकली. ती मरावयाचीच; पण सच्चिदानंदांनीं प्रयत्न करून तिला वांचविलें. आई, त्या दोघांचें काय वर्णन करावें! मला तर तीं माणसें देवलोकींचीं असावींत असें वाटतें. मनोरमा तर साक्षात् लक्ष्मी आहे. किती गोड स्वभाव, किती अलोट

पण पवित्र प्रेम! मला तर वाटतें, त्या दोघांना देवघरांत बसवून त्यांची पूजा करीत जावी. सच्चिदानंदाचा व मनोरमेचा लवकरच पुनर्विवाह होणार आहे. मनोरमेनें जेव्हां सच्चिदानंदाजवळ ही गोष्ट प्रथम काढली, तेव्हां त्यांना एकदम अनुमति दर्शवितां येईना."

"हा दोष कांहीं सच्चिदानंदाचा नाहीं. लोकांत जे अनर्थावह प्रकार रूढ झाले आहेत, त्यामुळें चांगली, पण नवीन गोष्ट करण्यास नीतिधैर्यानें पूर्ण अशा मनुष्याचें देखील मन मागें घेतें. पण, सच्चिदानंद विवाह करून गृहस्थाश्रमी झाल्यावर, पुढें कालक्षेप कसा करणार?"

"आई, त्यांच्या जवळ अलोट संपत्ति आहे. या दरिद्री हिंदुस्थानची उन्नति व्हावी म्हणून ते अत्यंत खटपट करीत असतात. त्यांनीं फार प्रवास केला आहे. जपान, जर्मनी, अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड वगैरे देशांत कित्येक वेळां जाऊन, त्यांनीं त्या त्या देशांच्या ऊर्जितावस्थेचें चांगलें निरीक्षण केलें आहे. स्वतंत्र राष्ट्रांतील शिक्षण, आचार, विचार व पद्धति आर्यावर्तात सुरू झाल्यावांचून या देशास राष्ट्रीयत्व येणार नाहीं, अशी त्यांची समजूत आहे. खरें शिक्षण मिळावें म्हणून ते एक राष्ट्रीय विद्यालय स्थापणार आहेत व त्या कामीं आपला सर्व पैसा खर्ची घालणार आहेत. तरुण पिढीचीं मनें सुसंस्कृत व्हावींत व त्यांनीं स्वदेशास सर्वस्व मानावें, म्हणून ते फार खटपट करीत असतात. मनोरमादेखील सच्चिदानंदाप्रमाणें फार विद्वान आहे. मुलींकडून शाळेंत बादशाही घराण्यांची वंशावळ अगदीं तोंडपाठ करून घेतात; पण त्यांना रामायणांतील सीतादेवीची हकीकत माहित नसते, याबद्दल मनोरमेला

फार वाईट वाटतें. ज्या शिक्षणाची आवश्यकता नसते, असें शिक्षण शाळेंत मिळतें. त्यामुळें राष्ट्रास, समाजास व कुटुंबास या स्त्री‌‌ॱॱाचा कांहींच लाभ होत नाहीं. ही उणीव दूर करण्यासाठीं, मनोरमाहि कांहीं प्रयत्न करणार आहे. मनोरमेस एवढ्या उदात्त ज्ञानाची प्राप्ति रामायणभारतादि राष्ट्रीय ग्रंथांमुळें झाली, हें ऐकून ते ग्रंथ मीं न वाचल्याबद्दल मला फार वाईट वाटूं लागलें; पण आतां मी त्या ग्रंथांचें वाचन सुरू केल्यापासून मला मोठें समाधान वाटतें."

"स्त्रियांना ज्या शिक्षणाची आवश्यकता आहे, तें शिक्षण मिळत नाहीं, ही खरोखर मोठी उणीव आहे. प्रपंचांतल्या अडचणी कशा दूर करावयाच्या हें आम्हांला कळत नाहीं; पण इंग्लंडचा इतिहास पुरा अवगत होतो. याच कारणामुळें सुखाऐवजीं दुःखाचाच अनुभव पदोपदीं संसारांत येतो. त्या मनोरमेच्या उद्योगास ईश्वर यश देवो म्हणजे झालें."

याप्रमाणें दोघींचें बोलणें चाललें असतां रमाबाईहि तेथें येऊन बसल्या. रमाबाई आल्यावर वेणु कृतज्ञता दर्शवून म्हणाली.

"आई, माझ्यासाठीं रमावन्सना फार खटपट करावी लागली. त्यांची मी कशी उतराई होईन कोण जाणें."

रमाबाई म्हणाल्या,

"वेणु, त्यांत मी असें काय मोठें केलें? माझें कर्तव्य तेंच मी केलें. पुन्हा, त्यांत माझ्या कृष्णरावाचा संबंध असल्यामुळें, मी निष्काम‌बुद्धीनें खटपट केली; असेंहि म्हणतां येणार नाहीं. अर्थात त्याकरितां इतका मोठेपणा कांहीं मला द्यावयाला नको."

इंदिराबाई म्हणाल्या,

"विश्वनाथरावांनीं आमच्यावर एवढी आग पाखडली; पण त्याचा परिणाम कांहीं वाईट झाला नाहीं. तुमच्या व मनोरमेच्या परिचयास कारण विश्वनाथरावच आहेत, तेव्हां त्यांचे देखील आम्हीं ऋणीच आहोंत."

इतक्यांत वेणु म्हणाली,

"आई, आतां त्या धोंडीराजाचे काय होईल गे?"

"त्याला सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली आहे. त्याच्या बापानें अपील केलें आहे. त्यांत काय होईल तें खरें?"

"आई, कैद्यांना तुरुंगांत कसें वागवितात?"

"वेणु, तुरुंग म्हणजे इहलोकचे नरकच आहेत. तेथें कैद्यांना अत्यंत निर्दयपणानें वागवितात. खडी फोडवून घेतात, दळायला लावतात, घाण्याला गुरांप्रमाणें जुंपून तेल काढून घेतात. शहरांतली घाण काढायला लावतात. कामांत चूक झाल्यास चाबकांनीं मारतात. कदान्न खायला देतात. जाड व वाईट कपडे घालायला देतात. आप्तजनांची भेट होऊं देत नाहींत. असे तुरुंगांत मोठे हाल असतात."

"आई, तो श्रीमंताचा मुलगा, हे कष्ट कसे सहन करील? आपण जर त्याला क्षमा केली, तर नाहीं का कांहीं उपयोग होणार?"

"वेणु, त्यानें किती भयंकर अपराध केले आहेत, याची तुला कल्पना नाहीं. जसें कर्म, तसें त्याचें फळ; हा या दुनयेचा न्यायच आहे."

"माझ्या क्षमेनें जर त्यांच्यावर कांहीं उपकार होण्यासारखा असेल, तर मी सर्व अपराधाची क्षमा करायला तयार आहें."

"तरी त्याची शिक्षा एक केंसभरहि कमी होणार नाहीं."

"आई, गोविंदरावाच्या घराला आग लागली होती, त्याचें काय झालें गे!"

रमाबाई मध्येंच म्हणाल्या.

"वेणु गोविंदरावांचें कशाला म्हणतेस, तूं आपलेंच म्हणेनास. विश्वनाथरावांनीं एकंदर नुकसानीबद्दल पंचवीस हजार रुपये आपसांत दिल्यामुळें, विश्वनाथरावावरची फिर्याद काढून घेतली."

वेणु म्हणाली,

"रमावन्सं, या कामीं, केशवरावांनी फार श्रम घेतले. त्यांनीं आम्हांला जन्मोजन्मींचे ऋणी करून ठेविलें आहे. हिमूच्या पाठीवर तुम्हाला मुलगा झाला, म्हणजे मला मोठा आनंद होईल."

"वेणु, तुझ्याकडून माझ्या पितृवंशाची वृद्धी झालेली पाहिली, म्हणजे मीहि कृतकृत्य होईन."

इंदिराबाई वेणूच्या पाठीवर हात ठेवून म्हणाल्या.

"वेणु, त्या तुझ्यापेक्षां वयानें मोठ्या आहेत, त्यांच्याशीं आदरानें वागत जा हो. लहानपणापासून तूं गोविंदरावच्या कुटुंबांत त्यांच्या मुलीप्रमाणें वागली असल्यामुळें, आतां सून या नात्यानें वागतांना थोडें जड जाईल. कृष्णरावाबरोबर तूं खेळत होतीस; पण ते आतां तुझे पति आहेत, हें लक्षांत ठेव. सासरीं कसें वागलें पाहिजे, हें मी तुला सांगितलें पाहिजे असें नाहीं; पण मला सांगितल्यावांचून राहवत नाहीं. पति हें स्त्रीचें मुख्य भूषण होय. पति हाच स्त्रीचा देव. पतीच्या चरणदर्शनानें स्त्रिया पुनित होतात. पतीच्या सेवेनें

स्त्रियांना दिव्य लोकाची प्राप्ति होते. पतीची पदधुळी वंदन केल्यानें स्त्रियांना पुन्हां जन्म मिळत नाहीं. पतीला आपला प्रभु मानून, त्याची सदैव दासीप्रमाणें सेवा करावी. आपल्या चुकीमुळें पति असंतुष्ट होईल, असें कधींहि आचरण करूं नये. कारण तें नरकप्राप्तीचें साधन होय. पति व पत्नी आनंदानें नांदल्यास, त्यांच्या उज्वल प्रणयास पवित्रतेचें कोंदण मिळतें. अशा कुटुंबांत सुखाचा उगम आपोआप होत असतो. शांती अशाच कुटुंबांत दृष्टीस पडते. संसारशकटाची पति व पत्नी हीं दोन चाकें आहेत; हीं दोन्हीं चक्रें स्वभावानें, ज्ञानानें, समजुतीनें, व अधिकारानें सारखीं असल्यास हा संसारशकट सुरळीत चालतो. तुझ्या प्राक्तनानें, तुला रूपानें, शीलानें, ज्ञानानें तुला हवा होता, तसा पति मिळाला आहे. तुझा सासरा तुला मुलीप्रमाणें वागविणारा आहे. तुझी सासू माझ्याहूनहि तुझ्यावर अधिक प्रेम करील अशी आहे. चांगल्या माणसांचा सहवास हाच स्वर्ग-सुखाचा ठेवा होय. हा ठेवा तुला तुझ्या दैवबळानें मिळाला आहे. तूं आपल्या गुणांनीं सर्वांना आवडती हो, आचरणांनीं सर्वांना वंद्य हो आणि पतिसेवेनें पावन हो म्हणजे झालें."

वेणु विनम्रपणें म्हणाली,

"आई, तुझा हा उपदेश मी कधींदेखील विसरणार नाहीं."



## प्रकरण अकरावें.

# पशु.

यमुना आपल्या माडीवरच्या खोलींत पतीविषयीं काळजी करीत बसली होती. तिच्या हृदयांत चिंता मूर्तिमंत येऊन नाचत होती. 'पति' हा एकच विषय तिच्या हृदयांत घोळत होता. पतीपासून तिला आजवर सुखाचा लेश देखील मिळाला नव्हता आणि पुढेंहि मिळण्याची आशा नव्हती; तथापि तिचें सर्व लक्ष पतीचें कसें होईल, या विवंचनेकडे होतें. पतीपासून तिला वारंवार अत्यंत त्रास होत असे, तरी क्वचित् प्रसंगीं तिला उत्साह वाटे. पतीच्या दर्शनानें तिला आनंद होई आणि पतीची सेवा घडली म्हणजे, आपण मोठे सुखी आहों, असें तिला वाटत असे; परंतु आतां तिची सगळी आशा नाहींशी झाली होती. आपला जन्म गेला असाच पुढेंहि हाल, अपेष्टा आणि कष्ट यांत जाणार, अशी तिची खात्री होऊन चुकली होती. तरी स्त्रीचें कर्तव्य असें जाणून, ती रात्रंदिवस ईश्वराजवळ पतीची मंगलकामना चिंतीत असे. ती एकसारखी काळजींत चूर होती. बिचारी नेहमीं चिंतातरंगांवर तरंगत असे. यमुनेची दशा पराकाष्टेची शोचनीय झाली होती. अगोदरच यमुना सुकुमार असून, घरांतील जांचामुळें अशक्त झाली होती. त्यांतून या नवीन ओढवलेल्या संकटामुळें तर ती अगदीं निस्तेज, कृष व सौंदर्यहीन झाली होती. तिनें आहार टाकून दिला होता; पाणी,

पण त्यालादेखील ती शिवत नव्हती. कित्येक रात्रींत विचारीचा डोळ्याशीं डोळा असा लागला नव्हता.

राधाबाईचे व्यवहार सर्व सुरळीत चालले होते. एवढा डोंगर कोसळून पडला होता, तरी तिच्या वागणुकींत व स्वभावांत मुळींच फरक पडला नाहीं. यमुनेस तर ती आतां पूर्वीपेक्षां दुप्पट छळीत असे. तिची अशी पक्की खात्री झाली होती कीं, हा सारा यमुनेच्या पायगुणाचा प्रताप आहे. ही जेव्हां नाहींशी होईल तेव्हां माझ्या संसाराला रंग येईल; अशी तिची दृढ समजूत झाली होती. पंचाक्षरी, जोशी, देवऋषी, यांना ती यासंबंधानें वारंवार विचारी. ते भोंदू लोक राधाबाईचा कल पाहून तिला असें सांगत कीं, 'ही तुझी सून फार करंटी आहे. हिच्या जन्माच्या वेळीं फार वाईट ग्रह होते. ही ज्याच्या घरांत शिरेल त्याचा नाश करील.' त्या भोंदू लोकांचें वरील भविष्य ऐकून सून नाहींशी झाल्यावांचून आपणास सुखाची प्राप्ति नाहीं, अशी राधाबाईची दृढतर समजूत झाली होती.

शुभशकून आणि अपशकून, चांगल्या पायगुणाचीं माणसें, आणि वाईट पायगुणाचीं माणसें, अमुक दिवस चांगला आणि अमुक दिवस वाईट, या खुळामुळें आमच्या समाजाचें क्षणोक्षणीं किती नुकसान होत असेल, याची कल्पनाहि करतां येत नाहीं. या अज्ञानामुळें मोठमोठीं कामें बाजूला पडलीं असून यमुनेसारखीं निरपराधी माणसें, लोकांच्या छळास पात्र झालीं आहेत. राधाबाईच्या विलक्षण टोंचणीमुळें आपण खरोखरच असे अभद्र आहों कीं काय, असा यमुनेला संशय येई. 'माझ्यामुळेंच जर एवढें नुकसान झालें असेल, तर मी मरून जावें

हेंच उत्तम' असें ती वारंवार स्वतःशीं म्हणे. पण यमुने, तुझे हे विचार अगदीं मिथ्या होत. तुला अभद्र म्हणणारे मूर्ख होत; तुला पांढऱ्या पायांची म्हणणारे नीच होत आणि तुला निंद्य मानणारे खात्रीनें राक्षस अथवा पशु होत.

यमुनेसारख्या स्नुषा, यमुनेसारख्या साध्वी स्त्रिया, आम्हीं आमच्या हिंदुसमाजाचें मोठें भूषण समजतों. पतीला आपलें सर्वस्व समजणाऱ्या यमुनेसारख्या स्त्रियांविषयीं आम्हाला मोठा अभिमान वाटतो. यमुनेची स्तुति कितीहि केली, तरी ती थोडीच होय. यमुनेचें हृदय अति उदार; तिचे विचार अत्यंत उदात्त; प्रीति, स्नेह, प्रणय, ममता वगैरे मनोविकार अति पवित्र; स्वभाव फार गोड व सरळ; स्वरूप व वर्ण विशेष मनोहर; संसारशकट हांकण्यांत सर्वथा योग्य; ती कार्यदक्ष, सुशील, शांत व चतुर होती; परंतु धोंडीराजासारख्या पशुवत् पतीचा बिचारीला लाभ झाल्यामुळें, तिच्या सर्व गुणांवर पांघरूण पडलें होतें. या पवित्र हिंदुरमणीचा केवळ धोंडीराजामुळें त्या कुटुंबास, हिंदुसमाजास व आमच्या राष्ट्रास मुळींच उपयोग झाला नाहीं. पतीच्या एकाद्या गोड शब्दानें देखील तिनें स्वतःस धन्य मानून घेतलें असतें; पण तो चांडाळ तिच्याशीं कधीं फुकाचें गोड बोलला देखील नाहीं. तो कुलांगार यमुनेची थोडीदेखील काळजी वहात नसे; इतकेंच नव्हे, तर तिला अहर्निश सतावून सोडण्याचा त्याचा प्रयत्न चालू असे. तथापि, यमुना नित्य पतीचें मंगल चिंतीत होती. पतीला सुखी पाहूनच तिला बरें वाटे; त्याला संतोषी पाहून तिला संतोष होई; पतीला आनंदित पाहून तिला आनंद होई.

धोंडीराज यमुनेस वाटेल तसा छळीत असे, तरी ती आपल्या पतीला देवाप्रमाणें मानी, त्याची मूर्ति निरंतर हृदयांत बाळगी, त्याला पूज्य समजून त्याची भक्तिभावानें सेवा करी. बिचारी रात्रंदिवस पति पति म्हणून हळहळत असे. लोक धोंडीराजाची निंदा करूं लागले म्हणजे तिचा जीव तिळ तिळ तुटे. तो तुरुंगांत गेल्यापासून तर तिच्या अंतःकरणास काळकुट्ट विष झोंबल्याप्रमाणें वेदना होत. यमुने, कोण ही तुझी दांडगी पातिभक्ति! केवढें तुझें थोर अंतःकरण!! तूं आपल्या तेजानें रत्नालादेखील लाजवीलेंस!!! आहिल्या, सीता, मंदोदरी, तारा या थोर स्त्रियांप्रमाणें तुझी योग्यता; पण आमच्या निर्घृण समाजरचनेमुळें, तुझा आमच्या समाजाला काडीइतकादेखील फायदा झाला नाहीं. या भयंकर नुकसानीचें कारण समाजांतले समाजकंटक होत. आमच्या समाजास यमूचा कांहींदेखील उपयोग झाला नाहीं, तरी तिला आम्हीं आमच्या समाजाचें भूषण समजतों.

यमूची ही यंत्रणा दूर व्हावी म्हणून, यमूच्या बापानें पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. यमूचा धाकटा भाऊ वामन यानांवाचा होता, तो आतां चांगला कर्ता सवरता झाला होता. बापाची गरीबी असून तो आपल्या प्रयत्नानें बी. ए. झाला होता व पुढें हि त्याचा अभ्यास सुरू होता. यमूवर ओढवलेल्या नवीन प्रसंगाची बातमी त्याला समजल्याबरोबर तो यमूच्या समाचारास आला होता. तो तिला म्हणाला,

"यमू, बाबांनीं तुला घरीं घेऊन जाण्याचा कित्येक वेळां प्रयत्न केला; पण तूं कांहीं त्यांच्या म्हणण्याला रुकार दिला नाहींस. पण आतां कांहीं या घरांत राहणें तुला शोभावयाचें नाहीं."

"वामन, आह्मां स्त्रियांना शोभा गैरशोभा याकडे लक्ष देऊन कसें चालेल? मला आपलें कर्तव्य ओळखलें पाहिजे, आणि त्याप्रमाणें वागलें पाहिजे."

"इतके दिवस तुझें म्हणणें बरोबर होतें; पण ज्या पतीवर तुझी एवढी भक्ति आहे, तो सात वर्षें तुरुंगांत गेल्यावर तूं येथें राहून काय करणार? ती तुझी द्वाड सासू तुला निरंतर छळते. अशा हाल अपेष्टांत राहण्यांत काय अर्थ आहे? तूं आपली घरीं चल. मी विश्वनाथरावांवर अन्नवस्त्राचा दावा करून, तुझी सर्व कांहीं व्यवस्था करतों."

"वामन, हें काय तूं वेड्यासारखें बोलतोस. आह्मां स्त्रियांचा धर्म बघ फार कठिण आहे. येथें मला कितीहि यातना असल्या, माझे कितीहि हाल होत असले, तरी मला याच घरांत जन्म कंठला पाहिजे. या हालअपेष्टा चुकविण्यासाठीं, मी जर तुझ्या घरीं येऊन राहिलें, तर मला कांहींदेखील सुख होणार नाहीं. उलट लोक माझी निंदाच करतील. पतीची सेवा या नशीबीं नाहीं तर नाहीं, पण या घरांत राहून निदान मला त्यांची मंगलकामना तरी चिंतितां येईल. शिवाय थोडी फार सासुसासऱ्यांची सेवा घडेल, ती तरी माझ्या समाधानाला एक जागा आहे."

"यमू, तूं उदात्त विचारांनीं प्रेरित होऊन बोलतेस तें बरोबर आहे; पण पति, सासू व सासरा तिघेहि जर तुझ्याविरुद्ध आहेत, तर येथें राहण्यांत काय फायदा बरें?"

"तुझ्या घरीं, येऊन राहण्यापेक्षां पुष्कळ फायदा आहे. पति तिकडे तुरुंगांत हालअपेष्टांत दिवस काढीत असतां, थोडेसे कष्ट चुकविण्यासाठीं या पवित्र मंदिराप्रमाणें श्वशुरालयास सोडण्याचें मी कधींहि कबूल करणार नाहीं. माझे सासुसासरे माझ्याविरुद्ध कितीहि असले तरी ते मला देवाप्रमाणें पूज्य आहेत. त्यांची सेवा शुश्रूषा करणें हेंच स्नुषेचें कर्तव्य होय. हें कर्तव्य करण्याचा उपदेश करावयाचा टाकून, तूं मला आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख करीत आहेस, हें निदान यमूच्या भावाला तरी शोभावयाचें नाहीं."

"यमू, तुझ्या इच्छेची गोष्ट. माझ्या कोत्या विचाराबद्दल तुला जर राग आला असेल, तर क्षमा कर."

वामनाचें व यमूचें वरीलप्रमाणें बोलणें चाललें असतां एक मोलकरीण यमूच्या खोलींत येऊन, 'खालीं धोंडीराज आले आहेत' असें सांगून निघून गेली. ही बातमी ऐकून, वामनहि यमूचा निरोप घेऊन निघून गेला. पति जामिनावर सुटून आल्याचें ऐकून, यमुनेस साहजिक कल्पनातीत आनंद झाला. आठ चार दिवस तरी पतीचें दर्शन होईल, या विचारानें तिला मोठें समाधान झालें. तिचे डोळे पाण्यानें भरून आले. पतीचें केव्हां दर्शन घेईन असें तिला झालें होतें. ती अश्रु ढाळीत ढाळीत खालीं उतरून येऊं लागली; पण खालीं सासूबाई व पति कांहीं बोलत आहेत असें पाहून, तशीच जिन्यांत उभी राहिली. धोंडीराज घरांत आल्याबरोबर राधाबाई त्याला कडकडून भेटून म्हणाली,

"बाळ, एवढ्या आठ दिवसांतच कायरे तुझी ही स्थिति झाली! तुझ्यावर हा प्रसंग यायला, कारण ती यमुना!! ती घरांत आल्यापासून सगळ्या घराचा खेळखंडोबा झाला."

धोंडीराजाचे डोळे लाल बुंद झाले होते. गांवांत आल्याबरोबर प्रथम कलालाच्या दुकानांवर जाऊन, तो यथेच्छ मद्य प्राशन करून आला होता. प्रस्तावने बरोबरच यमूचें नांव निघाल्यमुळें तो अधिक क्रुध होऊन म्हणाला,

"त्या चांडाळणीनें बाहेर बातमी फोडल्यामुळें एवडा प्रसंग ओढवला."

राधाबाई म्हणाली,

"ती, आणखी ती तिची मैत्रिण गंगाबाई, या दोघींनीं सगळा नाश केला, नाहीं तर आज माझ्या माधवाचे दोन हाताचे चार हात झाले असते; पण या यमूच्या सांगीवरून त्या गंगाबाईनें कृष्णरावाला खबर दिली. कृष्णरावाला ज्या दिवशीं समुद्रांत ढकलावयाचें ठरलें, त्याच दिवशीं त्याला यमुनेनें ती गोष्ट कळविली. नाहीं तर आज कृष्णरावाचें नखदेखील दृष्टीस पडलें नसतें आणि हा असा प्रसंगहि आला नसता. आगलावीबद्दल फिर्याद होणार होती, पण यमुनेनें तिकडे सल्ला दिला कीं, आपसांत तडजोड करावी. झालें, गोष्ट पटली. लागलेच मी नको नको म्हणत असतां, पंचवीस हजार रुपये गोविंदरावाला नेऊन दिलें; शिवाय नाक घांसलें तें वर."

ही हकीकत ऐकून धोंडीराजाच्या अंगांची अगदीं लाही लाही होऊन गेली. तो दांत ओंठ चावीत म्हणाला,

"त्या थेरड्याची तर अगदीं अकल नाहींशी झाली आहे. एकदम पंचवीस हजार रुपये उचलून चोराच्या स्वाधीन केले, याला म्हणावयाचें

तरी आय ? तो फिर्याद करता तर आणखी चार वर्षांची शिक्षा झाली असती. त्या अवदसेनें बरेच खेळ मांडले आहेत. आमचें घर म्हणजे प्रति किल्ला. आम्हीं आमच्या घरांत माणूस मारलें, तर बाहेर हूं का चूं कळावयाचें नाहीं; पण घरची घरभेदी असल्यावर कां नाहीं साऱ्या गांवांत टिमकी वाजणार? आम्हीं एवढे पराक्रमी, पण हिच्यामुळें अपयशी ठरलों. या अवदसेनें माधवरावाच्या लग्नांत बिब्बा फासला. हिनें जर एवढें केलें नसतें, तर माधवरावाचें लग्न होऊन गोविंदराव व इंदिरा या दोघांच्या मालमिळकतीचे आम्हींच मालक झालों असतों."

राधाबाई म्हणाली,

"आतां तूं एवढा आला आहेस, पण ती कांहीं माडीवरून उठून खालीं यावयाची नाहीं."

धोंडीराज हातांत एक जाड सोंटा घेऊन क्रोधानें म्हणाला,

"कोठें आहे ती अवदसा! मला तिचा चांगला समाचार घेतला पाहिजे."

असें म्हणून धोंडीराज माडीचा जिना चढूं लागला, तोंच त्याला यमुना वाटेंत दिसली; त्याबरोबर त्यानें तिचा हात धरून, तिला जोरानें खालीं ओढलें आणि एक सोंटा तिच्या पाठीवर मारून तो म्हणाला !"

"कुलटे, घरभेदेपणाचे चाळे तुला सुचले काय?"

आशातीत मनानें पतीच्या दर्शनासाठीं उत्सुक झालेली यमुना पतीच्या कोपानल भडकविण्यास कारण झाली. त्या चांडाळानें जो एक सोंटा तिच्या पाठींत मारला होता, त्याच्या आघातानें ती कासावीस झाली. तरी तिचें सर्व लक्ष पतीची पदधुळी वंदन करण्यास मिळावी, याकडे

असल्यामुळें ती पतीच्या चरणांवर मस्तक ठेवून सर्व दुःख विसरली. पण त्या चांडाळानें तिला लाथ मारून लांब झुगारून दिले. यमुना तशीच जवळ येऊन म्हणाली,

"जर माझा अपराध असेल, तर मला क्षमा करा अथवा शिक्षा करा. पण आपण दमून आलां आहांत. अगोदर विश्रांति घ्या, खाणेंपिणें झाल्यावर मला वाटेल ती शिक्षा करा."

आपले रक्तासारखे लालबुंद झालेले डोळे वटारून धोंडीराज म्हणाला,

"चांडाळणी, तुला कायमची विश्रांति दिल्यावांचून मी विश्रांति घेणार नाहीं. तुला आतां सर्व अपराधांची एकदमच क्षमा करतों. करंटे–"

असें म्हणून धोंडीराज हातांतील सोंट्यानें यमुनेला जनावराप्रमाणें बडवूं लागला. ती दीन गाय बिचारी धाय मोकलून रडूं लागली. आणखी कांहीं आघातांनीं रडावयाचेंहि बंद होऊन, ती मूर्छित होऊन, जमीनीवर निचेष्ट पडली. यमुना अचैतन्यावस्थेंत जमिनीवर पडली होती, तरी देखील तो नरकलंक नीच कुलांगार तिला लाथा मारूं लागला. ती बिचारी आसन्नमरण झाली, तिचे डोळे पांढरे झाले, हात-पाय लाकडांसारखे ताठ झाले, श्वासोश्वास सपाट्यानें चालूं लागला आणि दांत एकमेकांत घट्ट जाऊन बसले. हाय, हाय! यमू, कोण ही तुझी विपन्नावस्था! नरपशु, राक्षस तुझ्यावर एवढा जुलूम करीत असतां तुला कोणीदेखील सोडवायला आलें नाहीं ना? तुझी करुणा कोणालादेखील आली नाहींना? अनाथांचा वाली ईश्वर असतो, असें लोक म्हणतात, पण तो तरी या वेळीं कोठें आला? राधाबाई तेथें जवळ उभी होती, पण तिला कींव येण्याऐवजीं समाधान झालें होतें.

यमुना जों जों कळवळे तों तों त्या चांडाळणीस गुदगुदल्या होत होत्या. धोंडीराजास आज आपण मोठा पराक्रम केला, असें वाटत होतें. तो अभिमानानें सुस्कारे सोडीत तेथें जवळच उभा होता. यमूच्या शरीरांतून प्राण केव्हां निघून जातो, यांची दोघेंहि मोठ्या उत्सुकतेनें वाट बघत होते.

धोंडीराज घरांत येऊन या धांगडधिंग्यास सुरवात झाल्याबरोबर घरांतील मोलकरीण विश्वनाथरावांला पाहण्यासाठीं गेली. विश्वनाथराव या वेळीं बाहेर गेले होते. त्यांच्या डोळ्यांवरची धुंदी लवकरच उतर-ल्यामुळें ते शुद्धीवर येऊन, गायीपेक्षांहि दीन झाले होते. आतां ते चार मित्रमंडळींत बसून कसेंतरी मनाचें समाधान मानून घेत असत. रोजच्या प्रमाणें आजहि ते मित्रमंडळींत बोलत बसले असतां, मोलक-रणीनें धोंडीराजानें कसा पराक्रम गाजविला तें सांगितलें. ती हकीकत ऐकून सर्व मंडळी विश्वनाथरावांसह घाई घाईनें त्यांच्या घरीं आली. पाहतात तों यमुना निचेष्ट पडली असून, जवळ राधाबाई व धोंडीराज स्वस्थ उभीं आहेत. चार दोन मंडळींनीं मोठ्या कष्टानें धोंडीराजास बाहेर नेलें. कांहींनीं वैद्याला बोलावून आणून यमुनेस ओषधोपचार चालू केले. हा प्रकार पाहून विश्वनाथरावांची छाती दुभंग झाली. ते आपल्या कपाळावर हात मारून घेऊन म्हणाले,

" यमू, काय तुझी ही स्थिति? तुझ्या साध्वीच्या छळामुळें आमच्यावर एवढें संकट कोसळलें, तरी या कारट्याचे अजून डोळे उघडत नाहींत, यावरून आमचें दुर्दैव अजून संपलें नाहीं, हेंच खास."

यमूचा भाऊ वामन याच्याहि कानावर हा भयंकर प्रकार लागलाच गेला. तें ऐकून तो खूप संतापून गेला. तो यमूच्या समाचाला आला, तो

पोलिस बरोबर घेउनच आला. यमूची ती स्थिति पाहून, पोलिसांनीं धोंडीराजावर दुसरी फिर्याद दिली.

यमुनेची शोकावह कथा कोठवर वर्णन करावी! धोंडीराज व यमुना यांच्या मधील हें दाम्पत्यप्रेम एक मोठें आश्चर्य होय. विधात्यानें या सृष्टींत आणखी किती आश्चर्यें केलीं आहेत, हें तरी कोणाला माहीत!

## प्रकरण बारावें.

### रूढि.

वेणु व कृष्णराव यांचा विवाह झाल्यावर चार दिवसांनीं, केशवरावां- कडेच मनोरमा व सच्चिदानंद यांचा यथाशास्त्र पुनर्विवाह झाला. सच्चि- दानंद व मनोरमा यांनीं या पुनर्विवाहचे कामीं जें मानसिक धैर्य दाख- विलें, त्याबद्दल त्यांचा सन्मान करावा, असें कित्येक विद्वान मंडळीला वाटत होतें व त्याप्रमाणें त्यांनीं आज मुंबई येथील प्रेमाबाईच्या बंगल्यांत सच्चिदानंद व मनोरमा यांना पानसुपारीसाठीं बोलाविलें होतें.

सार्वंना येण्याची मोकळिक असल्यामुळें, सर्व दर्जाचे, जुन्या नव्या विचारांचें लोक या समारंभास मुद्दाम आलें होते. सच्चिदानंद व मनो- रमा यांच्या पुनर्विवाहाच्या हकीकती अगोदरच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्यामुळें लोकांत या विवाहाची विशेष चर्चा चालू होती व त्या उभ- तांचें दर्शन घडावें असें पुष्कळांना वाटत होतें. तो योग अनायसें आल्यामुळें पुष्कळ लोक गोळा झाले होते. पुष्कळ स्त्रियाहि मुद्दाम आल्या होत्या. नियमित वेळेला सच्चिदानंद व मनोरमा उभयतां येऊन दाखल झालीं. त्या दोघांच्या पवित्र व तेजःपुंज प्रतिमा पाहून जुन्या नव्या सर्व लोकांनीं त्यांचें स्वागत करून, त्यांना उच्चासनावर नेऊन बसविलें. नंतर केशवराव उभे राहून म्हणाले,

" सभ्यगृहस्थहो, आजचा दिवस मोठ्या आनंदाचा व चिरस्मर- णीय आहे. आजवर अशा प्रकारचे मंगल प्रसंग आपण पुष्कळ साजरे

केले आहेत, परंतु आजचा प्रसंग, विशेष महत्वाचा व पुनर्विवाहाच्या इतिहासांत प्रमुखत्वें करून दाखल करण्यासारखा आहे. अजच्या निमंत्रणपत्रिकेंत सच्चिदानंद व मनोरमा यांची थोडक्यांत माहित दिली आहे. तिचें ज्यानीं मनन केलें असेल, त्यांच्या लक्षांत आजच्या प्रसंगाचें महत्व सहज येईल. पुनर्विवाह ज्यांना सम्मत नाहीं, अशी आमच्या विरुद्ध बाजूची मंडळी, आमच्यावर टीकेचा असा भडिमार करीत असतात कीं, पुनर्विवाहास तयार होणारे लोक अशिक्षित, असमंजस व विषयी असतात. ते केवळ लोभानें पुनर्विवाहास तयार होतात, ते स्त्रियांच्या सौंदर्यास चाहतात, संसाराची व कामाकाजाची अडचण दूर व्हावी; अशा प्रकारच्या क्षुद्र फायद्यासाठीं कित्येक पुनर्विवाहास तयार होतात; परंतु विरुद्धबाजूचे हे आक्षेप किती असत्य आहेत, हें या पुनर्विवाहावरून सहज दिसून येणार आहे. सच्चिदानंदासारखा साधु, सुशील, संसारास तृणवत् मानणारा, वेदांत व धर्मशास्त्र विषयांत परिपूर्ण, ऐन तारुण्यांत कामक्रोधादि षड्रिपूंस ज्यांनीं आपले दास करून टाकले, असा थोर मनुष्य पुनर्विवाहास तयार झाला, यावरून पुनर्विवाहांत देखील कांहीं पवित्रपणा आहे, असें आमच्या शत्रुपक्षासहि कबूल केलें पाहिजे. हा विवाह धनलोभानें झाला म्हणाल, तर मनोरमा जन्मापासून दरिद्री आहे. सच्चिदानंदांनीं आपली सर्व दौलत राष्ट्रीय विद्यालयाच्या स्वाधीन केल्यामुळें, तेहि हल्लीं निष्कांचन स्थितींत आहेत; तेव्हां हा विवाह द्रव्यलोभानें झाला, असेंहि म्हणतां येणार नाहीं. खऱ्या खऱ्या विवाहांत जीं उदात्त तत्वें विवाहाच्या कारणासाठीं सांगण्यांत येतात, त्याच उदात्त तत्वांवर हा विवाह झालेला आहे. हा विवाह मनोविकाराच्या प्राबल्यामुळें झाला नसून

आमच्या या अधोगतीस चाललेल्या राष्ट्राला सुमातांची व सुसंतानांची प्राप्ती व्हावी, एवढ्याचसाठीं झालेला आहे. तरुण, सुशील व सुशिक्षित विधुर विधवांनीं संन्यास दीक्षा ग्रहण करून, एकलकोंडेपणानें समाज व राष्ट्रापासून निराळें राहण्यांत त्यांचा तर नाहींच, पण राष्ट्राचा व समाजाचाहि कांहीं फायदा नाहीं. चांगल्या चांगल्या सुवासिक फुलांनीं झाडावरच्या झाडांवर सुकून जाण्यांत जसा झाडाचा फायदा नाहीं, त्याप्रमाणें तरुण विधुर व विधवांचा राष्ट्रालाहि कांहीं फायदा नाहीं. आमचे टीकाकार पुनर्विवाह हा गौण विवाह आहे, असें प्रतिपादन करितात. पुनर्विवाह हा गौण आहे असें आम्हींहि कबूल करतों; परंतु जोंपर्यंत बालविवाहाची भयंकर रूढि आमच्या समाजांत आहे, तोंपर्यंत पुनर्विवाहाच्या पद्धतीस गौण असें म्हणतां येणार नाहीं. ज्या समाजांत बालविवाहाची राक्षसी चाल आहे, त्या समाजांत त्या रूढीचे दुःष्परिणाम नाहींसे होण्यासाठीं, पुनर्विवाहास संमति देणें प्रत्येकाचें कर्तव्य होय. लग्न म्हणजे काय, पति म्हणजे काय, संसार म्हणजे काय, हें ज्यांना कळत नाहीं, अशा मुलीचें लग्न तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन करणें, म्हणजे राक्षसी विवाहपद्धति स्वीकारण्यासारखें होय. अशा मुलीचा पति मृत झाला, तर तिला आपल्यावर काय प्रसंग गुदरला हें समजत नाहीं; तथापि त्या बालिकेस लोक विधवा विधवा म्हणून म्हणतात; हा खरोखर अमानुषपणा नव्हे काय?

वैधव्यदशा प्राप्त झालेल्या मुलींनीं पुढें आपले दिवस कसे कंठावयाचे, याचा विचार जर सदय अंतःकरणानें जुन्या विचारांची मंडळी करतील, तर त्यांना देखील आपल्या अमानुषपणाचा तिटकारा आल्यावांचून राहणार नाहीं. वास्तविक ज्यांना पुनर्विवाह नको आहे, त्यांनीं

बालविवाहाची चाल बंद करण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे; परंतु या लोकांची मौज ही कीं, एकीकडून बालविहाची रूढि तशीच कायम ठेवावयाची व दुसरीकडून पुनर्विवाहस बंदी करावयाची. म्हणजे हा दुहेरीअमानुषपणा होय. मनोरमेच्या चरित्राचा आपण जर शांतपणानें विचार कराल, तर आपणास ही गोष्ट कळून येईल कीं, तरुण विधवा स्त्रियांना आपलें सतित्व संरक्षण करणें अत्यंत दुरापास्त झालें आहे. समाजांत सर्व प्रकारचे लोक आहेत. त्यांत कांहीं दुष्ट, नीच, दुराचरणी आहेतच. त्यांच्यापासून अशा विधवा स्त्रियांनीं, आपलें संरक्षण कसें करून घ्यावें ? शिवाय स्त्रियांना वैधव्यावस्थेंत म्हणजे कांहीं अंशीं स्वतंत्र ठेवणें हें देखील परिणामीं भयंकरच आहे. कित्येक विधवा स्त्रियांकडून नित्यशः अशीं कांहीं चमत्कारीक कृत्यें होत असतात कीं, त्यामुळें त्या स्त्रीच्या आप्तजनांना बाहेर तोंड काढण्यासहि जागा उरत नाहीं. मग या मंडळीस पुनर्विवाह केला असता, तर बरें झालें असतें, असा पश्चात्ताप होतो. असा पश्चात्ताप करण्याची हजारों लोकांवर पाळी आलेली आहे. अशा प्रकारें लोकांत फजिती करून घेण्यापेक्षां पुनर्विवाह करणें हें अत्युत्तम नव्हे काय ? आपल्या मुलींनीं वैधव्यावस्थेंत घाणेरडीं कृष्ण कृत्यें करून, स्वतःला, कुलाला व एकंदर समाजाला कलंक लावावा हें कोणाला तरी प्रशस्त वाटेल काय ? ज्यांच्या ज्यांच्यावर असा दुर्धर प्रसंग आलेला आहे, त्या शेंकडों लोकांनीं, जगास तोंड न दाखवितां आत्महत्या केलेली आहे. हा कशाचा परिणाम बरें ? हे किंवा अशाप्रकारचे भयंकर प्रसंग ओढून आणण्यापेक्षां पुनर्विवाहास संमति देणें हाच श्रेयस्कर मार्ग होय. आमच्या प्रतिपक्षाची मुख्य कोटी म्हटली म्हणजे ही होय कीं, पुनर्विवाहास

शास्त्रसंमति नाहीं. तसें असेलहि कदाचित्, परंतु शास्त्रसंमति या विषयाचा विचार समानदृष्टीनें केला पाहिजे. हृदयांत पवित्र समता ठेवून जर शास्त्रांचा विचार केला, तर हीं शास्त्रेंहि आम्हास अनुकूल आहेत असें दिसून येईल. ज्यावेळीं शास्त्रें तयार होतात, त्यावेळीं देशाची जशी स्थिति असेल त्या स्थितीला अनुसरून होतात. आमचीं शास्त्रें ज्या वेळीं तयार झालीं, त्या वेळीं या भाग्यवान देशाची अशी सद्दी होती कीं, हजार हजार कुटुंबांत एकदेखील विधवा स्त्री सांपडत नसे. अशा स्थितींत पुनर्विवाहाचा प्रश्नच निघणें शक्य नाहीं, परंतु आतां जर घरोघर तरुण विधवा दृष्टीस पडतात, तर त्यासंबंधानें विचार करावायला नको काय? विधवा स्त्रिया या मनुष्यप्राण्याव्यतिरिक्त आहेत असें नाहीं. इतर मनुष्यांप्रमाणें त्यांनाहि मनोविकार आहेत. त्या मनोविकाराच्या तडाख्यांत त्यांनीं न सांपडतां संन्यासदीक्षेनें रहावें, असें म्हणणारांना मानवी स्वभावाची ओळख नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. समतेच्या दृष्टीनें विचार केला, तर ज्या शास्त्रानें आमचें कल्याण होईल तें आमचें शास्त्र. शास्त्र शास्त्र म्हणून त्यायोगें समाजाचें व राष्ट्राचें नुकसान करून घेणें, हा निव्वळ असमंजसपणा होय. ज्याच्या योगानें आमची उन्नति होईल, तें आमचें शास्त्र, ज्याच्या योगानें आमच्या पोरांबाळांचा फायदा होईल तें आमचें शास्त्र. ज्या शास्त्रानें आम्हाला राष्ट्रीयत्व प्राप्त होईल, तें आमचें शास्त्र. महाकवी भगवद्भक्त साधु तुकाराम यांनीं म्हटल्याप्रमाणें, आम्हां रंजून गांजून गेलेल्या हिंदीवासियांची या संकटपरंपरेंतून जो सुटका करील, तोच खरा शास्त्रवेत्ता होय. त्याचीं वचनें आम्हीं शास्त्राप्रमाणें मानूं. यावरून मी आपल्या पूर्वीच्या शास्त्रांचा तिरस्कार करीत आहें, असें कोणीहि समजूं नये. पूर्वीच्या शास्त्रांतून मोडकीं तोडकीं

वाक्यें एका ठिकाणीं करून आमच्या उन्नतीच्या मार्गांत धोंडे ठेवणाऱ्या समाजकंटकावर माझा विशेष कटाक्ष आहे. अशा लोकांनीं समता, सदयता व मनुष्यत्व या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केल्यास आमच्या समाजाचा व राष्ट्राचा पुष्कळ फायदा होणार आहे.

सभ्य गृहस्थ हो, आपण माझ्यापेक्षां विद्वान आहां, म्हणून विशेष विस्तृतपणें बोलण्याची मला गरज पडली नाहीं. ज्यांना माझ्या मतांत कांहीं चूक आहे असें वाटत असेल, त्यांनीं या वेळीं माझ्या मतांचें खंडण केल्यास मी त्यांचा अत्यंत ऋणी होईन."

केशवरावांचें भाषण संपलें. विरुद्ध कोणीहि बोलला नाहीं. नंतर केशवरावांनीं मनोरमा व सच्चिदानंद यांच्या गळ्यांत पुष्पांच्या माळा घालून त्यांचा योग्य गौरव केला. या विवाहानें सर्वांच्या मनावर मोठा परिणाम झाला. प्रसंग निघून गेल्यावर मागून मागून कित्येक टीकाहि करूं लागले; पण ती क्षुद्र व अविचाराची होती.

## प्रकरण तेरावें.

............

## मृत्यु.

शिव शिव, निरपराधी, निष्पाप, निर्दोष यमुनेची कोण ती भयंकर स्थिति झाली होती! नरपशु धोंडीराजानें निर्घृणता स्वीकारून तिला भयंकर रीतीनें मारल्यामुळें, तिच्या सर्वांगाला ठणका लागला होता. तिला प्राणांतिक वेदना होत होत्या. तिचा प्राण क्षणोक्षणीं कळवळून येत होता. प्रत्येक श्वास ती मोठ्या कष्टानें घेई व सोडी. तिची दृष्टि फिरून गेली होती. तिची नाडी मंद चालत होती. यमू, एवढ्या भयंकर यातना भोगण्याचा प्रसंग तुजवर केवळ तुझ्या पतीमुळें आला होता. ज्याच्यापासून सुखाची आशा करावी, त्यानेंच तुला दुःखांत लोटून दिलें होतें. ज्याच्या प्रीतीच्या सहवासाचा तुला भरंवसा होता, त्यानें तुला भयंकर यातनेच्या स्वाधीन केलें होतें आणि ज्याला तूं पति पति म्हणून सर्वस्व मानीत होतीस, त्यानें तुला शेवटपर्यंत शत्रू-प्रमाणें वागविलें होतें.

यमुनेच्या रुग्ण शय्येजवळ दोन चिकित्सक बसून कांहीं उपचार करीत होते. जवळच विश्वनाथराव घोर चिंतेनें व्याकुळ होऊन हातावर मस्तक टेंकून बसला होता. धोंडीराज व राधाबाईशिवाय बाकी घरांतील नौकर चाकर मंडळी देखील यमुनेजवळ चिंताक्रांत बसली होती. विश्वनाथराव यमूकडे पाहून म्हणाला,

" देवा, माझ्या यमूची कायरे ही स्थिति झाली! करुणानिधे, माझी लाज राखणारा तुझ्यावांचून आतां कोणी समर्थ नाहीं. वैद्यबोवा, तुम्हींदेखील निराश झालां ना? आतां कांहीं उपाय नाहीं ना?"

वैद्यानें एका यंत्रानें यमुनेची छाती काळजीपूर्वक तपासली. त्याबरोबर तो अगदींच निराश झाला. तो म्हणाला,

" विश्वनाथराव, तुम्हांला सर्व समजत असून असें वेड्यासारखें काय करतां? तिचा आतां मुळींच भरंवसा नाहीं. ती आतां तुमची फार थोड्या वेळाची सोबतीण आहे."

यमुनेची ती शोकावह स्थिति पाहून विश्वनाथराव, खरोखरच वेडा झाला होता. वैद्याचे ते उद्गार ऐकून तो अधिक हळहळून म्हणाला,

" काय! माझी यमू नाहीं वांचत! कांहींच इलाज नाहींना?"

यमुना रुग्णशय्येवर हातपाय झाडूं लागली. तिचे पंचप्राण व्याकुळ होऊं लागले. पुन्हा तिची नाडी पाहून वैद्य म्हणाला,

" छे, आतां यमूचा मुळींच भरंवसा नाहीं; जर कांहीं दानधर्म करावयाचा असेल तर लवकर करून घ्या."

सगळे शोकाकुल होऊन रडूं लागले. विश्वनाथराव तर लहान पोराप्रमाणें रडूं लागला. कोणी म्हणे तोंडांत तुळशीपत्र घाला, कोणी म्हणे भागीर्थी घाला, कोणी म्हणे तोंडांत सोनें घाला. विश्वनाथरावाला पोराप्रमाणें रडतानां पाहून एकजण म्हणाला,

" विश्वनाथराव, आतां या गोष्टीला कोणाचा उपाय आहे का? चांगली सवाष्ण बायको भरलेल्या कपाळानें जात आहे, ही गोष्ट उत्तमच आहे."

विश्वनाथराव कपाळावर हात मारून घेऊन म्हणाला,

"कपाळ माझें. यांत हो कसली उत्तम गोष्ट. मी वृद्ध म्हाताऱ्यानें मागें राहून या माझ्या सोन्यासारख्या यमूनें मला सोडून जावें, ही का उत्तम गोष्ट? तुमची सून कशानें वारली, असें जर कोणीं विचारलें, तर त्याला जबाब द्यायला तोंड आहे का? तोंडाला जन्माचें काळें लागलें. ) लोक माझी आतां नाहीं नाहीं ती निंदा करतील. घरांत यमू असल्यामुळें मला बाहेर हिंडता फिरतां तरी येत असे. पण आतां तोंड देखील कोणी बाहेर काढूं देणार नाहीं. ती मला पदोपदीं चांगल्या रीतीनें वागण्याविषयीं सांगे, पण मी वैभवाच्या धुंदींत तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून, उलट तिचा निष्कारण छळ केला. त्या साध्वीला छळलें म्हणूनच मला ही अशी दशा प्राप्त झाली. यमू, मला क्षमा कर."

विश्वनाथरावाला फार पश्चात्ताप झाला होता. कृतकर्मांची आठवण झाली म्हणजे त्याचें हृदय कळवळून येई. तो हताश होऊन यमुनेच्या मस्तकाजवळच बसला होता. यमूनें डोळे उघडून सर्वत्र नजर टाकली; परंतु इच्छित वस्तु तिला दिसली नाहीं. ती मोठ्या कष्टानें अस्पष्टपणें म्हणाली,

"पति—"

अधिक ती कांहीं बोलली नाहीं, परंतु तिची इच्छा ओळखून एक स्त्री म्हणाली,

एकदां धोंडीराजास आणाल तर बरें होईल. त्याचें दर्शन घ्यावें अशी तिची इच्छा दिसते."

लागलाच एक मनुष्य धोंडीराजाला बोलावयाला गेला; परंतु तो विश्वयोषिता रंगूच्या घरीं, मोठ्या रंगांत असल्यामुळें त्यानें त्या बोलवावयास आलेल्या मनुष्याला दहापांच शिव्या देऊन घालवून दिलें. लवकरच धोंडीराज येत नाहीं, अशी सर्वांची खात्री झाली. विश्वनाथराव म्हणाला,

" बाई यमू, कशाला त्या नराधमाचें नांव घेतेस? कशाला त्या चांडाळाच्या दर्शनाची इच्छा बाळगतेस? तूं पति पति म्हणून कंठशोष करतेस, पण त्या राक्षसाला कोठें तुझी पर्वा आहे! यमू ही तुझी निर्मल व निस्सीम पतिभक्ति तुला स्वर्गाला नेऊन पोहोंचवील. तीं बघ स्वर्गाचीं द्वारें उघडीं झालीं. देवदूत तुझी वाट पाहूं लागले."

यमुनेची अत्यंत निराशा झाली. तिनें पुन्हा सर्वत्र नजर टाकून आपल्या इच्छित वस्तूस पाहण्याचा प्रयत्न केला; परंतु तो चांडाळ तिला कोठेंहि दिसला नाहीं. तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें, ती कांहीं बोलण्याचा प्रयत्न करूं लागली; परंतु तिची जीभ हलेना. एक स्त्री यमूच्या मस्तकावर हात ठेवून म्हणाली,

"बाई यमू, तुला काय सांगावयाचें आहे?"

यमुना विश्वनाथरावांकडे पाहून मोठ्या कष्टानें म्हणाली,

"मामंजी—"

एक स्त्री म्हणाली,

विश्वनाथराव, आपण असे तिच्याजवळ या."

विनश्वाथराव तिच्याजवळ येऊन बसला. यमूनें मोठ्या कष्टानें आपला हात विश्वनाथरावांच्या पायांवर ठेवला. याहून अधिक कांहीं करण्यास

यमुनेस शक्ति नव्हती; सर्वांनीं यमुनेचा भाव जाणला. एका स्त्रीनें विश्वनाथरावांची पदधुळी घेऊन, ती यमुनेच्या मस्तकास लावली. नंतर यमुना त्या क्लेशकारक स्थितींत अस्पष्ट स्वरानें म्हणाली,

" सासूबाई.—"

ज्या राक्षसिणीनें तिला आजन्म छळली, तिच्या दर्शनाची अंतकाळीं सद्भावानें यमुनेनें दर्शविलेली इच्छा पाहून, सर्वांना आश्चर्य वाटलें. एक स्त्री घाईघाईनें माडीवर जाऊन राधाबाईला हांका मारूं लागली. राधाबाई माडीवर स्वस्थपणें निजली होती. ती झोंपेंतून जागी होऊन म्हणाली,

" काय हो, काय हा धिंगाणा तुमचा?"

ती स्त्री केंविलवाण्या स्वरानें म्हणाली,

"अहो, धिंगाणा कसला? खालीं यमूचा अगदीं प्राण चालला आहे, तिला येऊन अंतकाळीं दर्शन द्याल, तर बरें होईल."

राधाबाई कर्कश स्वरानें म्हणाली,

"रात्रभर औषधपाणी करतां करतां माझा कसा तो डोळ्याशीं डोळा नाहीं. आतां कोठें उगाच आंग टाकलें न टाकलें, तों तुम्हीं आपल्या कपाळकटकट करायला तयार. तिकडची तर अगदीं अक्कल गेली आहे. पोरावर एवढें किटाळ आलें आहे, पण त्याची काळजी न करितां, त्या कारटीसाठीं वैद्य, डाक्तर नी मार गर्दी उडवून दिली आहे. मीं नाहीं बाई असले चोंचले पाहिले! जा तुम्हीं आपल्या. मी कांहीं येत नाहीं."

शिव शिव! कोण ही निर्दयता व शत्रुता! याहुन सासूपणाचें अधिक तें काय चित्र रेखाटावयाचें. बिचारी बोलावयाला गेलेली स्त्री

तशीच परत आली; परंतु तिनें राधाबाईचा निरोप यमूला न कळवितां सासूबाईची पदधूली म्हणून कांहीं तरी तिच्या मस्तकाला लावली. यमूची मैत्रीण गंगाबाईहि आली होती. तिच्याकडे पाहून यमू म्हणाली,

"पतीचें दर्शन—"

यमूला पुढें बोलवेना. तिनें एक मोठा उसासा टाकला. सर्व मंडळी अश्रु ढाळावयाला लागली. यमुना पुन्हां म्हणाली,

"त्यांचा कांहीं दोष नाहीं."

क्षणएक गेल्यावर ती कष्टानें म्हणाली,

"देव त्यांचें कल्याण करो."

यमूची वाणी फारच खोल गेली, तिला आणखी बोलवेना. तिचे डोळे स्थिर झाले. हातापायांतील उष्णता निघून जाऊं लागली. मोठ्या परिश्रमानें ती म्हणाली,

"स्वामी—"

झालें, आटोपलें. यमुनेची जीभ आडवी पडली. हळू हळू तिनें आपले डोळे मिटून घेतले. प्राणवायु शरीरास सोडून गेला. गुलाबाची कलिका सुकून गेली. माधवीलता वाळून गेली. 'स्वामी स्वामी पति पति' म्हणून बिचारीनें प्राण सोडला. पाषाण, पशु, चांडाळापेक्षांहि चांडाळ धोंडीराजानें तिला आजन्म दुःखानें वागविलें, तरी अंतकाळीं, तिला पतिदर्शनाशिवाय कशाचीहि इच्छा राहिली नव्हती; परंतु त्या नरकुलकलंक मूर्ख शिरोमणीनें, त्या साध्वीला शेवटीं दर्शन देखील दिलें नाहीं. शेवटपर्यंत कष्ट व क्लेश यांवांचून तिला कोणत्याहि सुखाचा अनुभव मिळाला नाहीं. अंतकाळीं पंचप्राण कासावीस

होत होते, तरी तिला धोंडीराजाच्या मंगलकामनेशिवाय कामना नव्हती. केवढी ही विलक्षण पतिभक्ति. अशा पतिभक्तीचें उदाहरण कोठेंहि दृष्टीस पडावयाचें नाहीं. आम्हीं इतिहासांत व पुराणांत साध्वी स्त्रियांचीं अनेक चरित्रें वाचलीं आहेत; परंतु यमुनेच्या पतिभक्तीची तोड त्यांत सांपडत नाहीं. सती जाणें हें पतिभक्तीचें दांडगें उदाहरण होय; परंतु सुखानें वागविणाऱ्या पतीच्या पश्चात् प्रेमबद्धतेमुळें सती जाण्याची इच्छा व्हावी, यांत कांहीं मोठेसें आहे असें नाहीं. परंतु अहर्निश आमानुषपणें छळणाऱ्या पतीबद्दल एवढें प्रेम असणें अनुपमेय होय. पतीचें अज्ञान पाहून ती कधीं हंसली नाहीं. पतीच्या मूर्खपणाबद्दल तिरस्कार दर्शविला नाहीं. तो नाहीं नाहीं तें बोलत असे; पण तिनें कधीं एका शब्दानें त्याला दुखविलें नाहीं. तो चांडाळ एवढा छळ करी, तरी ती त्याच्यावर कधीं रागावली नाहीं. इतकी प्रखर पतिभक्ती यमूवांचून अन्यत्र आढळणें कठिण होय. देवदूतांनीं तिला स्वर्गांत नेऊन, मणिमय सिंहासनावर बसविलें असेल. अनेक देवांनीं तिचें स्वागत केलें असेल. मंगलवाद्यांचा मोठा गजर झाला असेल. देवांगनांनीं तिला आलिंगन दिलें असेल.

यमुनेचें प्रेत बाहेर घोंगडीवर आणून ठेविलें. उत्तरक्रियेची तयारी चालू झाली. विश्वनाथरावांचे शत्रु व मित्र यमूची वार्ता ऐकून अत्यंत हळहळले. त्या साध्वीच्या दर्शनासाठीं, सर्व पुरुष व स्त्रिया आल्या होत्या. याप्रमाणें प्रेतयात्रेची सर्व तयारी होत आहे, तों इकडे धोंडीराज वारुणीच्या धुंदींत डुलत डुलत घरीं आला. आल्याबरोबर बाहेर घोंगडीवर मृत यमुनेला पाहून तो म्हणाला,

" अरे ही अवदसा मेली, पण हिचें डोकें अजून शाबूत आहे. हिचें मला प्रथम डोकें फोडलें पाहिजे."

असें म्हणून धोंडीराजानें एक मोठा सोंटा आपल्या हातांत घेतला व तो तिच्याकडे धांवून येऊं लागला. परंतु लागलेंच कांहीं मंडळीनें धोंडीराजास धरलें. विश्वनाथराव म्हणाला,

" अरे, या चांडाळाला बाहेर घालवून द्या. हा प्रेताचीहि विटंबना करायला कमी करणार नाहीं."

धोंडीराजाचा क्रोधाग्नि अधिक भडकला. तो मंडळीच्या हाताला हिसडा मारून म्हणाला,

" गप बस थेरड्या. माझी बायको आहे, मी तिचें वाटेल तें करीन."

असें म्हणून धोंडीराजानें हातांतला सोंटा ताडकन् प्रेताच्या मस्तकावर मारला. विश्वनाथराव मोठ्यानें ओरडून म्हणाला,

" अरे, याला धरा, हा प्रेताची विटंबना करीत आहे."

धोंडीराज लागलाच बापाच्या अंगावर धांवून गेला; परंतु इतक्यांत मंडळीनें धरून त्याला खांबाशीं बांधून टाकलें. नंतर प्रेत दहनक्रियेसाठीं नेण्यांत आलें.

यमू, तूं गेलीस; पण तुझें चरित्र मागें अक्षय राहील. जिवंतपणीं तुला समाजाच्या व राष्ट्राच्या उपयोगीं पडतां आलें नाहीं; पण तुझें चरित्र खास सर्वांच्याहि उपयोगी पडेल.



## प्रकरण चौदावें.

# पूर्ति.

विश्वनाथराव या संसारास कंटाळून काशीस जाऊन राहिले. त्यांनीं आपली सर्व स्थावर जंगम मिळकत धर्मार्थ प्रदान केली. राधाबाई व धोंडीराज त्यांस यांनीं एक कपर्दीकहि दिली नाहीं.

धोंडोराजावर व माधवरावावर दोन तीन आरोप होते, त्याबद्दल धोंडीराजास १४ वर्षांची, व माधवरावाला ११ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. अद्याप ते तुरुंगांतच आहेत.

सच्चिदानंद व मनोरमा यांनीं एक राष्ट्रीय विद्यालय काढलें असून तें चांगल्या प्रकारें चाललें आहे.

कृष्णराव व वेणु सुखानें संसार करीत आहेत. कृष्णराव मुंबईस स्वदेशी मालाचा व्यापार करीत असून, त्यांत त्यानें चांगलें नांव व पैसा मिळविला आहे.

राधाबाई व केशवराव आनंदांत आहेत.

प्रभू सर्वांना आनंदांत ठेवो, हीच आमची मनीषा.

संपूर्ण.